रविवार, 31 जुलै 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 08
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●SUNDAY 31 JULY 2022 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-08 ●TITLE CODE : MAHMAR51117 ●PAGE-14 ●PRICE-5

# दौरा अर्धवट सोडून मुख्यमंत्री दिल्लीत

## भाजपच्या पक्षश्रेष्ठींशी मंत्रिमंडळ विस्तारावर चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद : राज्याचा मंत्रिमंडळ विस्तार रखडला असताना राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे औरंगाबादहून आपला दौरा अर्धवट सोडून तातडीने दिल्लीला रवाना झाले असल्याची माहिती मिळाली आहे. ते दिल्लीतील भाजपच्या पक्षश्रेष्ठींशी मंत्रिमंडळ विस्तारावर चर्चा करणार असल्याचे बोलले जाते.**

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा या महिन्यातला सहावा दिल्लीचा दौरा असून ते समृद्धी महामार्गावरून ते विमानतळाकडे रवाना झाले आहेत. त्यांच्या या दौऱ्यानंतर मंत्रिमंडळाच्या विस्तारावर शिक्कामोर्तब होणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे औरंगबादला दौऱ्यावर होते. पूरग्रस्त भागाची पाहणी, शिंदे गटातील नेत्यांच्या भेटीगाठी यासाठी ते दौऱ्यावर होते पण हा दौरा अर्धवट सोडून ते दिल्लीला रवाना झाले असल्याची माहिती आहे.

मागच्या एका महिन्यापासून राज्यातील मंत्रिमंडळाचा विस्तार रखडला असल्यामुळे विरोधकांनी शिंदे फडणवीस सरकारला धारेवर धरले होते. शिवसेनेचा आणि शिंदे गटाचा वाद कोर्टात असल्यामुळे विस्तार रखडल्याच्या टीकाही केल्या जात होत्या. त्यानंतर राज्यात दोनच मंत्री कारभार कसेकाय चालवतात अशाही टीका सरकारवर झाल्या आहेत. राज्यात दोन मंत्री असताना घेतलेले निर्णय हे अवैध आहेत असा आरोप काही विरोधकांकडून करण्यात आल्या होत्या. त्यानंतर आता मंत्रिमंडळाच्या विस्तारासाठी पळापळ सुरू झाल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

## मराठा आरक्षणासाठी राजकीय, न्यायालयीन लढाई लढणार ! : शिंदे




**येवला :** ओबीसी समाजाचा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागला असून न्याय देण्याचे काम आम्ही केले आहे. आता मराठा आरक्षणा बाकी असून त्यासाठी राजकीय तसेच न्यायालयीन लढाई लढणार आहे. राज्याला स्व. बाळासाहेब ठाकरेंच्या व आनंद दिघेंच्या विचाराने विकासाकडे घेऊन जाण्यासाठीच आम्ही ही भूमिका घेतली असून जनतेची प्रचंड गर्दी म्हणजेच आमच्या भूमिकेला पाठिंबा आहे असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

मालेगावहून औरंगाबादडे जात असताना येथील विंचूर चौफुलीवर त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांनी अभिवादन केले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांच्या विचारावर आम्ही चाललो असून आमची भूमिका भावल्यामुळेच राज्यातून हजारोंचा पाठिंबा मिळतो आहे. पंतप्रधान मोदीसाहेब सोबत असल्याने हा परिवार वाढत चालला आहे. राज्याच्या हिताची भूमिका घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आम्ही पुढे जात असल्याचे स्पष्ट करत रखडलेले प्रकल्प चुटकीसरशी मंजूर केल्याची माहिती त्यांनी दिली. सत्तेवर येताच आम्ही शेतकऱ्यांना कर्जमाफीसाठी ५० हजाराचे अनुदान दिले, विजेचा प्रश्न मार्गी लावला, पेट्रोल डिझेलचे दर कमी केले, सर्वसामान्यांना न्याय देऊन राज्याला विकासाकडे घेऊन जाणारे काम आम्ही करणार असल्याचे शिंदे म्हणाले.

# अण्णाभाऊ भारताचे मॅक्झिम गॉर्की

आधुनिक केसरी

अण्णाभाऊंचे साहित्य म्हणजे जागतिक क्रांती पासून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपर्यंत, शहरी जीवनापासून ग्रामीण जीवनापर्यंत चित्रण, भांडवलदरापासून तर कष्टकऱ्यांपर्यंत जगण्याची धडपड करणारे, व्यथा प्रखरतेने मांडणारे आहे.







हे साहित्य मराठी साहित्यातील अनमोल ठेवा तर आहेच. परंतु जीवनाचे सम्यक तत्त्वज्ञान शोधणाऱ्या आणि जनसंघर्षाच्या लाटेवर आरूढ झालेल्या समतेच्या पाईकांना 'अण्णाभाऊ साठे' हे नाव आजही अस्वस्थ करून जाते. अण्णाभाऊ हे पुरोगामी विचारसरणीशी एकरूप होते. हे सांगण्याची गरज आहे. कारण राजकारणी आणि पांढरपेशी लोकांनी आपल्या व्यक्तिगत स्वार्थासाठी अण्णाभाऊंचे विचारांचे खंडन आपापल्या परीने करून समाजात द्वेष पेरण्याचे कार्य केले. हे अण्णाभाऊंच्या विचाराला अभिप्रेत मुळीच नाही. म्हणून अण्णाभाऊ पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे उद्‌घघाटनाच्या अध्यक्ष पदावरून 2 मार्च 1958 रोजी भाषण करताना सांगतात..' दलितांविषयी लिहिणाऱ्यांनी प्रथम त्यांच्याशी एकनिष्ठ असले पाहिजे. तू गुलाम नाहीस हे जग तुझ्या हातावर आहे. त्याची जाणीव करून घ्यावी. मराठी साहित्याची नांदी आमच्या जीवन संघर्षाने घडली आहे हे शब्द कितीतरी विचार करण्यास भाग पाडतात. पृथ्वीचा निर्माणकर्ता गुलाम का? हा प्रश्न अण्णाभाऊ आपल्यासमोर विचारपूर्वक मॅक्झिम गॉरकी यांच्या तत्त्वज्ञानाचा विचार करून मांडतात.

अण्णाभाऊ आपल्या साहित्यातून ताऊन सुलाखून निघत दर्जेदार साहित्याची निर्मिती करतात. ते लेखन मनाला सर्वस्पर्शी होऊन जाते. साहित्यातील नायिकांना आगळेवेगळे स्थान मिळवून ते देतात. सर्व नायिका स्त्री जीवनाविषयी विकृती निर्माण करीत नाहीत. नायिका गरीब असल्यातरी दारिद्र्याशी चिवटपणे झुंज देतात. त्या डोळ्यात अश्रू गाळत नाहीत. कमरेला पदर गुंडाळून हातात कुऱ्हाड घेऊन प्रतिघात करणारी स्त्री अण्णाभाऊंना आवडते. म्हणून त्यांनी साहित्यातून उभा केलेला जो लढा आहे त्या संपूर्ण लढ्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचाराशी बांधिलकी आहे. म्हणजेच जो लढा बाबासाहेबांनी दलित समाजात क्रांतीशीलपणे उभा केला तोच लढा अण्णाभाऊंनी साहित्यच्या व्यासपीठावरून भक्कमपणे उभा केला. आणि आंबेडकरी विचार हा अण्णाभाऊंच्या साहित्याचा केंद्रबिंदू झाला. हे विशेष नोंद करण्यासारखे आहे.

अण्णाभाऊंचे परिवर्तनवादी विचार अंगीकृत करीत असताना संघर्ष, खेद आणि त्यांच्या भावना या आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. कारण तरंगमय तळ्यात पडलेली सावली जशी लुंबळकी नि डगमगती दिसते तसेच समाजाचे झालेले चित्र अण्णाभाऊ आपल्या दैदिप्यमान विचाराच्या दुर्बिणीतून मांडताना दिसतात. तेव्हा त्यांचे परिवर्तनवादी विचार हे सतत तळपळत राहतात. त्यातील जीवन विषयक तळमळ खूप मोलाची वाटते. म्हणूनच ते आम्हाला भारताचे मॅक्झिम गॉरकी वाटतात. त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन.

**(शब्दांकन- बाळासाहेब जोगदंड, औरंगाबाद)**

# सत्तेचा दुरुपयोग केला तर धडा शिकवीन : शरद पवार



आधुनिक केसरी न्यूज

धुळे : आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीने पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी जोरदार हालचाली सुरु केल्या आहेत. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आज धुळ्यात सभा घेतली. यावेळी पवार यांनी सत्ताधाऱ्यांचा चांगलाच समाचार घेतला. सध्याची परिस्थिती पाहता शेतकऱ्यांचे नुकसान झाले. लोक संकटात आहेत, अशा वेळेस अजित पवार किती दिवसापासून तिकडेच आहेत. सत्तेचा वापर चुकीचा जर केला तर यांना धडा शिकल्याशिवाय राहणार नाही, असे असा इशारा शरद पवार यांनी दिला. राष्ट्रवादीचे शरद पवार यांची आज धुळ्यात सभा व राष्ट्रवादी भवनाचे नुतनीकरण करण्यात आले. पुढे बोलताना पवार म्हणाले की, सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. एक काळ असा होता की इंग्रजांचे संपूर्ण जगावर राज्य होते. अशात इंग्रजांचा सूर्य कधीच मावळत नाही, असे बोलले जायचे. परंतु महात्मा गांधींनी सर्वांना एकत्र केले आणि इंग्रजांपासून देशाला स्वातंत्र्य मिळाले. तसेच इंग्रजांचा पराभव इथला माणूस करू शकतो, हा ज्या देशाचा इतिहास आहे, आज त्या देशात सत्तेचा गैरवापर करून दमदाटीचे वातावरण कोणी करत असेल तर त्यांना सुद्धा धडा शिकवण्याची ताकद इथल्या सामान्य माणसात आहे, असे शेवटी शरद पवार यांनी ठणकावून सांगितले. यावेळी आ. एकनाथ खडसे, माजी आमदार अनिल गोटे यांचीही भाषणे झाली.

# काँग्रेस ५ ऑगस्टला पंतप्रधानांच्या निवासस्थानाला घालणार घेराव

आधुनिक केसरी न्यूज


**नवी दिल्ली :** वाढत्या महागाईमुळे काँग्रेस ५ ऑगस्ट रोजी पंतप्रधानांच्या निवासस्थानाला घेराव घालतील. काँग्रेसने खासदार, आमदारांना गावात आणि छोट्या शहरात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आंदोलनात सहभागी होण्यास सांगितले आहे. महागाईविरोधात राजधानीत काँग्रेसने राजभवनावर घेराव घालण्याचे नियोजन केले आहे. आंदोलनादरम्यान राज्यातील आमदार, माजी खासदार आणि ज्येष्ठ नेत्यांना राजभवनाच्या घेरावात सहभागी होण्यास सांगितले आहे. लोकसभा आणि राज्यसभा खासदारांना 'चलो राष्ट्रपती भवन'च्या नावाने महागाई आणि बेरोजगारीविरोधात आंदोलन करण्यास सांगितले आहे. नवी दिल्लीत पक्षाच्या वतीने पंतप्रधानांच्या निवासस्थानाचा घेराव घालण्याची योजना आहे. निदर्शनादरम्यान काँग्रेस कार्यकारिणीसह सर्व ज्येष्ठ नेते उपस्थित राहणार आहेत.




# खोतकरांना हवी जालना लोकसभेची जागा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एकेकाळचे कट्टर विरोधक रावसाहेब दानवे आणि अर्जुन खोतकर आता एकनाथ शिंदे गटाच्या निमित्ताने पुन्हा एकत्र आले आहेत. खुद्द दानवे यांनीच राजकारणात कोणी शत्रु नसते किंवा मित्रही नसते, असे म्हटले. त्यानंतर खोतकर यांनी शिंदे गटात जाण्याचा निर्णय घेतला. मात्र यावेळी खोतकर यांनी जालना लोकसभेची जागा मागितली. त्यावरून दानवे चांगलेचे संतापल्याचे दिसून आले. त्यामुळे खोतकर-दानवे यांच्यातील वैर खरच संपले का, असा प्रश्न उपस्थित होते आहे. खोतकर म्हणाले होती की, खुद्द दावनेंनी मला लोकसभेला समर्थन द्या, तुम्हाला दुसरी जागा देता येईल. कारण ही जागा भाजपची असून मीच सध्या इथला विद्यमान खासदार आहे, असे म्हटले. त्यावर मी त्यांना म्हटले की, हा निर्णय एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांच्यावर टाका. शिवाय, तुम्ही अनेक वर्षे इथून लढलात आता ती मला लढवू द्या असे मी त्यांना म्हटल्याचही खोतकर यांनी सांगितले. दरम्यान रावसाहेब दानवे संतप्त झाल्याचे पाहायला मिळाले. दानवे म्हणाले की, जालना लोकसभेची जागा रावसाहेब दावनेच्या बापाची जहागिरी थोडीच आहे. याच्यावर अधिकार रावसाहेब दानवेंचा थोडाच आहे. उद्या आमच्या पक्षाचे सरचिटणीस मुलतानी हे देखील तिथून उभे राहू शकतात. तो काय जालन्यातला पक्ष आहे का असा सवाल करत भाजप राष्ट्रीय पक्ष असल्याचे दानवे यांनी म्हटले.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## ' तेच ते...'

आधुनिक केसरी

बऱ्याच रसिकांना कविवर्य विंदा करंदीकर यांची ' तेच ते...' ही कविता माहिती असेल. खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एकदा विंदा चाळीसगावला आले होते. त्यावेळी प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून ही कविता ऐकण्याचा योग आला होता. त्यावेळी मी लहान असल्याने त्या कवितेतला गहन अर्थ कळला नव्हता. पण आपल्या जीवनात त्याच त्या असलेल्या गोष्टी सारख्या कराव्या लागत असल्याने येणारा वैताग मात्र बालसुलभ मनाला कळला होता. आज विंदा असते तर अजून भरपूर विषय त्यांना या कवितेत भर घालायला मिळाले असते.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांच्या निवडीवरून कदाचित त्यांना असे वाटले असते -


तेच लोक, तीच निवड, तीच आवड तीच नावड
तेच विषय तेच वाद, वक्तव्याचे गंभीर पडसाद
तीच भाषणे, तेच हारतुरे
तेच सत्कार त्याच शाली, तेच हॉल
तीच पुस्तके, तेच स्टॉल

कोरोनाच्या बाबतीत त्यांना वाटले असते -

तोच व्हायरस तेच हाल, तीच लोकांच्या जगण्याची कमाल
तोच मास्क तेच टास्क, सॅनिटायझर आणि रुमाल
तेच लॉकडाऊन तेच क्वारंटाईन
तीच नर्स तीच व्हॅक्सिन
त्याच परीक्षा त्याच शाळा
जगण्याचाच मोठा घोटाळा.

असे अनेक विषय विंदांनी हाताळले असते. विंदांची कविता मानवी जीवनातील असहायतेवर कोरडे ओढते. वास्तव समोर आणते. ( म्हणूनच आपल्याला नाविन्याची ओढही असते. ) पण जाऊ द्या. तो आपला विषय नाही. आपण उगीचच गंभीरतेकडे चाललोय.

आज मलाही थोडंसं विनोदी अंगानं तुम्हाला वास्तवतेकडे घेऊन जायचंय. थोडा वेळ आपली करमणूक व्हावी आणि ती होता होता थोडंसं भाषेच्या वापरातील आणि मानवी जीवनातील विसंगतीकडेही आपलं लक्ष वेधावं एवढाच माफक हेतू. जीवनात जशा त्याच त्या गोष्टी आपल्याला कराव्या लागतात आणि त्यांचा आपल्याला कंटाळाही येतो, तसाच आपण न कंटाळता त्याच त्या शब्दांचा वापर करत असतो. एखादं नाणं जसं वापरून वापरून गुळगुळीत व्हावं ( आता आपण नाणी फार कमी वापरतो तो भाग वेगळा ! ), वापरून वापरून नोटाही हुळहुळीत व्हाव्या तसे शब्द देखील वापरून वापरून गुळगुळीत ( पुन्हा तोच शब्द ! क्षमस्व ! ) होतात. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

## शुद्धता ही सुख आणि शांतीची जननी

आधुनिक केसरी

विचार, वर्तन आणि व्यवहार यांतील शुद्धता ही सुख आणि शांतीची जननी असते. शुद्धता हा शांती आणि आनंदाचा आधार असतो, तो पाया असतो, ती शांती आणि आनंदाची जननी असते. जिथे पवित्रता असते तिथे आपोआपच शांती आणि आनंद मिळत राहतो. आपण स्वतः कधी हे तपासून पाहतो का? किंवा आपण स्वतःच शांती आणि आनंदाचे मूर्त स्वरूप असल्याचा अनुभव घेतो का? किंवा तो तसा आपल्याला येतो अथवा तसे काही जाणवते का? कारण ह्याच्यात मूलतः फरक शुद्धतेचा असतो. आपणच आपल्या अंतर्मनात नकारात्मक अथवा अशुद्ध विचार निर्माण केले, तर शांततेऐवजी आपल्या जीवनात उलथापालथच होते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येक बाबतीत 'का?' आणि 'काय?' असे अनेक प्रश्न आहेत, कि ज्यांचा आपण सहसा, फारसा विचारच करत नाहीत आणि आपल्याला ते समजून घेण्याची, विश्लेषण करण्याची गरजच लक्षात येत नाही. 'हे घडायला नको होतं', 'हे असं व्हायला नको होतं, असं व्हायला हवं होतं, अशा अनेक प्रश्नांमुळे आपल्या अंतरंगात अनेकदा भ्रम आणि संभ्रम निर्माण होत असतात. आपली बुद्धी सतत अनेक प्रश्न आणि शंका स्वतःलाच विचारत असते आणि स्वतःच ते प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत असते. म्हणूनच आपल्यात शांततेची, एकाग्रतेची, अक्षमतेची, आनंदाची कमतरता निर्माण होत राहते. खरा आनंद म्हणजे आपण आपल्या स्वतःच्या अंतरंगाचा, त्याच्या सहवासाचा आनंद घेणे आणि आपले शरीर, मन आणि आत्म्याशी सुसंवादाने शांती प्राप्त करण्यासाठी जगणे होय.

## संस्कार धन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-32

## भावना बोथट झाल्या...

आधुनिक केसरी

पाषाणहृदयी, दगडासारखा, दगड आहेस का? उलट्या काळजाचा? भावना बोथट झाल्या. असे शब्द बऱ्याचदा कानावर पडतात. खरंच माणूस असा असतो का?

तो असं का वागतो? तो मुळातच तसा आहे का? तो बोथट का झाला? खरंच दगड आहे का?

पण दगडालाही पाझर फुटतो म्हणे. मग माणूस तर सजीव आहे. चालणारा बोलणारा जिवंत पुतळा आहे. काही लोकांना पाहून आपण कधी कधी खूपच उथळपणे वरील प्रतिक्रिया त्या व्यक्तीच्या बाबतीत देतो. त्यामागचा इतिहास आपल्याला काहीच माहित नसतो. तरीही आपल्याला समोरच्याला दूषणं देऊन मोकळं व्हायचं असतं. मग त्या व्यक्तीचे हृदय लोण्यासारखं असलं तरी आपण त्याला पाषाणहृदयी ही उपमा देऊन मोकळे होतो. छान फुलासारख्या उपमा पण देऊ यात ना ! किती छान वाटेल त्या व्यक्तीला. आपल्या सुद्धा जिभेवर असणारी सरस्वती पण खुश होईल, आनंदी होईल.

तिला सुद्धा आपला अभिमान वाटेल .वाईट शब्द जिभेवर आल्यास खरंतर सरस्वतीचा अपमान होत असतो. नेहमी शुद्ध, सात्विक, खरे, गोड, मधाळ, लाघवी बोलावे. सौंदर्यापेक्षा बोलण्याच्या प्रेमात समाज पडला पाहिजे. इतके ते लाघवी असावे. बोथट झालाय, पाषाणहृदयी,दगड असे कोणी आपल्याला म्हणू नये. खूपही बडबड नको आणि खूपच मितभाषी पण नको. तसं पाहिलं तर दोन्हीही त्रासदायक वाटते. त्यातला सुवर्णमध्य आपल्याला साधता आला पाहिजे. क्रिया प्रतिक्रिया झाल्याच पाहिजे. फक्त अरे ला कारे नको. माफ करता आलं पाहिजे. माफ केलं म्हणजे भावना बोथट होत नाही.

## "निरूपण"

आधुनिक केसरी

**विश्वाचा जनिता । म्हणे यशोदेसि माता ॥ ऐसा भक्तांचा अंकित । लागे तैसी लावी प्रीत ॥**
**निष्काम निराळा । गोपी लावियेल्या चाळा ॥ तुका म्हणे आलें । रूपा अव्यक्त चांगलें ॥**

ज्याच्यापासून हे विश्व आविर्भूत होते, जन्म घेते, तो विश्वाचा जनिता म्हणजे जनक असा श्रीकृष्ण परमात्मा यशोदेला माता म्हणतो. यशोदा मातेने भगवंताची वात्सल्य भक्ती केली. म्हणून भगवंत यशोदामातेसमोर पुत्ररूपाने प्रकट झाले. भगवंत हे भक्ताच्या अंकित आहेत. आपण त्याच्यावर ज्या भावनेने प्रेम करू, तसे प्रेम भगवंत आपल्याला देत असतात. (ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्। असे भगवंतांनी गीतेच्या चौथ्या अध्यायात ११ व्या श्लोकात सांगितले आहे.) भगवंत निराळा म्हणजे निर्लिप्त आहेत. निष्काम आहेत. अशा भगवंताचा छंद गोपींना लागला आहे. अव्यक्त असे असणारे भगवंत भक्तजनांसाठी चांगले रूप घेऊन आले आहेत. अर्थात सत्वप्रधान रूप घेऊन प्रकट झाले आहेत. या अभंगात संतश्रेष्ठ जगद्गुरू श्री तुकोबारायांनी भगवंत हे भक्तासाठी अवतार घेतात आणि भक्तांची जशी भावना तसे त्यांच्या समोर प्रकट होतात, असे प्रतिपादन केले आहे. "भगत के बस मे है भगवान!" असे म्हटले जाते. रावण, हिरण्यकशिपु यांनी भगवंताची विरोधी भक्ती केली. त्यामुळे भगवंत त्यांच्यासमोर तशाच रूपात प्रकट झाले. देवकीमाता, वसुदेवबाबा, यशोदामाता, नंदबाबा यांनी वात्सल्यभावाने भगवंताला भजले. म्हणून भगवंत पुत्ररूपाने त्यांच्यासमोर अवतरले. पार्थाने, उद्धवाने सख्यभावाने, हनुमंतरायांनी स्वामी रूपाने भगवंताची भक्ती केली. म्हणून त्यांच्यासमोर सखा, स्वामी या रूपाने भगवंत प्रकट झाले.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## भगवंताचे अनुसंधान कसे ठेवावे ?



आधुनिक केसरी

ज्या गोष्टीचे अत्यंत प्रेम आहे तिचे अनुसंधान मनुष्याला आपोआपच राहते. ते इतके टिकते की ते अनुसंधान मला आहे ही जाणीवही राहात नाही. 'अनुसंधान ठेवतो' असे म्हणताना 'मी' त्याच्याहून वेगळा असतो; आणि प्रेमाचे जे अनुसंधान असते तिथे मी एकजीवच होतो. आपण कितीही गडबडीत असलो तरी वाटेने जात असताना आपल्या नावाने कुणी हाक मारली की आपण वळून पाहतो. हे आपले अनुसंधान आहे; कारण या देहावर आपले इतके प्रेम आहे की मी त्याच्याहून वेगळा नाहीच ! असे देहाचे अनुसंधान कसे ठेवावे हे सांगावे लागत नाही. 'देहाचा विसर पाडा' म्हणून सांगावे लागते, 'देहाचे स्मरण ठेवा' म्हणून नाही सांगावे लागत ! आम्हाला भगवंताचे अनुसंधान ठेवायचे आहे. हा एक प्रकारचा अभ्यास आहे. भगवंताचे प्रेम वाढले तर अनुसंधान टिकेल. परिक्षा पास होण्याकरिता जसा अभ्यास करावा लागतो तसा भगवंताचे प्रेम वाढविण्याकरिता अभ्यास करणे जरूर आहे. यासाठी, जे जे काही मी करीन ते ते मी भगवंताच्या साक्षित्वाने करतो आहे ही जाणीव ठेवून करायला पाहिजे. आज आम्हांला नाना तऱ्हेचे उद्योग करावे लागतात. प्रपंच म्हटला म्हणजे किती गोष्टी कराव्या लागतात ! त्या सगळ्या करीत असताना भगवंताचे स्मरण ठेवून करणे, हे आपले खरे कर्तव्य आहे. सर्कशीमध्ये आपण पाहतो ना ! वाघ, सिंह, घोडे, हत्ती जे काय प्राणी असतील ते खेळ खेळतात. घोडा कसा सुंदर नाचतो असे आपण म्हणतो ! पण त्या घोड्याचे लक्ष प्रेक्षकांकडे नसते. त्या घोड्याचे, त्या वाघाचे, त्या सिंहाचे लक्ष आतमध्ये चाबूक उगारणारा जो मनुष्य असतो त्याच्याकडे असते ना ? प्रेक्षक काय म्हणतील ते तो प्राणी पाहात नाही. आणि आपण काय करतो ? भगवंत काय म्हणेल हे पाहातच नाही, जग काय म्हणेल ते पाहतो ! हे जर आम्ही सोडले ना, तर भगवंताला काय हवे आहे ते आम्हाला बरोबर कळेल. भगवंताचे स्मरण ठेवून कर्म केल्याने त्याला काय हवे तेच आमच्या हातून घडेल. त्याचे संधान न सोडता कर्म करणे हे अनुसंधानाचे लक्षण आहे. हे कशाने होईल ? अत्यंत प्रेमाने होईलच.

एक बाई नुकतीच बाळंत होऊन सासरी आल्यावर तिने मूल पाळण्यात निजविले, आणि मागच्या परसामध्ये ती भांडी घाशीत होती. ते मूल थोडेसे कुठे रडले, घरात पुष्कळ माणसे होती, कुणाला ऐकू नाही गेले. ती पोरगी मात्र धावत पाळण्यापाशी आली, आणि 'मूल उठलेले दिसते आहे' असे म्हणाली. काम करताना तिचे कान जसे पाळण्याकडे होते, तसे प्रपंच करताना आपले लक्ष मात्र भगवंताकडे असले पाहिजे.

**-श्रीसद्गुरू ब्रह्मचैतन्य गोंदवलकर महाराज**



सौ स्मिता कुलकर्णी
संपर्क क्र. 9881366497

# श्रावणात घन निळा बरसला... रिमझिम रेशीम धारा...

आधुनिक केसरी

**श्रावणाचे आणि मानवी जीवनातील ऊर्जेचे एक आगळे वेगळे गणित जुळलेले आहे. श्रावण म्हटलं की शुभ्र चांदण्यांचा साज ल्यायलेली, मनमोहक रूप असलेली, सात्विकतेची आभा, सौंदर्याची प्रभा, जणू पृथ्वीवर अवतरली असे वाटते. श्रावणात ऊन पावसाचा पाठ शिवणेचा जणू खेळ सुरू असतो आणि म्हणूनच बालकवी म्हणतात श्रावण मासी हर्ष मानसी... हिरवळ दाटी चोहिकडे... क्षणात येते सरसर शिरवे... क्षणात फिरून ऊन पडे... श्रावण म्हणजे व्रत, उपवास श्रद्धेचा मास.. श्रावण म्हणजे निसर्गाचे अद्भुत अवर्णनीय रुप न्याहळण्याचा मास..**

आधुनिक केसरी

श्रावण म्हणजे गृहिणीच्या पाककलेची कल्पकतेची मनमुरात दाद देण्याचा मास... श्रावण म्हणजे नववधू चे खुलते लावण्य रसिकतेने सजण्याचा मास... श्रावण म्हणजे साधू संतांची आस, देवरूप मनामनात साठवून अंतरंग उजळण्याचा मास... श्रावण म्हणजे माहेर ची ओढ ...जीवतीचे पान.. भाजलेल्या हरभऱ्याची खिरापत.. नागपंचमीचा झोका आणि उकडीचा नैवेद्य, देश स्वातंत्र्याच्या अभिमान अन दहीहंडीची रास, प्रत्येक दिवस खास.. या दिवसातील वातावरणही अल्लादायक व मन प्रसन्न करणारे असते. श्रावणातील निसर्गाचे रूप मोहनीय असते. झाडे, वने पावसाच्या पाण्यात न्हाऊन आनंदाने डोलत असतात. पृथ्वीवर हिरव्या रंगाची जणू उधळण झालेली असते. केतकीच्या बनातही आताशा मोर नाचू लागला असतो.. वृक्षवेलींचा शृंगार पाहण्यासारखा असतो. अनेक कवी मनाला भुरळ घालणाऱ्या श्रावण मासाचे वर्णन अवर्णनीय आहे. श्रावणात घन निळा बरसला.. रिमझिम रेशीम धारा... हे लतादीदींच्या गाण्याचे स्वर कानी पडले ना की श्रावण महिन्याचा आनंद द्विगणित होतो. श्रावण मास आला की नकळत माझ्या शब्दांची गुंफण होते आणि श्रावणाचे सौंदर्य मी शब्दात बांधू पाहते पण... जणू मोतीयाची माला धरणीवर विखरते एक वेचता दुसरी अवर्णन साजेचा नजरा समोर दाखवते. श्रावण म्हणजे संस्कृतीचे दर्शन देणारा सण. चैतन्य सुंदरतेचा मिलाफ. चैतन्य, सौंदर्य आणि समृद्धीचा त्रिवेणी संगम म्हणजे श्रावण. कित्येक वर्षांपासून ची रूढी, परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोचवण्याचा मार्ग म्हणजे श्रावण. रोजच्या धकाधकीच्या आयुष्यातून वेळ काढून परत अध्यात्म जप तप याकडे वळून आयुष्याची दिशा तपासणी करणे हाच या महिन्याचा उद्देश. रोजच्या धावपळीच्या जीवनातून मनाला शुचिर्भूत करणे आयुष्य जगताना ते परिपूर्ण कसे असावे हे दाखवणारा महिना म्हणजे श्रावण. ऊन पाऊस म्हणजे सुखदुःख त्याचा लपंडाव सुरूच राहणार. मनाचे सामर्थ्य वाढवून चांगल्या विचारांना बळकटी द्यावी, चांगले विचार, चांगले आचरण साधून व्रत करताना त्याचे नियम पाळून शिस्त अंगीकारण्याची सवय असण्यासाठी हा श्रावण मास. लक्ष्मीचा मान राखणे, सामाजिक भान जपणे, प्रलोभनाला बळी न पडणे, कौशल्य ओळखणे, योग्य मानसिकतेचा विचार या सगळ्यांनी परिपूर्ण असा मास म्हणजे श्रावण व्रत,वैकल्य आणि धार्मिक ते बरोबर आपल्या आर्थिक गोष्टीचे नियोजन करत सामाजिक भान जपण्याचे सामर्थ्य देणारा महिना श्रावण. एकूणच काय श्रावण मासानिमित्त व्रत, तप उपास करताना आर्थिक व्रताची सुरुवात करायला काय हरकत आहे? आर्थिक विकास म्हणजे केवळ "अर्थ" नसून समाज हित येणाऱ्या अर्थातून समाजासाठी काही सहकार्य करता येऊ शकते .ग्रंथ वाचना सोबत शैक्षणिक पुस्तके देऊ शकतो करणाऱ्याला हजारो उजळत्या दिशा दिसतात मात्र त्यावर चालण्याची मानसिकता हवी पुस्तक वाचन आरोग्य दायी खेळ चांगले संभाषण वृक्षारोपण बाल संस्कार वर्ग वैशिष्ट्य पूर्ण पदार्थ मेळावे गृहिणीच्या कला कौशल्य प्रसिद्धी असे एक ना अनेक उपक्रम ज्याने आर्थिक सुबत्ता ही येऊ शकते . व्रत, तप, उपवास आहेतच त्यासोबत सामाजिक हिताच्या विचारांचे संवर्धन करून उज्वल भविष्याची सुरुवात करता येऊ शकते प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे? एक चांगला विचार दुसऱ्याला दिल्यास त्या चांगल्या विचारांची शृंखलाच तयार होईल आणि मग श्रावणात बरसणार घननिळा लडिवाळ होण्यास वेळ लागणार नाही.

# मरण स्वस्त आणि जगणं झालं महाग...

## सरकार उठले मुळावर : सर्वसामान्यांच्या आधुनिक केसरीस प्रतिक्रिया

आधुनिक केसरी

केंद्र सरकार रोज महागाई वाढवतच असल्यामुळे जगायचे कसे? असा प्रश्न सर्वसामान्य, गोरगरीब यांना दिवसेंदिवस भीषण वाटत चालला आहे. त्यातच अलीकडे किरकोळ वस्तूवर देखील जीएसटी लादला गेला आहे. आता मिठावरही कर सरकार लावणार का? असा संतप्त सवाल जनता विचारीत आहे. म्हणूनच मरण स्वस्त आणि जगणं महाग झालं आहे अशा संतप्त प्रतिक्रिया महागाईत होरपळणारी सर्वसामान्य, गोरगरीब जनता यांच्यात उमटत आहेत.




### महागाईचा जगण्यावर झाला परिणाम...



मोदी सरकारने गोरगरीब सर्वसामान्य जनता यांना प्रचंड महागाईच्या खाईत लोटले आहे. घरगुती गॅस आणि किराणा वस्तूचे भाव गगनाला भिडले आहेत. आता जगायचे कसे? असा प्रश्न आमच्या समोर आहे. एक कमावतो आणि घरातले चार जण बसून खातात. रोजचे चारशे ते पाचशे रुपये मजुरी असणाऱ्या कुटुंबाने जगावे कसे असे वाटते. आधीच कोरोनामुळे कामधंदे बुडाले आहेत. आधी किलोने लोक किराणा नयायचे, आता 50 किंवा 100 ग्राम किराणा नेत आहेत. सरकारने आमच्या जगण्यावरच घाला घातला आहे. हे अच्छे दिन नाहीत तर बुरे दिन आहेत. म्हणून याचा थेट परिणाम आमच्या जगण्यावर झाला आहे.

अमर चव्हाण
किराणा दुकानदार, लातूर

### मेक इन इंडियावाले मिठावरही कर लादणार का?



अच्छे दिन आनेवाले है... अशी भावनिक साध घालून 2014 साली मोदी सरकार सत्तेवर आले. आणि तेव्हापासूनच जाचकअटी सर्वसामान्य गोरगरीब यांच्या माती मारल्या जात आहेत. आता ही वाढलेली महागाई आवाक्याच्या बाहेर गेली आहे. सर्व जनता मोठा आक्रोश करीत आहे. हा आक्रोश सरकारच्या कानी पडत नाही काय? आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना... अशी अवस्था जनतेची झाली आहे. मन की बातच्या पोकळ गप्पा हाणून सर्वसामान्य माणसाच्या घरातील चुल पेटणार आहे का? सार्वजनिक उद्योग, प्रकल्प घशात घालून त्यात काम करणाऱ्या गरिबांना गुलाम करण्याचे सरकारचे षडयंत्र आहे. मेक इन इंडियाच्या नावाखाली आता मिठावरही कर लादणार का? हा तळमळीचा प्रश्न आहे.

ईश्वर मस्के
व्यावसायिक, बाभळगाव लातूर




### महागाईने आमचे कंबरडे मोडले...



रोज वाढणारी महागाई आमच्या मुळावर उठली आहे. पाच ते सहा हजार रुपये महिना कमावणे घरात पुरत नाही. या प्रचंड महागाईने घर कसे चालवायचे हा प्रश्न आहे. मुलांचे शिक्षण, भाजीपाला, किराणा इतर वस्तू महागाईमुळे आवाक्या बाहेर गेल्या आहेत. जिथे दोन वेळेस स्वयंपाक व्हायचा तिथे एक वेळेस स्वयंपाक करावा लागण्याची परिस्थिती ओढावली आहे. भविष्यात यामुळे चिंता वाढतच जाणार आहेत. सरकार मात्र अच्छे दिन म्हणून आमचे कंबरडे मोडीत आहे. सर्वसामान्य, गोरगरिबांच्या पुढे सरकारने मरण वाढून ठेवले आहे. याचा भविष्यात उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही.

सुरेखा वैरागे
गृहिणी, बीड

### अच्छे दिनच्या नावाखाली होतेय लूट...



प्रचंड वाढलेल्या महागाईने सर्वसामान्य, गोरगरीब अक्षरशः भरडला जात आहे. जगभरात गॅस सिलेंडरचे भाव भारतात सर्वाधिक आहेत. जीएसटी माणसावर लादून जगणे महाग केले आहे. त्यातच बेरोजगारीचा महापूर देशाला खाईत लोटत आहे. एक राज्य- एक सत्ता काबीज करून सर्वसामान्य गोरगरिबांचे शोषण करणे सुरू आहे. हे आत्ताच थांबले नाहीत तर भविष्यात याचे गंभीर परिणाम पाहायला मिळतील. अन्न -वस्त्र- निवारा ही जगण्याची त्रिसूत्री पुढील काळात लोक पावते की काय ? अशी भीती आहे आणि म्हणून अच्छे दिनच्या नावाखाली सरळ सरळ गुलामगिरीत ढकलण्यात येत आहे.

पद्माकर उखळीकर
मुक्त पत्रकार, परळी वैजनाथ

### मानसिक गुलामगिरीत सरकार ढकलते आहे...



या सरकारला माणसाला जगू द्यायचे नाही. प्रचंड महागाई, महागडे शिक्षण, सामाजिक योजनांचा बट्ट्याबोळ, आर्थिक दबावतंत्र्यांनी सर्वसामान्य, गोरगरीब मेटाकुटीस आला आहे. या परिस्थितीमुळे माणसाला हाताने मरण स्वीकारावे लागत आहे. सरकार सर्वसामान्य गोरगरीब लोकांना गुलामगिरीत ढकलून आनंद साजरा करत आहे हे निंदनीय आहे. भविष्यात असेच सुरू राहिले तर श्रीलंकेसारखी परिस्थिती आपल्यावर ओढावू शकते. सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत माणसांचे जीवन टॅक्समध्ये होरपळले जात आहे हे थांबले पाहिजे. उच्चभ्रू लोकांचे चांगभले करणाऱ्या सरकारने ताळ्यावर येत सर्वसामान्य, गोरगरीब गोरगरिबांना न्याय दिला पाहिजे.

दत्ताबापू काळुंखे
सामाजिक कार्यकर्ते, मुंबई

## सिल्लोड येथे मुख्यमंत्री शिंदे भव्य सभा, सत्कार विविध कामाचे भूमिपूजन

### मुख्यमंत्री शिंदे यांच्या सभेस उपस्थित राहण्याचे धरमसिंग चव्हाण यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सिल्लोड येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भव्य सभा व सत्कार आमदार अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली ३१/७/२२ रविवारी जुलै रोजी दुपारी एक वाजता आयोजित करण्यात आली आहे. तरी सावळदबारा, देव्हारी, टिटवी, नादांतांडा, नादांगाव, डाभा, मोलखेडा, जामठी, रवळा, फर्दापूरसह भव्य सभेला उपस्थित राह असे आवाहन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्वागतासाठी औरंगाबाद ते सिल्लोड ६० किलोमीटर मानवी साखळी केली जाणार आहे. सिल्लोड मधील सत्कारसाठी ६० ते ७० हजार नागरिक उपस्थित राहतील, अशी माहिती आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली आहे. मा.आमदार अब्दुल सत्तार म्हाणाले,



मुख्यमंत्री ३१ जुलै रोजी औरंगाबादमध्ये येत आहेत. सिल्लोड महामार्गावर मानवी साखळी करून स्वागत केले जाईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा होणार आहे. आमदार अब्दुल सत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सभेस सोयगाव, सावळदबारा सर्कलमधील कार्यकर्ते, मित्रमंडळ, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन माजी सभापती धरमसिंग चव्हाण नादांतांडा ता.सोयगाव यांनी केले आहे.

## क्रिएटिव्ह नाईट चेस अकादमीचा उपक्रम; एकाच वेळी ६४ जणांशी बुद्धिबळाचे डावपेच

आधुनिक केसरी न्यूज

**डोंबिवली :** आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिनानिमित्त डोंबिवली येथील क्रिएटिव्ह नाईट चेस अकॅडमीतर्फे ऐरोली येथील युरो - स्कुलमध्ये एकाच वेळी ६४ जणांशी बुद्धिबळ खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय फिडे बुद्धिबळपटू व क्रिएटिव्ह नाईट चेस अकादमीचे मुख्य प्रशिक्षक अभिषेक देशपांडे व सिकेसीए चे मेंटॉर गणेश भिल्लारे यांनी विद्यार्थी व



पालक अश्या ६४ खेळाडूबरोबर एकाच वेळी सामने खेळले. युरो -स्कूल मध्ये गोलाकार रचनेत ऐकूण ३२ बुद्धिबळाचे पट व सोंगट्या ठेवण्यात आले होते. दोन सत्रात झालेल्या रंगतदार सामन्यात उपस्थित बुद्धिबळ खेळाडूंनी स्पर्धा खेळण्याचा आनंद लुटला.

ह्या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना प्रमाणपत्र व १६ उत्कृष्ट खेळाडूंना विशेष बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. मुख्य प्रशिक्षक अभिषेक देशपांडे व गणेश भिल्लारे यांनी सर्व खेळाडूंचे, पालकांचे व त्यांच्या खेळाचे कौतुक केले. भारतीय बुद्धिबळातील भविष्यातील चॅम्पियन घडविण्यासाठी विविध बुद्धिबळ कार्यक्रमाद्वारे क्रिएटिव्ह नाईट चेस अकादमी व युरो - स्कूल असे उपक्रमावर भर देण्याचे असल्याचे अभिषेक देशपांडे यांनी यावेळी सांगितले.

## ट्रक ड्रायव्हरच्या मुलाने वेटलिफ्टिंगमध्ये जिंकले कांस्यपदक


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय वेटलिफ्टर गुरुराज पुजारीने पुरुषांच्या 61 किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकले. राष्ट्रकुल 2022 मधील भारताचे हे दुसरे पदक आहे. या सामन्यातील सुवर्णपदक मलेशियाच्या मोहम्मद अंजीलने पटकावले. त्याचवेळी पापुआ न्यू गिनीच्या मोरे बेयूने रौप्य पदक जिंकण्यात यश मिळविले. गुरुराज पुजारीने केवळ 269 किलो वजन उचलून पदक जिंकले. पुजारीने स्नॅचमध्ये 118 किलो आणि क्लीन अँड जर्कमध्ये 151 किलो वजन उचलले.

विजेत्या गुरुराजाचा आतापर्यंतचा प्रवास खूप खडतर होता. त्याचे वडील ट्रक चालक होते. गुरुराजाला आणखी चार भाऊ आहेत आणि एवढ्या मोठ्या कुटुंबासोबत राहणे कधीच सोपे नव्हते. गुरुराजाचे वडील त्याला वेटलिफ्टरला आवश्यक असलेला आहार देऊ शकत नव्हते. पण या गरीब कुटुंबातील मुलाने हार मानली नाही. वेटलिफ्टरपूर्वी गुरुराजा कुस्तीपटू होता. 2008 साली सुशील कुमारने ऑलिम्पिक पदक जिंकून हा खेळाडू खूप प्रभावित झाला होता. कर्नाटकातील उडीपी जिल्ह्यातील एका छोट्या गावात राहणाऱ्या गुरुराजाने आपणही देशासाठी पदक जिंकणार असा निर्धार केला होता.



# ज्ञान-भक्ती-कर्म या मार्गाचा त्रिवेणी संगम राष्ट्रसंत शांतीब्रह्म श्री. भगवानबाबा



सुनिल सिरसाट
संपर्क क्र. 9529715176

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या पावनभूमीत संत ज्ञानेश्वर महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत मुक्ताबाई, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत रामदास स्वामी, संत गाडगे महाराज, संत गोरा कुंभार, संत चोखा मेळा, संत नामदेव महाराज, संत कान्होपात्रा, संत गजानन महाराज, संत स्वामी समर्थ, साईबाबा, संत अवजीनाथ महाराज, संत सद्गुरु वामनभाऊ महाराज, संत सावता महाराज असे संत महापुरुष, सिद्धपुरुष, होऊन गेले असेच राष्ट्र संत भगवानबाबा ज्यांनी जातीभेद, धर्मभेद, वर्ण-रंग, रुप अशा गोष्टींना कधीही थारा दिला नाही. याचे कृतीशील उदाहरण म्हणून त्यांनी आपले उत्तराधिकारी म्हणून आणि भगवानगडाचे महंत म्हणून ह.भ.प. भीमसिंह महाराज राजपूत यांची निवड केली. बाबांच्या महान अलौकीक कार्यास तारखेप्रमाणे नुकत्याच पार पडलेल्या आणि तिथीनुसार लवकरच येणाऱ्या जयंतीनिमित्त कोटी कोटी वंदन.......!!**

राष्ट्रसंत भगवानबाबा आणि अध्यात्म व भक्तगण असे हे फिट्ट जमलेले समीकरण म्हणजे एकाला वजा केले तर दुसरा अपुर्ण. कारण की ईश्वर दयाळू आहे हे अक्षम्य चुका करणाऱ्या माणसाला नाकारता येणारं नाही. परंतु ईश्वर एक स्पेशल डिझायनर आणि एडिटर देखील आहे. जो प्रत्येकाला या भूतालावर त्याच्या आयुष्याचे ध्येय कानात सांगून पाठवतो. असे कधी-कधी वाटू लागते. कारण संत-महंत हे जन्माला येतात आणि त्यांच्या क्षेत्रात अतुल्य कार्य करतात. असेच राष्ट्रसंत भगवानबाबा जे भक्ती-शक्ती आणि युक्तीचा त्रिवेणी संगम म्हणता येईल. कारण ईतिहासाच्या पाऊलखुणा शोधायला गेले तर राज्यातील महत्वांच्या संतांना खूप खडतर कठीण प्रवास करावा लागला. त्यापैकीच एक राष्ट्रसंत भगवानबाबा ज्यांची तिथी प्रमाणे काल-परवा नुकतीच जयंती पार पडली......!

आयुष्याच्या प्रवासात अखंड जीवन खडतर संघर्ष आला तरी आपल्या बुद्धीकल्पकतेने संघर्षावर मात केलेले महाबली वीर हनुमान आणि विश्वरत्न संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्यासारखं खडतर ब्रह्मचार्य व्रत स्वीकारुन लोककल्याणासाठी जीवन समर्पित करण्याचा वारकरी सांप्रदायाचे दैवत प्रभु विठ्ठलासमक्ष संकल्प करुन गुरुमंत्र मिळविण्यासाठी दिव्य अशी परीक्षा दिली. बाल अवस्थेत 70 फुट उंचीच्या शिखरावरुन बाल आबाजी (भगवानबाबा) यांनी उडी मारल्यावर साक्षात गुरुंना गरुडावर बसून भगवान विष्णु यावेत अशा अनुभवाची चुणूक झाल्याने बाल आबाजीचे गुरु संत माणिकबाबा यांनी आबाजीचे 'भगवान' असे नामकरण केले. पुढील काही दिवसातच नारायणगडाचे उत्तराधिकारी म्हणून निवड केली. परंतु जनकल्याण करण्यासाठी आणि ईश्वराचा बोध सर्व सामान्य लोकांना झाला पाहिजे यासाठी कठीण तपस्या योगेश्वरी देवीचे पीठ असणारे अंबाईनगरी म्हणजे आजचे अंबाजोगाई येथून जवळच असणार्या मुकूंदराज यांच्या समाधी मंदिराच्या गुहेत निर्जळ अडीच वर्षे निरंकार उपवास करत परमेश्वराची तपसाधना केली. सोबतीला अनेक साप, वाघ, हिंस्त्र पशु आजु-बाजुला बसलेले असायचे. याचे अनेक लोक साक्षीदार आहेत. सर्प तर अक्षरशः अंगावर खेळायचे या कठीण परिस्थितीत तपस्या पुर्ण करुन ज्ञानेश्वरी पारायण करुन नवनिधी अष्टसिद्धी प्राप्त केल्या तेथून परत आल्यानंतर संतश्रेष्ठ उच्चकोटीचे गुरु बंकट स्वामी महाराज यांची भेट झाल्यानंतर बंकटस्वामी महाराजांनी आपल्या सोबत आळंदी येथे अध्यात्मिक शिक्षण पुर्ण करुन परत आल्यानंतर अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून लोकांच्या मनात अध्यात्मिक गोडी निर्माण करण्यासाठी नारळी सप्ताह उत्सवाची परंपरा सुरु केली. जुलमी निजामशाही राजवटीच्या कालखंडात अहिंसेच्या मार्गाने हिंदु धर्मात पवित्र आणि पुजनीय मानल्या जाणार्या गायीची हत्या रोखण्यासाठी चिंचाळा येथे गायीला मिठी मारुन गोहत्या थांबवली. त्याप्रसंगानंतर अनेक ठिकाणी गोहत्या बंदीचा लढा त्या काळीच संत भगवानबाबा यांच्या प्रेरणेतून निर्माण झाला.

देशाला स्वातंत्र्य मिळण्यासाठी जो परकीय सत्तेविरुद्ध लढा चालू होता त्यामध्ये अहिंसेच्या मार्गाने सहभाग नोंदवून अनेक लोकांचे मनाधैर्य वाढवून त्यांना धिर दिला, एकत्र आणले, अन्यायाच्या विरोधात अध्यात्मिक ज्ञानशक्तीच्या बळावर आपण लढू शकतो व जिंकू शकतो. ही प्रेरणा, ही स्फुर्ती अनेक देशप्रेमींच्या मनात निर्माण केली.

मराठवाडा मुक्तीसंग्राम जो निजामशाहीच्या विरोधात लढा चालू होता. त्यामध्ये सुद्धा अनमोल आणि अतुलनीय असे योगदान देवून निजामाच्या ताब्यातून मराठवाडा मुक्त होण्यासाठी सुवर्ण अक्षरांनी लिहावे एवढं मोठं योगदान राष्ट्रसंत भगवानबाबा यांचे आहे. शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि घराघरात शिक्षण पोहोचले तर प्रचंड हुशार आणि तल्लख असणारी ही माणसे यांची कार्यशक्ती योग्य मार्गाला लागून त्याचे सुयोग्य परिणाम होतील. ही काळाची गरज ओळखून शिक्षणाची ज्ञानगंगा बहुजन समाजाच्या दारात आणण्याचे महान कार्य आधुनिक भगिरथ म्हणून संत भगवानबाबा यांचा उल्लेख क्रमप्राप्त आहे. ज्यांनी भक्ती आणि शक्तीचा व्यासपीठ असलेल्या भगवानगडावर अशक्य असतांना विद्यालयाची स्थापना करत गोरगरीब मुलांची उच्च शिक्षणाची सोय केली. आणि औरंगाबाद (संभाजीनगर) सारख्या ठिकाणी अन्नछत्र नावाने बोर्डींग चालू केली. ज्यामध्ये हजारोच्या संख्येने शिक्षण घेवून विद्यार्थी मोठे झाले. रुढी, परंपरा, अंधश्रद्धा या विळख्यात सापडलेला समाज अध्यात्माच्या माध्यमातून योग्य मार्गावर आणण्याचे अनमोल कार्य केले. तसेच निजामकालीन राजवटीत धर्म संकटात असतांना सर्वांचे एकीकरण करण्यासाठी अखंड हरिनाम सप्ताह, नारळी सप्ताह, दिंडी, भजन किर्तन असे उत्सव स्वतःच्या पुढाकारातून भरवुन ऐक्य निर्माण केले आणि हिंदु बांधवांना जागृत केले.



नारायणगडावर असतांना महंत पदावरुन वाद विकोपाला जावू नये म्हणून महंत पद हे भिक्षेची झोळी आहे. असं आपल्या भक्तांना समजावून हिमालयात जाण्याचा निर्णय भगवानबाबा यांनी घेतला परंतू खरवंडीचे बाजीराव पाटील यांच्या मातोश्री व सद्गुरु बंकट स्वामींचे शिष्य यांनी संत भगवानबाबा परत यावेत म्हणून केलेला अन्न त्याग व बाजीराव पाटील यांचे चाणाक्ष प्रयत्न व सदगुरु सहजानंद भारती यांची योग्य शिष्टाई मुळे भगवानबाबांना परत यावे लागले व बहुजनांना हक्काचं धर्मपीठ म्हणून धौम्य गडाची खरवंडीच्या डोंगरावर स्थापना केली. पुढे याच धौम्यगडाचं राज्याचे तात्कालीन मुख्यमंत्री श्री.यशवंतरावजी चव्हाण साहेब यांनी आपले ऐतिहासिक मनोगत व्यक्त करतांना राजा-महाराजांनी शस्त्र, तलवार, गाजवून अनेक गड बांधले, जिंकले मला वाटले तशाच पद्धतीचा हा पण गड असेल परंतू येथे ह.भ.प.परमपुज्य शांतीब्रह्म भगवानबाबांनी वेदशास्त्र गाजवून गड बांधला आहे. माझे सहकारी ना.श्री.बाळासाहेब भारदे यांनी आपल्याबद्दल अनेक विशेष उल्लेखनीय माहिती सांगितली आहे. मी स्वतः पंढरीच्या पांडूरंगांचा वारकरी आहे. देवावर आणि दैवावर माझा पुर्ण विश्वास आहे. देशभर वारकरी सांप्रदायाची भगवी पताका फडकत आहे. गड, किल्ले येथूनच महाराष्ट्राचा राजकीय आणि अध्यात्मिक कारभार चालत आलेला आहे आणि तसाच तो पुढेही चालत राहणार आहे. हा भगवानगड अध्यात्मिक क्षेत्रात अढळ असा नवा धुर्वतारा म्हणून आज निर्माण झाला आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज यांच्यापासून संत एकनाथ महाराज यांच्या पर्यंत सर्व संतावर त्या-त्या काळातील दुर्जनांनी अन्याय केला त्रास दिला. परंतू ते शांतीब्रह्म असल्याने लोकांवर न रागवता त्यांच्या अपराधाला क्षमा करुनच उदारता दाखवली. जगाच्या कल्याणासाठी संतांच्या विभुती जन्म घेत असतात. भगवानबाबा तर बैसोनी पाणावरी वाचियेली ज्ञानेश्वरी आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी भगवानबाबांचा सिंहाचा वाटा आहे तसेच मराठवाडास्थित निजामाच्या अन्याया-अत्याचाराविरोधात लोकांच्या मनात अध्यात्माच्या माध्यमातून प्रेरणादायी शक्ती निर्माण करुन खुप मोठी स्वातंत्र्यसैनिकाची फळी बाबांच्या माध्यमातून उभी राहीली. अंधश्रद्धा निर्मुलन, पशु हत्या, शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार अध्यात्मिक ज्ञानाच्या माध्यमातून लोकांच्या जिवनामध्ये जागृती अनेक लोकांमध्ये अध्यात्मिक वाढीस लावण्यासाठी केलेले अहोरात्र प्रयत्न हे सर्व भगवानबाबांचे कार्य सुवर्ण अक्षराने लिहिण्यासारखे आहे. बाबांनी अनेक शाळा सुरु केल्या, वसतीगृहे चालविली, औरंगाबाद सारख्या शहरात गोर-गरीब मुलांच्या उच्च शिक्षणासाठी बोर्डींग चालू केली. धौम्य गडावर चालू केलेल्या शाळेचे मी आज उद्घाटन झाले असे जाहीर करतो. भगवानबाबा यांनी केलेले कार्य आणि त्यांची किर्ती अलौकिक आहे मी पूर्वी ऐकलेली किर्ती आणि येथे आल्यापासून पाहिलेला जनसमुदाय कार्यकर्ते अध्यात्मिक राजकीय, सरकारी क्षेत्रातील तसेच विविध क्षेत्रातील बाबांच्या प्रती असलेली ही प्रचंड श्रद्धा बाबांचे अलौकीक कार्य आणि लोकमताचा आदर म्हणून राज्याचा मुख्यमंत्री या नात्याने धौम्यगडाचे "भगवानगड" असे नामकरण घोषित करतो असे तात्कालीन मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी शिक्कामोर्तब केले.

**लेखक पत्रकार आणि अखंड हिंदुराष्ट्र संघटनेचे प्रदेशाध्यक्ष आहेत.**

# थोडी थोडीभी मत पिया करो



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**जीवनाचे सारतत्त्व काय? तर सुखप्राप्ती. कोणाला जाता पंढरीसी सुख वाटे जिवा तर कोणाला ठायीच बसून एकचित्त करण्यात सुख. कोणाच्या मनात रात्रंदिन वासनापूर्तीचे डोहाळे तर कोणी धनसंचय करण्यात मग्न. शेवटी सार एकच. सुख मिळवणे. मदिरा प्राशन हाही त्यातलाच एक भाग. सोप्या शब्दात दारू ढोसणे. श्रावण महिना जसजसा जवळ येऊ लागतो तसे अधिकाधिक मद्याची मागणी वाढू लागते. कारण आषाढात जास्तीत जास्त पिऊन घ्यायची आणि श्रावण पाळायचा. कारण पुन्हा तेच सुखप्राप्ती.**

कोरोना काळात दारूसाठीच्या लांबच लांब रांगा आपण दूरचित्रवाणीवर पाहिल्या. शहरात मद्य मिळण्याची तरी शाश्वती, पण खेड्यापाड्यातील हे वीर पुरुष मैलोनमैल अनिश्चित दिशेने पायपीट करायचे. कारण एकच. सुखप्राप्ती. दारू हे वाईट व्यसन आहे, हे प्रत्येक पिणाऱ्याला माहीत असते. आपण काही समजून सांगावे असे थोडेच आहे. पैसा, पद, प्रतिष्ठा, घर-संसार पणाला लावून दारू प्राशन करतात म्हणजे त्यात पिणाऱ्याच्या दृष्टीने नक्कीच काहीतरी अलौकिक वगैरे असले पाहिजे. सुख मिळविण्याचा अत्यंत शॉर्टकट म्हणजे मद्यप्राशन. माणूस असे अनेक शॉर्टकट अनेकवेळा वापरतो. हा मार्ग तुम्हाला इप्सित मिळवून देत असला तरी जीवनातला आनंद मात्र घालवून बसतो. कारण आनंद कोठे पोहचण्यात नसतोच तर आनंद असतो तो त्यासाठी केलेल्या प्रवासात. प्रेयसी पत्नी झाल्यानंतर आनंदी असणारे फार कमी असतात, त्याचे कारणच यात दडले आहे. मिळविण्याच्या प्रवासातील आनंद आणि प्राप्तीनंतरचे सुख यात अंतर आहे. आपण आनंदाकडे दुर्लक्ष करून कपोलकल्पित सुखाच्या मागे धावतो आहोत. दारू वाईट आहे का? नाही. ती वाईट असती तर औषधीमध्ये अल्कोहोल मिसळल्या गेले नसते. पण त्या वस्तूचा वापर आपण का आणि कशासाठी करत आहोत, त्यावर तिचे बरेवाईटपण ठरत असते. आता श्रावण सुरू होणार म्हटले की अगदी नको तेवढी प्यायची आणि हसे करून घ्यायचे. या दारूच्या व्यसनापायी कित्येक माणसे, कुटुंब अक्षरशः उद्ध्वस्त झाल्याचे आपण समाजात पाहतो. तरीही हा पिण्याचा मोह आवरता येत नाही. पिणारी सर्वच माणसे वाईट असतात असे नसले तरी पिणे कधीही वाईटच. आपल्या एकट्याच्या सुखासाठी संपूर्ण कुटुंबाला वेठीस धरणे आणि पैश्यासोबतच आपल्या तब्येतीचेही वाटोळे करून घेणे, हे समर्थनीय होऊ शकत नाही. पिणारा माणूस हरतऱ्हेचे समर्थन करत असतो. या पिणाऱ्यांचे देखील अनेक प्रकार आहेत. दररोज एकट्याने घरीच पिणारे, दररोज मित्रांसोबत पिणारे, कोणी पाजलं तर पिणारे, कधीमधी प्रसंगपरत्वे पिणारे, घरीबन पिटा फक्त बाहेरच पिणारे, घरची मंडळी माहेरी गेल्यानंतर पिणारे असे एक ना अनेक




प्रकार पिणाऱ्यांचे असू शकतात. प्रकार कोणताही असला तरी तो वाईटच. पिणाऱ्या माणसाचे हमखास म्हणणे असते ते म्हणजे मला काय ताण आहे, हे तुम्हाला माहित नाही. ताण नसणारा माणूस या जगात शोधून सापडणार नाही. अगदी संसाराचा त्याग करून हिमालयात गेलेला साधू देखील त्यास अपवाद असू शकणार नाही. त्याला स्वतःचा पंचा धुण्याचा तरी ताण असेल किंवा भगवंत कधी भेटेल या अनिश्चिततेचा तरी ताण असेल. म्हणजे ताण ही काही फार मोठी गोष्ट निश्चितच नाही, की जिचा आपण एवढा बाऊ करत असतो. या समाजाला दिशा देऊ शकतील आणि आदर्श निर्माण करू शकतील अशा अनेक व्यक्ती आपण केवळ पिण्यामुळे वाया गेल्याचे आपण अनेकदा पाहत आलो आहोत.

दारू पिण्याचा पहिला दृश्य परिणाम म्हणजे कुटुंबात कलह निर्माण होणे, या कलहातून पुन्हा ताण निर्माण होणे आणि या कथित ताणातून पुन्हा दारूच्या आहारी जाणे. हे एक दुष्टचक्र आहे. आहारी जाऊन पुन्हा त्यापासून सुटका करून घेणारा लाखात एखादाच असू शकतो. केवळ मजा म्हणून, मित्राने आग्रह केला म्हणून अथवा त्यात काय असते हे पाहण्यासाठी देखील नवगतांनी त्याकडे वळू नये. समाजात असे अनेक तळीराम सुधाकराचे आयुष्य संपवायला अगदी आतूर असतात. अनेकदा आपल्या सामाजिक कार्याचा विस्तार व्हावा आणि आपले काम निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी काहीजण या मार्गाकडे वळतात. हे सामाजिक काम असते तरी कोणते? आपण किती मोठमोठ्या लोकांत वावरतो हे दाखविणे आणि आपल्या किती ओळखी आहेत, हे सोबतीला असणाऱ्यावर बिंबवणे. पण हा अत्यंत घातकी आणि तेवढाच पोरकट प्रकार आहे. हा मनुष्यजन्म एकदाच मिळाला त्याचे काही चीज झाले पाहिजे, हे ज्याला कोणाला वाटते त्याने पहिल्या पेल्यास नकार दिला तर पुढील अनर्थ टळू शकतो. अन्यतः भविष्यात जे काही वाटोळे होणार आहे त्याची पायाभरणी अपल्याच हाताने करण्यात काय अर्थ आहे? ज्या हरिवंशराय बच्चन यांनी मधुशाला या अप्रतिम काव्याची निर्मिती केली त्यांनी आयुष्यात कधीच पेल्याला हात देखील लावला नाही, असे सांगितले जाते. विशेषतः सृजनात्मक निर्मिती करणाऱ्यांचात पिल्याशिवाय तंद्री लागत नाही, हा एक मोठा अंधविश्वास मूळ धरून आहे. आपल्या अंतरंगाशी तादात्म्य पावायला अशा कोणत्याच बाह्य वस्तूंची गरज नसते. कमी क्षमता असलेल्या पण मोठी स्वप्न उराशी बाळगणाऱ्या व्यक्तीच नशेच्या आहारी जातात. ध्यानासारखी मोठी नशा या जगात शोधून सापडणार नाही. हा आनंद अनिर्वचणीय असतो. कोण्याही व्यक्तीला प्रयत्नपूर्वक तो मिळवता येऊ शकतो. पण आपणांस विनासायास सुखप्राप्ती हवी असते, म्हणून आपण अशा दारूसारख्या नशेच्या आहारी जातो.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

## बोंबाबोंब कशासाठी?

**या जगात किमान पाचलाख लोक मद्यसेवन केल्याने दरवर्षी मरतात. कित्येक दुर्धर आजाराला बळी पडतात, कुटुंब रस्त्यावर येतात. तरीही आम्हाला ज्यांच्यावर प्रेम करतोत त्यांच्यासाठी दारू सोडू वाटत नसेल, तर आमचे जगणे व्यर्थ आहे. ज्या आई वडिलांनी तळहाताच्या फोडाप्रमाणे आपल्याला जपले, ज्या पत्नीने मोठ्या विश्वासाने सर्वस्व सोडून तुमच्या खांद्यावर डोके ठेवले, मुलांनी आशाळभूत नजरेने आणि मोठ्या अपेक्षेने तुमच्याकडे पाहिले या कोणासाठीच जर तुमचे मन द्रवत नसेल तर समाज, जग, विश्वबंधुत्व या केवळ गप्पा मारण्याच्या गोष्टी आहेत.**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अण्णाभाऊ साठे : संयुक्त महाराष्ट्राच्या क्रांतीचे जनक



सुनिल एस. साळवे
धामणगाव, ता. बदनापूर

आधुनिक केसरी

**अण्णाभाऊ साठे हे समाजसुधारक आणि क्रांतिकारक विचारसरणीचे लेखक होते. त्यांचा जन्म सांगलीत १ ऑगस्ट १९२० साली झाला. सर्वसामान्यांना सहज समजेल अशा ग्रामीण भाषेतून शाहीरी करत त्यांनी आयुष्यभर वंचितांसाठी समाजप्रबोधन केले. जातीव्यवस्था आणि गरीबीमुळे ते शिक्षण घेऊ शकले नाही. मात्र ज्या काळामध्ये शिक्षण घेणं खरोखरच जिकरीचं होतं त्या काळात अगदी अवघी दीड दिवसाची शाळा शिकलेल्या अण्णाभाऊंनी साहित्य क्षेत्रात मात्र खूप मोठी झेप घेतली. लेखणी आणि प्रतिभेच्या बळावर त्यांनी अनेक पुस्तके लिहीली.**

कादंबरीकार, लोकशाहीर म्हणून त्यांना समाजात आजही मानाचे स्थान आहे. त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीला राज्य सरकारचा उत्कृष्ठ कांदबरीचा पुरस्कार मिळालेला आहे. यासोबतच त्यांच्या अनेक कांदबऱ्या प्रसिद्ध आहेत. एवढंच नाही तर त्यांचे साहित्य चौदा भारतीय भाषा आणि त्याचबरोबर इंग्रजी, जर्मन, रशियन अशा अनेक परदेशी भाषेतही प्रसिद्ध आहे. आदरणीय अण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्यांमधून जनजागृतीचे कार्य केले होते. त्यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अत्यंत मोलाचे योगदान लाभलेले आहे. अण्णाभाऊ साठेंचे क्रांतिकारक विचार, कविता, शायरी, आणि पोवाडे आजही अभिमानाने गायले जातात. त्यांची मुंबई शहरातील वास्तववादी लिखानावर आधारित'माझी मैना गावांवर राहिली' ही छक्कड आजही अजरामर आहे.

अण्णाभाऊंनी कथा, कांदबऱ्या, पोवाडे, लावणी, नाटक, लोकनाट्य, पद, गीते अशा अनेक प्रकारचे साहित्य लिहीले. आणि समाजाला त्यांनी खालील विचार दिले.

1) अनिष्ठ धर्माच्या आचरणाने माणसांना हीन समजणे हा धर्म नसून तो एक रोग आहे

2) हे मानवा तू गुलाम नाहीस, तू या वास्तव जगाचा निर्माता आहेस.

3) पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरली नसून, कष्टकऱ्यांच्या व श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे.

4) जग बदल घालूनी घाव, आम्हा सांगून गेले भीमराव

5) नैराश्य हे तलवारीवर साचलेल्या धुळीसारखे असते, धुळ झटकली की ती तलवार पुन्हा धारदार बनते.



6) जात हे वास्तव आहे, गरिबी ही कृत्रिम आहे, गरिबी नष्ट करता येऊ शकते. परंतु जात नष्ट करणे आपले सर्वांचे काम आहे

7) निळ्या रक्ताची धमक बघ, स्वाभिमानाची आग आहे, घाबरू नकोस कुणाच्या बापाला, तू भीमाचा वाघ आहेस

8) दलितांतही सर्व भावना इतरांप्रमाणे सदैव जागृत असतात. पण तो इतरांपेक्षा जरा निराळा असतो. कारण तो हाडामासांचा केवळ गोळा नसतो. तो निर्मितीक्षम असतो. तो वास्तव जगात कष्टाचे सागर उपसून दौलतीचे डोंगर रचतो. अशा या महान मानवावर महाकाव्य रचणार त्याला हवा असतो.

9) मुंबईत उंचावरी, मलबार हिल इंद्रपुरी, कुबेराची वस्ती तिथं सुख भोगती, परळात राहणारे, रात दिवस राबणारे, मिळेल ते खाऊन घाम गाळती

10) कला ही नेहमी गरिबाच्या झोपडीत जन्माला येते, महालात जन्माला येतात ती गरिबाचे रक्त पिणारी ढेकण....

समाजात जगण्यासाठी जे दिले ज्यांनी अभिमानाचे स्थान, लोककलेतून केले त्यांनी जनमनाचे पुनर्निर्माण.... अशा या थोर क्रांतिकारी महामानवांस आणि साहित्यातील कोहिनुर हिऱ्यास जयंती निमित्त विनम्र-विनम्र अभिवादन...!!

# अण्णाभाऊ साठे यांच्या लावणी आणि पोवाड्यातील स्त्री



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**मैना या रचनेमध्ये मुंबई गिरणी कामगारांचे जीवन, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, राजकीय सीमावाद अशा गोष्टी अण्णाभाऊंनी मांडल्या आहेत ते सर्व तत्कालीन प्रश्न फार महत्त्वाचे होते आज थोड्याफार अंतराने त्यातील अनेक प्रश्न मिटले आहेत, मिटला नाही तो फक्त एकच प्रश्न गरिबी दारिद्रय आणि त्या दारिद्र्यावर मात करण्यासाठी पतीचे देशांतरीस जाणे आणि स्त्रीचे पती विरहात वाट पाहणे, एकटेपणाचा वनवास सोसणे. अण्णाभाऊ साठे यांच्या लावण्या आणि पोवाडे यामधून गिरणी कामगार, त्यातील गरिबी दारिद्र्य देशविदेशातील चळवळी त्या चळवळीमधील स्त्रियांचे योगदान, कधी स्त्रियांची गौरव गाथा तर कधी पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांची होणारी अवहेलना कुचंबणा इत्यादी अधोरेखीत झालेले दिसून येते. वगनाट्य लेखक, कलावंत, सामाजिक कार्यकर्ते,कथाकार आणि कादंबरीकार, प्रवास वर्णन करणारे सिद्धहस्त लेखक म्हणून अण्णाभाऊ साठे यांच्याकडे जितक्या आदराने पाहिले जाते तितक्याच तोलामोलाच्या आणि महत्वाच्या रचना त्यांच्या पोवाडे आणि लावणी या प्रकारांमध्ये आढळतात. कष्टकरी कामगार वर्ग, दारिद्र, स्त्री विषयक समस्या या सर्वांमध्ये आपला स्वाभिमान टिकवून जीवनाशी दोन हात करणारी स्वाभिमानी, धीरोदात्त स्त्री अण्णाभाऊ साठे ह्यांच्या रचनेत आढळते.**

मराठी साहित्य सृष्टी मध्ये ज्यांची ओळख साहित्यसम्राट या नावाने आहे असे थोर साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांचा जन्म वाटेगाव या गावी दिनांक 1 ऑगस्ट 1920 रोजी झाला. तुकाराम भाऊराव साठे म्हणजेच अण्णाभाऊ साठे यांनी अठराविश्व दारिद्र्य आणि समाजाच्या उपयुक्त चटके सातत्याने सहन केले. त्यांचे एकंदर साहित्य खऱ्या अर्थाने कादंबरी आणि कथा ही त्यांची ओळख, त्यामध्ये त्यांच्या जीवनाचे दारिद्र्याचे आणि अपेक्षित जीवनाचे चित्रण झालेले दिसते. लोकनाट्यचे जनक असलेले अण्णाभाऊ साठे यांनी चतुरस्त्र लेखन केले. मात्र तरीही त्यांनी कविता हा प्रकार जास्त हाताळलेला नाही. खरे म्हणजे त्यांच्या कविता पोवाडा आणि लावणी या प्रकारात मोडणाऱ्या आहेत. अशिक्षित असलेल्या अण्णाभाऊ साठे सारख्या विश्वविख्यात साहित्यिकाच्या लेखणी मधून स्त्रीच्या वैश्विक पातळीवरील जाणिवा आणि नेणिवा यांचे दर्शन होते. स्तालिनग्राड येथे झालेल्या उठावाचा एक पोवाडा अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेला आहे स्तालिनग्राडचा पोवाडा असे त्याचे नाव आहे. हिटलरच्या नाझी सैन्याने फ्रांसवर तसेच सोविएत रशिया वर हल्ला केला त्यावेळी त्यांना केलेला प्रतिकार या पोवाड्यातून व्यक्त झाला आहे. स्तालिनग्राड हे रशियातील एक मुख्य शहर तेथे झालेल्या रणसंग्रामाचा वृत्तांत पोवाड्या मध्ये अण्णाभाऊ साठे यांनी व्यक्त केला आहे.

लेलीनची ध्वजा उभारून।
करावया देह कुर्बान। धावली अबला तरुण।।

या ओळी मधून रशियाच्या लाल सैन्यासह नाझीविरुद्ध लढायला, आणि आलेले परचक्र दूर सारायला महिलासुद्धा आघाडीवर होत्या हे आपल्या लक्षात येते. ह्या युद्धामध्ये रशियन स्त्रियांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. जगी शूर स्त्रिया फार झाल्या। कितीक होतील। कितीक असतील। परी बिनजोड रुसी ललना। उचलूनी कठीण बंदुकीला। गोळी पुढे मान करी अबला। लावून शस्त्र कमरेला। निघाली समराला। नाझी चिरण्याला। चमकली ललना लोकयुद्धात। घेऊन तीव्र शस्त्र हातात। लाल रशियाच्या लाल राज्यात।।

आलेल्या परचक्रा समोर बंदूक आणि तलवार एकाच वेळी घेऊन शत्रूचा सामना करण्यासाठी उभी राहिलेली रशियन स्त्री खरोखरच गौरवास पात्र आहे. मरू किंवा मारू या तत्वाने या महिला लढल्या आणि जवळपास हरलेली लढाई स्वतःच्या अस्मितेने त्यानी जिवंत केली.

जी दिसली कामकरी तीच शेतावर। ती विमान चालवी
उत्तम घोडेस्वार।। बंदूक मारी ती उभी आरमारावर।।
धडाधड धावे ती रेड आर्मी बरोबर।।

या ओळी म्हणून आपल्या असे लक्षात येते की जी शेतामध्ये काम करणारी कामगार स्त्री होती ती वेळ प्रसंग पाहून विमान चालवणे, घोड्यावर बसणे, थोडक्यात वायुदल, नौकादल, पायदळ, घोडेस्वार पथक अशा सर्व प्रकाराच्या सैन्यामध्ये रशियन स्त्री उतरली होती आणि लाल सैन्याच्या बरोबरीने शत्रु सोबत लढत होती. हे खरोखरच इतिहासातील प्रेरक पान आहे यात शंका नाही. आणि ते स्त्री गौरवार्थ अण्णाभाऊ साठे यांच्या लेखणीतून लिहिले जाऊन सुवर्ण पान झाले आहे असे वाटते. रशियन स्त्रियांच्या ह्या पराक्रमाच्या जोडीनेच महाराष्ट्राची परंपरा या पोवाडा मध्ये अण्णाभाऊ साठे यांनी झाशीची राणी लक्ष्मीबाई, त्याचप्रमाणे वीर माता हिरकणी यांचा सुद्धा गौरव केला आहे.

धारातीर्थी लक्ष्मीबाईनी देह ठेविला।
पुढे हसत तात्या टोपे फासावर गेला।

या ओळींमधून 1857 चा राष्ट्रीय उठाव मध्ये तात्या टोपे इतकेच महत्व राणी लक्ष्मीबाई यांच्या बलिदानाला आहे याचाच अर्थ 1857 चा राष्ट्रीय उठाव मध्ये देशासाठी लढणाऱ्या आणि मरणार यामध्ये स्त्रियासुद्धा पुरुषांइतक्याच अग्रेसर होत्या असे आपल्या लक्षात येते. गिरणी कामगार म्हणून काम करताना अण्णाभाऊ साठे यांनी मुंबईच्या गिरणी कामगारांचे जीवन त्याचवेळी संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गिरणी कामगारांच्या अडचणी समस्या, गिरणी बंद असल्यावर पोटासाठी किंवा जीवन जगण्यासाठी केलेल्या वेगवेगळ्या तडजोडी जवळून पहिल्या, मुंबईची लावणी या लावणी मध्ये मुंबईच्या वेगवेगळ्या भागाचे वर्णन करताना अण्णाभाऊ एका ठिकाणी म्हणतात,

फोरास रोड तीन बत्ती। गोलपिठा नाक्यावरती।
शरीर विकून किती एक पोट भरती।।


खरेतर गिरणी कामगारांमुळे गिरणीची चाके फिरत मात्र कधी वेगवेगळ्या अडचणी, कामगाराच्या संघटना, युनियनच्या मागण्या कधी मालकाची अरेरावी या सर्व मध्ये बराच वेळी कामगार भरडला जायचा. गिरणी बंद करायची, गिरणी बंद राहिली मग बायका लेकरे उपाशी राहायची. आणि मग गोलपीठा नाक्यावर लेकरा बाळांचे पोट भरण्यासाठी किंवा स्वतः जीवन जगण्यासाठी स्त्रिया नाईलाजाने स्वतःचे शरीर विकण्यासाठी तयार होत. गोलपीठा नाक्यावरून जमा होणारी स्त्रियांची गर्दी आणि त्यांच्या शरीरासाठी दाम मोजणारे पुरुष हे अस्वस्थ करणारे विलक्षण चित्र अण्णाभाऊ नेहमी पाहत. तेथे बाया शरीरविक्रय करतात त्यामागे घरी असलेल्या चिलीपिल्यांची पोट भरणे हा हेतू गृहीत होता. आई किंवा स्त्री प्रसंगी स्वतःच्या शीलाचा लीलाव करते पण आपल्या लेकरांना उपाशी झोपताना पाहू शकत नाही याची जाणीव अण्णाभाऊ साठे यांनी करून दिली आहे असे वाटते. महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया गीतामध्ये महाराष्ट्राचे गुणगौरव करत अण्णाभाऊ साठे म्हणतात,

ही माय भूमी धीरांची। शासनकर्त्या वीरांची,
घामाची आणि श्रमाची। खुरप्याची आणि दोरीची.

वरवर पाहता या कवितेमध्ये स्त्री शक्तीबद्दल स्पष्ट उल्लेख होताना दिसत नाही. मात्र महाराष्ट्र परंपरा आठवली असता शेतामध्ये शेतकऱ्याची सहचारिणी खुरपे आणि विळा घेऊन निंदणी खुरपणी असे काम करत असते, हीच खुरपे आणि विळे यांनी प्रसंगी तलवारी मध्ये रूपांतरित होऊन शत्रूवर वार केले आहेत, थोडक्यात देश धर्म स्वाभिमान इत्यादीवर घाला होत असेल तर प्रसंगी स्त्रिया सुद्धा रणामध्ये आहे त्या हत्यारानिशी उतरतात. खुरप्या प्रमाणेच स्त्रीची आणखी एक महत्त्वाची जबाबदारी म्हणजे पाळण्याची दोरी, ती पाळण्याची दोरी इतिहास घडवू शकते हे राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या उदाहरणातून सिद्ध झालेले आहेच. पाळण्याची दोरी संस्कारक्षम हातामध्ये असला तर आणखी चांगले संस्कार मिळतील असा सुद्धा विचार अण्णाभाऊ साठे करतात. जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगा उद्धारी ह्या अनुषंगाने अण्णाभाऊ साठे ह्यांनी महाराष्ट्र गुणगौरव गीता मध्ये केलेला खुरपे आणि दोरीचा उल्लेख स्त्री गौरवाचा ठरतो ह्यात शंका नाही. दुनियेची दौलत सारी या गीतांमध्ये अण्णाभाऊ म्हणतात,

बसली हळद लाजून खाली, तूर शेंगान आपुल्या न्हाली

अशा ओळींमधून शेतात बहरलेल्या पिकाला स्त्री सुलभ प्रतिमा वापरून अण्णाभाऊ आणखी उंचीवर घेऊन जातात. हळद लाजणे ह्यामधून लाजणारी स्त्री प्रतिबिंबित होते तर शेंगानी बहरलेली तूर अंगाखांद्यावर लेकरांना खेळणाऱ्या लेकुरवाळ्या माऊलीचे दर्शन घडवते. बंगालची हाक ह्या पोवाड्यामध्ये अन्नधान्याची टंचाई पडल्यावर भूक भूक करत संपूर्ण बंगाल हवालदिल झाला त्यावेळी बंगालच्या स्त्रीवर माता म्हणून काय परिस्थिती असेल ह्यांची जाणीव,




घेऊन मृत बाळाला। हंबरते चौकाला।
किंकाळी फोडी ती, बाळ म्हणे मम गेला।।

अशा विदारक प्रसंगाचे अण्णाभाऊंनी जे वर्णन केले आहे त्यातून होते. ह्याच पोवाड्यात भूक, अन्नशोध ह्यासाठी होणारा आकांत आणि त्यातही,

त्या वंग वीरमातेन । भुकेच्या आहारी जाऊन।
शील, कूल, मूल विकून। शमविली पोटाची अग्न।।

अशा भयावह परिस्थितीत पोटासाठी शारीरिक संबंध देणारी खरे तर वीरमाता म्हणून नावाजलेल्या बंगालच्या स्त्रीचे चित्र फार विचार करायला लावणारे आहे. दुष्काळ, परचक्र, युद्ध अशा कोणत्याही कारणांनी ज्या वेळी लोक उपाशी मरत असतात त्यावेळी अन्नाच्या बदली स्त्रीचे शरीर मागण्याच्या अनेक कथा मी आजवर ऐकल्या आहेत हीच आहे का आपली संस्कृती? जी उपाशी स्त्रीच्या शरीराचे लचके तोडण्यासाठी सदैव निमित्त शोधत असते, असा प्रश्न मला समाजाला विचारावा वाटतो. बरे स्त्रीला अन्न देताना तिचे शरीर मोबदला म्हणून हवे असते मग उपाशी मरणाऱ्या पुरुषाकडून काय अपेक्षा असते? तर तेथे उदात्तीकरण!! भुकेल्यास अन्न देण्याचे पुण्य कर्म म्हणून... ह्या दुटप्पीपणावरून फक्त एकच गोष्ट सिद्ध होते की ह्या पुरुष प्रधान संस्कृती मध्ये स्त्रीला निव्वळ उपभोग्य वस्तू समजले जाते. पंजाब दिल्लीचा दंगा ह्या पोवाड्यामध्ये सुद्धा,

मातेच्या पदराखालून। बाळ हिरावून। मारती जबरीन,

ह्या अण्णाभाऊंनी लिहिलेल्या ओळीतून पोटाची मुले डोळ्यादेखत मारल्या जाणाऱ्या मातांचा आक्रोश आणि विलाप ह्याने व्यथित होत असतानाच त्याच पोवाड्यातील,

दया धर्म नष्ट जाहला। अबलाच्या
शीलावर घाला। अघोरी होऊ लागला।
ओढुनी नारी रस्त्यावरती करती बलात्कार।
देऊनी कंठी नख शेवटी मारती त्या ठार।।
हेच शिकविले काय भारता तू पंजाबाला। योद्धा
भगतसिंग दिला आम्हाला ज्याने मतवाला।
सहस्त्र नारी जमवून। वस्त्र हिरावून। करोनि नग्न।
त्यावरी शस्त्र रोखून। राक्षसी करी थैमान।

ह्या मस्तकात अतिशय आवेगाने तिडीक निर्माण करणाऱ्या प्रसंगाचे वर्णन करणाऱ्या ओळीतून माणसाच्या कोणत्याही कृत्याला किंवा रागाच्या परिसीमेवर सातत्याने स्त्रीचे शील का पणाला लावले जात असेल असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. पंजाब सारख्या प्रांतातून जिथे भगतसिंग सारखे सच्चे देशभक्त जन्मास आले त्याच पंजाबमध्ये हजारो स्त्रियांना रस्तावर नग्न करून, त्यांच्यावर शस्त्राचा धाक दाखवून बलात्कार करणे, तेवढ्यावर न थांबता वासनापूर्ती झाल्यावर त्याचा जीव घेणे इतकी विकृती कशी काय निर्माण झाली असेल असा प्रश्न निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. म्हणजे संपुर्ण पुरुष जात स्त्रियांवर अन्याय करत असे नक्कीच नाही याचा दाखला देताना अमळनेरचे हुतात्मे ह्या पोवाड्यात डेव्हिड ह्या अधिकाऱ्यांने विजयाबाई वर नेम धरून गोळी घातली ती रतन पाटील ह्यांनी स्वतः च्या अंगावर झेलून, जीव देऊन विजयाबाईचा जीव वाचविला असा उल्लेख अण्णाभाऊंनी आपल्या पोवाड्यामध्ये आवर्जून केला आहे.

त्याच पोवाड्यात डेव्हिडची गोळी लागून विजयाबाईचे हौतात्म्य खरे तर स्त्री कोणत्याही लढाईत मागे नाही हे सिद्ध करणारे आहे. श्रीपतीराव पाटील ह्यांच्या आई पार्वतीबाई ह्यांच्या वर श्रीपती पाटील ह्यांचा गोळी लागलेला देह समोर आल्यावर काय प्रसंग गुदरला असेल ते सांगण्यासाठी अण्णाभाऊ म्हणतात,

चरकली मनी। ती वीर जननी। पार्वतीबाईला धक्का बसला।
थरारले ओठ, कंठ सुकला। डोळ्यातून अश्रू तिच्या गळला।

अशा शब्दांत वीर माता असली तरी स्त्री ही एक जननी आहे तिला मुलाच्या मृत्यूचे दुःख सहन करणे दुरापास्त असते ह्या जाणिवेतून मातेचे थोरवी त्यांनी व्यक्त केली आहे. मुंबईच्या गिरणी कामगारांची आणि त्यांच्या पत्नीची व्यथा समजून घेण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांची मैना ही रचना समजून घेणे फार गरजेचे ठरते. लावणीचा बाज असल्यामुळे,

माझी मैना गावावर राहिली। माझ्या जीवाची होतीया काहिली ।।

या ओळींमधून पत्नीपासून दूर राहिलेल्या पुरुषांची मनोव्यथा सांगत असताना स्त्री शिवाय पुरुषाच्या जीवनाला अर्थ नाही, पूर्णत्व नाही असे सांगण्याचा प्रयत्न सुद्धा अण्णाभाऊ साठे यांनी केलेला आहे. याच रचनेमध्ये जेव्हा अण्णाभाऊ साठे तिच्या रूपाचे वर्णन करतात तेव्हा ते म्हणतात,

ओतीव बांधा। रंग गव्हाळा । कोर चंद्राची । उदात्त गुणाची।

पण या गुणाबरोबर तिच्या मोठ्या मनाचे खूप करताना कवी म्हणतात,

मोठ्या मनाची। सीता ती माझी रामाची।

याठिकाणी आपल्या सहचारिणीला सीता म्हणायला त्याच्या मनामध्ये नेमकेपणाने काय आहे? हे समजून घेण्याची गरज आहे. नवरा घर प्रपंच चालवण्यासाठी घरदार बायको, मुले यांना सोडून मुंबईसारख्या ठिकाणी गेला आहे त्याची पत्नी त्याच्या विरहामध्ये त्याचा संसार सार्थपणे सांभाळते आहे. म्हणून तिला मोठ्या मनाचे म्हणण्याचे अण्णाभाउंनी ठरवले असावे त्याचप्रमाणे गिरणी कामगारांचे जीवन हे पूर्णपणे वनवासी कसलाही ठावठिकाणा नसलेले? कोणतेही सुख नसलेले असते या दुःखाच्या दिवसांमध्ये गिरणी कामगाराची बायको त्याची साथ देते यावरून बनात जात असताना रामासोबत निघणाऱ्या सीतेची आठवण येणे स्वाभाविक आहे म्हणूनच आपल्या जीवनामध्ये आपल्यासोबत वनवास भोगणाऱ्या पत्नीला शाहीर अण्णा भाऊ साठे सीता म्हणून संबोधतात. पती आपल्या पासून दूर जातोय याचे तिला किती दुःख होते हे सांगत असताना अण्णाभाऊ साठे म्हणतात,

खैरात केली पत्रांची। वचनांची। दागिन्यांन मढवून
काढायची। बोली केली शिंदेशाही तोड्याची।
साज कोल्हापुरी। वज्रटीक। गळ्यात माळ पुतळ्याची कानात
गोखर । पायाचा मासोळ्या। दंडात इळा आणि नाकात
नथ सर्जाची। परी उमलली नाही कळी तिच्या अंतरीची।

वेगवेगळ्या प्रकारची आभूषणे, दागदागिने, साज श्रुंगार ह्याची प्रलोभने स्त्रीला पतीविरहाच्या दुःखातून बाहेर काढू शकत नाहीत, यावरून स्त्रीच्या मनामध्ये आपल्या घरधन्याबद्दल किती प्रेम असते याची जाणीव तर होतेच मात्र पती बाहेर गेल्याशिवाय या संसारांमध्ये आपला निभाव लागणार नाही, पैसा येणार नाही, संसार सुखाचा होणार नाही या जाणीवेतून ती आपल्या पतीला बाहेरगावी काम करायला जाण्यासाठी पाठवायला तयार होते.

## निवृत्त आयुष्य आणि नातवंडाच्या बाळलीला



नोकरीतील निवृत्ती नंतर,
खूपच टेन्शन आलं होतं ।
पुढे काय? या विचाराने,
मन निराश झालं होतं ।।

नोकरीत चोवीस तास काम,
माझं महसूल खातं होतं ।
झोपेचं आणि माझं जणु,
भारत - पाकचं नातं होतं ।।

पुढचं आयुष्य अंगवळणी,
पडायची वाट पाहत होतो ।
गाव सोडुन मुलाच्या घरी,
पुण्यात येऊन राहत होतो ।।

मनामधे विचार करुन,
नुसती चिंता वाढू लागली ।
पण एके दिवशी जवळ येऊन,
नात मिशी ओढू लागली ।।

दोन वर्षाची गोड पोर ती,
जगण्याची भुरळ घालत होती ।
फुगे भिरभीरे खेळणी घेऊन,
माझ्या सोबत चालत होती ।।

नोकरीतली टापटीप मी,
हळू हळू विसरु लागलो ।
कधी कडेवर कधी खांद्यावर,
नातीला घेऊन फिरु लागलो ।।

आता दाढी काय, अंघोळ काय,
कशालाच वेळ मिळत नाही ।
नातीला ताटात घेतल्या शिवाय,
एक घास गिळत नाही ।।

नातवंडा सोबत खेळण्या शिवाय,
मला कोणता छंद नाही ।
निवृत्त होऊन जगण्या सारखा,
दुसरा कुठलाच आनंद नाही ।।

विचार करत बसून राहणं,
आता नक्कीच टळू लागलं ।
आयुष्य खरच सुंदर आहे,
हळू हळू कळू लागलं ।।

माझ्या निवृत्त आयुष्याचा,
मला खरच गर्व आहे ।
परिवारा सोबत जगण्याचं हे,
चैतन्यमय पर्व आहे ।।

नोकरीतील आठवणी उघाळीत,
निराश होऊन हरु नका ।
सुखी सुंदर जीवनाचं कुणीच,
उगाच हासं करु नका ।।

नोकरीतील तुमची किंमत हा,
त्या खुर्चीचा मान होता ।
तिथल्या तिथे का होईना,
तुमचा रुबाब छान होता ।।

आता हवेतून खाली येऊन,
थोडं जमिनीवर चालून बघा ।
नुसते धुतलेले बिना इस्त्रीचे,
कधी कपडे घालून बघा ।।

पत्नी मुलं सुना नातु,
यांना मोकळं बोलून बघा ।
चाकोरीतलं तुमचं वागणं,
त्यांच्या तराजूत तोलून बघा ।।

आजोबा साठी नातवंड म्हणजे,
दुधावरची साय हो ।
सुख म्हणजे नेमकं अजुन,
असतं तरी काय हो ।।

**-अशोक मिरगे,**
अंबाजोगाई. जि. बीड,
संपर्क क्र. 9421278312




## कासार

जातीचे कासार आम्ही
अभिमानाने सांगत असतो
बांगड्या भरणे व्यवसाय आमुचा
त्यावरच कुटुंबाचे पोट भरतो...

विश्वासाने हात हाती
बाई ती देत असती
घरापर्यंत होम डिलिव्हरी
सुरुवातीपासूनच कासारांची होती...

शुभ कार्याची सुरुवात
बांगडीचं लेण लेवून होती
जिथ तिथं कासारांशिवाय
कामाची सुरुवात होत नसती...

कुलस्वामिनी कालिका देवी
भक्तांच्या नेहमी हाकेला धावती
करूनी अमावस्येला पुजन तिचे
कासार सारे आशीर्वाद घेती...

कासार दादा पदवी छान
आई बहीणीं देवून जाती
हेच कमावले आयुष्यात त्याने
पैशाला महत्त्व कधी नाही देती...

गाडी,बंगला नाही कधी हाव
डोक्यावर पाटी घेऊन फिरे
वाडीवस्ती सारी जागी होई
कासार मामाला पाहून आनंद होई...

होय आहे मी कासार
मला असे कासारजातीचा अभिमान
कासार जातीचा अभिमान...

-सीमा मंगरूळे/तवटे
वडूज सातारा

## जीएसटी

जीएसटी च्या नावावर,
सर्रास होतेय लूट.
प्रशासन आणि जनतेमध्ये,
पडत आहे फूट.

जीवनावश्यक वस्तूंवरच,
लावला जातोय कर.
जीवघेणी ही महागाई,
त्यात आणखी पडतेय भर.

गोरगरीब या जनतेने,
सांगा कसं जगायचं?
जगणं महाग झालं म्हणून,
मरण तरी का मागायचं?

भुकेलेली चिमुकली पिल्लं,
झोपत आहेत अर्ध्यापोटी.
काय करणार ती बिचारी,
महाग झालीय रोजीरोटी.

जगण्यासाठी मरणयातना,
आता होत नाहीत सहन.
महागाई रूपी या रावणाचे,
कधी होणार आहे दहन?

श्रीलंके सारखा उद्रेक पुन्हा,
भारतामध्ये होईल का?
जनता पेटून उठण्यापूर्वी,
सरकार लक्ष देईल का?

-ऋषिकेश बालासाहेब सुरवसे
रा. छ. संभाजीनगर, सोनपेठ
संपर्क क्र. ८४११९४७९९६.

## नागपंचमी...!



श्रावणात नागपंचमीचा सण आला,
चला मुलीनो चला गं झोका खेळायला.

रिमझिम पाऊस पडे रानावनात,
नदी-नाले वाहुनी पिके आली जोमात.
पावसाच्या पुढे ऊन लागे पळायला,
चला मुलीनो चला गं झोका खेळायला.

लाहया भाजताना तडातडा उडे,
तसा झोका उंच-उंच जाई गडे.
झोका खेळताना लागे ओवी आळवायला,
चला मुलीनो चला गं झोका खेळायला.

फुगडी खेळू गं खेळू गं फिरकीची,
तिरक्या-तिरक्या गं फुगडी ही गिरकीची.
बालपणीचे खेळ लागलीत कळायला,
चला मुलीनो चला गं झोका खेळायला.

झोका खेळल्याने मुलींना आनंद होई,
नागपंचमीच्या सणाने उत्साह येई.
झिमझिम पाऊस लागे हे छ्ळायला,
चला मुलीनो चला गं झोका खेळायला.

-अय्युब पठाण लोहगांवकर,
ता. पैठण, मो. ९७६४३५०३७४.

## पान्हा

पान्हा दाटतां मायेचा ।
प्रेम आईच स्फूरलं ।।
हंबर ऐकूनं गायीचा ।
वासरू कुशीत शिरलं ।।धृ।।

आलं वात्सल्य बहरूनी ।
माय लेकरांचे दोन्ही ।।
गाय वासरास चाटे ।
गेली गेली आनंदुनी ।।1।।

ऐकता हंबर मायेचा ।
ऊर खुशीनं भरला ।।
पान्हा प्रेमळ ममतेचा ।।
आज ओथंबुन आला ।।2।।


हर्ष आनंदी नजर ।
गाय चहुदूर पाही ।।
वासरू बिलगता दुधास ।
वेडी उल्हासीत होई ।।3।।

जीव काळजाला लावी ।
पार काळजापासुनी ।।
लावी प्रेम नी जिव्हाळा ।
माय स्पंदुनी स्पंदुनी ।।4।।


जाता दूर दूर वासरू ।
होई गाय कावरी बावरी ।।
जीव तीळ तीळ तुटे ।
नजर स्थिर लेकरावरी ।।5।।

किती सुंदर हे नातं ।
क्षणातच हेवा होई ।।
लळा गाय वासरांचा ।
मना गहिवर देई ।।6।।

-मनिष आहिरे, नाशिक
संपर्क क्र. 7588069679




## निसर्गाचा सेवक



सण नागपंचमीचा
घेवून आला श्रावणसरी
हर्ष उल्हासात
नागपूजन घरोघरी

नाग विष्णूचे आसन
भोळ्या शंकराचा हार
दया करूया त्यावरी
नका करू कुणी वार

नागाला अभय देवूनी
आदर त्याचा करूया
मोकळा श्वास घेण्यासाठी
सुंदर निसर्ग जपूया

नागोबाचे करूया
आपण सदैव रक्षण
उपद्रवि कीटकांचे
करतो तो भक्षण

पिकाचे जतन करूनी
बिळात तो राहतो
निसर्गाचा मी एक सेवक
जणू आपणास सांगतो

- रवींद्र व्ही. चालीकवार
संपर्क क्र. 9011559106

## ... गड्या ...

थोड धिरान थोड अदबीन घे र गड्या...
हे जीवन आहे सोंग नाही र गड्या...!
असतील ढगभर अडचणी
तुला काय काळजी र गड्या...
तुझ्या सोबतीला तुझ्याच कष्टाचं मागणं
तुला काय चिंता र गड्या ?
वाईज कारणानं का थांबला र गड्या...
क्षणभंगुर तो पक्षी उडून जाईल र गड्या..!
पोटासाठी इपरीत वागू नको र गड्या...
त्या खळगीला मोप मिळलं...
तू ईमान घे र गड्या...!
का तू लोकाकड पाहतो ?
जे तुझे न्हाई र गड्या..!
तू तुझ्या मनाचा राजा...
जरा तू हक्कान घे र गड्या..!

-गजानन जोशी

## मला लाज वाटते

खरचं मला लाज वाटते
तु माझा आणि मी तुझा असल्याची...
श्रीमंत समजल्या जाणाऱ्या
गरिब,दुबळ्या,अशिक्षीत भारताची...

मायच्या पदराले बांधूनच गरिबीनं
आमच्या दारात पाय टाकला...
भुकिच्या आकांतानं

मायच्या छातीले बिलगलो तवा,
तीचा पान्हाच आटला....
आणि अखंड माझा भारत तवा
टरटरा फाटला....

म्हणून भारतदेशा मला लाज वाटते रे
तु माझा आणि मी तुझा असल्याची...

-सागरकुमार झनके,
संपर्क क्र. 9822575244

# नवनिर्वाचित राष्ट्रपती महोदया आणि काँग्रेस संस्कृती



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**नवनिर्वाचित महामहीम राष्ट्रपती महोदया श्रीमती द्रौपदीजी मूर्मू या आदरणीय व्यक्तीमत्वाबद्दल काल कॉंग्रेस पक्षाचे लोकसभेतील विरोधीपक्ष नेते अधीर रंजन चौधरी यांनी जाणिवपूर्वक जे अनुद्गार काढले ते क्षमाशील नाहीत. मनोवृत्ती, मानसिकता, वैचारिक बैठक तथा पदाबद्दल ची अनास्था अधोरेखित करणारे ते वक्तव्य आहे. श्रीमती सोनिया गांधी सभागृहात उपस्थित असताना त्यांच्या पक्षाचे लोकसभेतील नेते जेंव्हा सर्वोच्च पदाचा अवमान करतात, तेव्हा जागच्या जागी त्यांना वेसन घालून, थांबवून समज देणे अपेक्षित असते. परंतु ईथे तर त्या शांत बसून अधीर रंजन चौधरी यांचे भाषण ऐकत बसल्या होत्या. आणि नंतर माझी मातृभाषा हिंदी नाही आहे त्यामुळे मला माझ्याच वक्तव्याचा निट अर्थ उमगला नाही, अशी सारवासारव करण्याचा त्यांनी प्रयत्न अधीर रंजन चौधरी यांनी केला.**

देशाच्या सर्वोच्च पदाचे नाव, अर्थ, महत्व, अंतरराष्ट्रीय स्तरावर एका सर्वात मोठ्या लोकशाही देशाच्या राष्ट्रप्रमुखाचा उल्लेख कसा आणि किती आदराने करायला हवा हे कळत नसेल तर नेतेपद सांभाळायला आपण लायक नाही आहोत हे कबुल करून राजिनामा तरी द्यायला हवा होता. किंवा पक्ष प्रमुख म्हणून अधीर रंजन चौधरी यांचा राजिनामा घ्यायला हवा होता. एका अत्यंत सत्शील, संयमी, उच्चशिक्षित, आदिवासी महिलेचा राष्ट्रपत्नी असा उल्लेख करणे कसे शोभा देते यांना. म्हणे हवे तर मी स्वतः राष्ट्रपती भवनात जाऊन श्रीमती द्रौपदी मूर्मू यांची माफी मागतो. पण भाजपच्या नेत्यांची किंवा सभागृहाची माफि मागणार नाही हे वक्तव्य विरोधीपक्ष नेत्याला अजिबातच शोभत नाही.

सभापती महोदयांनी या अपराधा बद्दल त्यांना लोकसभेचा कार्यकाळ संपेपर्यंत निलंबित करायला हवे. आपल्याच देशाच्या सर्वोच्च पदावरील एका महिलेचा आपणच आदर नाही राखू शकत तर परदेशस्थ राजवटीने त्यांचा मान राखावा हे सांगण्याचा अधिकारच आपण गमावून बसत आसतो. अधीर रंजन चौधरी यांनी आधी राष्ट्रभाषा शिकुण घ्यावी. राष्ट्रभाषेचा अवमान होणार नाही याची काळजी घेणे सर्वच पक्ष नेत्यांचे कर्तव्य आहे.

श्रीमती द्रौपदी मूर्मू हे असले घाणेरडे बोलणे खपवून घेतील ही. पण जनता आपल्या राष्ट्रप्रमुखाचा झालेला किंवा केलेला अपमान सहन करणार नाही. श्रीमती द्रौपदी मूर्मू यांना पदभार सांभाळून जेमतेम दोन तीन दिवस झालेले असताना त्यांचा उल्लेख त्यांचे पश्चात असा अयोग्य उपाधी वापरून करणे हे असंस्कृत पणाचे लक्षण आहे.

नरेंद्र मोदींच्या यशावर आणि अंतरराष्ट्रीय छबीवर जळत असताना नवनिर्वाचित महामहीम राष्ट्रपती पदावरील एका अत्यंत लायक व्यक्तीला अशा नावाने संबोधने हे फक्त काँग्रेस संस्कतीतच घडू शकते. अधीर रंजन चौधरी पेक्षा सर्वार्थाने लायक आणि महान असणाऱ्या द्रौपदी मूर्मूजींना कोणत्याही प्रकारे हिणवणे गैरच आहे. अधीर रंजन चौधरी यांची बिनशर्त माफी किंवा निलंबन हेच दोन पर्याय उपलब्ध आहेत.

ओरीसासारख्या तुलनेने मागास राज्यातून आलेल्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मूर्मू यांच्या धीराची, संयत वर्तणूकीची, सहनशील आणि क्षमाशील स्वभावाची तारीफ करावी तेवढी कमीच आहे.ओरिसा चे मुख्यमंत्री आणि बिजू जनता दलाचे एकमुखी नेतृत्व नविन भाई पटनायक ज्या





अर्थी राष्ट्रपतीसमोर विनम्र होतात, त्यांना राखी बांधून नातं जपतात आणि ममता दीदीदेखील आधीच कळाले असते की द्रौपदी मूर्मू यांना भाजप अलायन्स तिकीट देणार आहे म्हणजे राष्ट्रपती पदासाठी उमेदवारी देणार आहेत हे समजले असते तर आम्ही उमेदवार देण्यावरच विचार केला असता. असे म्हणाल्या येथेच द्रौपदी मूर्मू जींची प्रतिमा उघड होते. प. बंगालच्या लगतच्या राज्यातील अदिवासी महीला राष्ट्रपती पदावर निवडून येणे आणि प. बंगालच्याच राज्यपालांची उपराष्ट्रपती पदी निवड होऊ घालणे हे दोन्ही ममतांना आव्हान देणारे निर्णय आहेत.

प. बंगालच्या पटरी सोडून वाटचाल करत असलेल्या, जनतेने निवडून दिलेल्या सरकारवर अंकुश ठेवण्यासाठी हा सारा खटाटोप चालू आहे. यात ममता दीदींना नामोहरम करणे हा उद्देश नसून रोहींग्या मुस्लिमांची घुसखोरी, त्यांना सामावून घेण्याची ममता दिदींची चालू असलेली धडपड. रोहींग्या घुसखोर मुसलमानांमुळे मुळचे बंगाली हिंदू राज्याबाहेर किंवा देशाबाहेर स्थलांतरित होणेचा वाढलेला वेग रोखणे, ममतांजींची लांगुलचालन वृत्ती, मग्रूरी, अरेरावी, भ्रष्टचाऱ्यांना पाठिशी घालण्याची चालु असलेली कसरत. बदली घोटाळा, चिटफंड घोटाळा, केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ फक्त किंवा जास्तीतजास्त रोहींग्या, बांगलादेशी मुस्लिम यांना पुरविणे ही व अशी अनेक धोरणे आहेत त्यासाठी प. बंगाल वर अंकुश ठेवणे गरजेचे झाले आहे.

जोपर्यंत प.बंगालची सत्ता ममता दिदींचे हातात आहे तोपर्यंत तिथे बारीक लक्ष ठेवणे गरजेचे झाले आहे. त्यांनी नुकताच प. बंगालचे नाव बदलून बांगला करण्याची चालवलेली धडपड बघून घाबरायला होते आहे. देशाचे पून्हा तुकडे होऊ नयेत किंवा काश्मीरची स्थिती इथेही उद्भवू नये याच हेतूने केंद्र सरकार काळजी घेत आहे.

काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी म्हणजे सोनियाजी, राहूलजी आणि प्रयंकाजी यांनी आपल्या धोरणांचा विचारपूर्वक आढावा घेऊन आवश्यक बदल घडवले पाहीजेत.

# गुण असतील तर जिद्दीचे प्रयत्न यश देतातच!

आधुनिक केसरी

चैतन्य ताम्हाणेकृत THE DESCIPLE (नेटफ्लिक्स) पाहिला. शिष्य कसा असायला हवा, कसा होता आणि आता कसा आहे. यावरचं दृश्यरूपातलं भाष्य म्हणजे हा चित्रपट आहे. शरद नेरुळकर हा गायक शालेय वयापासून संगीत शिकत असतो. त्याचे वडील रियाज करून घेतात. जाणत्या वयात तो झपाटल्यासारखा त्याच्या गुरूंकडून ज्ञान मिळवू पाहतो. गुरूंची सेवा करतो. गुरूंच्या गुरू सिंधुताई जाधव (माई) यांच्या व्याख्यानांच्या टेप्स ऐकून त्यांतील महत्त्वाचे मुद्दे मनात मुरवत राहतो. गाण्यावर पूर्ण फोकस राहावा यासाठी चाळिशीपर्यंत लग्न व संसार करत नाही. केवळ संगीत हेच आयुष्याचे ध्येय ठरवून जगत असतो. पुढे काय होते ते पडद्यावरच पाहावे.

आत्म्याशी पोचणं, त्याच्याशी संवाद आणि तादात्म्य पावणे ही खरी संगीतसाधना असते. चित्रपटातून हे तर पोचतंच, पण सध्या सुमारांची सद्दी कशी चालू आहे तेही लक्षात येतं. त्या दृष्टीने एक प्रसंग पुरेसा बोलका आहे. ज्याला कॉलेजच्या बँडमध्ये भाग घ्यायचा आहे आणि शास्त्रीय संगीताची शिकवणीही करायची आहे अशा एका मुलाची आई संगीतशिक्षक शरद नेरूळकर यांच्याशी बेरोखपणे बोलते. त्यावरून संगीताची साधना, तपस्या, कठोर मेहनत-रियाज यांचे दिवस संपले की काय असे वाटते. गायकालाही झटपट प्रसिद्धी/यश हवे आहे, जे वाहिन्यांवरून मिळते आहे. परंतु त्यातले जे गायक नवनवे शिकत राहतात आणि रियाजाने गाणे आत्मसात करतात तेच टिकून राहतात, हे अनेकांना समजत नाही.

तसेच, DOCUMENTATION करणे, ते जतन करणे आणि नव्या शिष्यांपर्यंत त्यांचे महत्त्व पोचवणे हे काम आत्मीयतेने करणारी माणसे व संस्था कमी होत चालल्या आहेत. तशी जाणही विरळा आहे. आणखी एक वाटते, माई - सिंधुताई जाधव यांच्या गानसाधनेच्या काळातील काही प्रसंग वा आठवणी FLASHBACK मधून दिसल्या असत्या तर परिणामकारकता वाढली असती.

एके दिवशी टॉम हँक्सचा CAST AWAY हा 2000 सालचा खिळवून ठेवणारा चित्रपट पाहायला सुरुवात केली.



विमान समुद्रात कोसळल्यावर एका छोट्याशा बेटावर पोचलेला टॉम अक्षरशः जीव तोडून स्वतःचा जीव वाचवतो. दिसेल ते अन्न, जिवाची बाजी लावत मिळवतो व चार वर्षे तिथे एकटा हिमतीने तगून राहतो. जखमा झाल्या तरी न भिता काही ना काही शक्कल लढवून खाण्यासाठी शोधत राहतो. मासेही मिळतात. अखेर त्याची तिथून सुटका कशी होते, त्याची प्रिय पत्नी त्याला भेटते का, पुढे काय होते हे NETFLIX च्या पडद्यावर पाहण्याचा अनुभव चित्तथरारक असेल.

दोन्ही सिनेमा पाहिल्यानंतर जाणवले की अनुभव हाच खरा गुरू असतो, त्यासाठी आपणच आपला चांगला शिष्य होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जिद्द, कळकळ, प्रयत्न हे नक्कीच सफल ठरतील, जेव्हा मुळातच त्या गुणाची समूळ आस प्रामाणिक असते.



**चित्रपट परीक्षण**



नंदिनी देशमुख, संपर्क क्र. 9850018610

# आपल्या भावनांचा लगाम हा आपल्याच नियंत्रणात असला पाहिजे..!



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी


**जीवनाच्या पटलावर अनेक ठिकाणी म्हणजे प्रत्येक विषयाशी बाबींशी भावनिकतेचा संबंध कळत न कळत येतोच आणि मग अशा वेळी तो प्रभाव-अभाव आपल्यावर किती प्रमाणात होऊ द्यायचा हे सर्वस्वी आपल्यावर अंवलबुन असते. आपण जेवढे भावनिक तेवढाच त्या-त्या विषयांशी आपला संबंध आहे. म्हणुन सध्या समाजिक, राजकिय भावनिकतेची दुकानं सगळीकडे जोरदार सुरू आहेत. पण या सगळ्यात आपली भावनिक कृती ही आपल्या नियंत्रणात असली पाहिजे. जेणेकरून ईतर लोक त्याचा गैरफायदा घेणार नाहीत.**

मनुष्य कोणीही असला तरी तो तसा भावना प्रदान असतोच. आणि भावनांच्या ओंडक्यावर तरंगत-तरंगत या भवसागर रूपी संसाराला समोरे जाण्याचं काम जवळपास प्रत्येक व्यक्तीला करावच लागत. आपल्या भावना ईतरांना समजतीलच असं नाही. माझ्या भावना कोणीही समजुन घेत नाही असंच काहीसं प्रत्येकाच मत असतं. तसा अंतिम निष्कर्ष असतो. परंतु भावनाविवश जगात जीवन जगत असताना मात्र मनुष्य इतरांच्या मतानुसार आपलं सुख-दुःख ठरवत असतो.

इतरांनी आपल्या विषयी आपल्या समोर किंवा आपल्या पर्यंत पोहचल अशा पद्धतीने जर काही चांगलं उत्साहवर्धक म्हटलं, सकारात्मक चर्चा केली किंवा खोटी-खोटी स्तुती केली. तर आपण नक्कीच आनंदी होतो. आणि जर इतरांच्या प्रतिक्रिया, मत आपल्या विषयी समोर किंवा आपल्या परोक्ष चुकीचे, निंदानालस्तीत्मक आलं, किंवा हेतुपुरस्कृत आपल्यावर टिका टिप्पणी करण्यात आली तर आपण लगेच दुःखी होतो. म्हणजे एकंदरीत आपल सुख व दुःख हे लोकांच्या मतानुसार ठरत असेल तर मग आपण सक्षम व्यक्तिमत्व आहेत का......??

आणि आपल्या सुख-दुःखावर ईतरांच्या मतांचा प्रभाव असावा हे सुयोग्य लक्षण नाही. आपल्या भावनांचा रिमोट कंट्रोल हा आपल्या हातात असला पाहिजे. म्हणजे लोकांच्या मतानुसार आपल सुख-दुःख ठरणार नाही आणि त्याचा परिणाम ही आपल्यावर होणार नाही.

एकंदरीत आपल जीवन आपण आपल्या ज्ञान, विवेक, बुद्धीनुसार जगल पाहिजे. त्यामध्ये असणारा भावनिकतेचा संबंध हा आपल्या ज्ञान, उंचीवर अवलंबून असतो.आपण आपल्या ज्ञानाने सक्षम असु तर आपल्या भावनिकतेचा लगाम ईतर कोणीही काबीज करू शकत नाही किंवा त्यावर ताबा मिळवु शकत नाही. आणि एकदा का ईतर कोणी आपल्या भावनिकतेचा लगाम ताब्यात घेतला तर मग मात्र आपल्याला आपला लगाम ज्यांच्या ताब्यात आहे. त्याच्या मतानुसार जीवन जगावे लागेल आणि आपल्या जीवनातील क्षणोक्षणी होणारे निर्णय हे लगामधारीच्या मतांवर अवलंबून असतील. लगामधारी सुयोग्य असेल तर फार काही अडचण येणार नाही. परंतु आपला भावनिकदृष्ट्या लगामधारी जर महाविचित्र असेल तर मग मात्र आपलं काही खरं नाही. म्हणून भावनिकदृष्ट्या आपण किती मजबुत असलं पाहिजे किती स्वालंबी व किती परावलंबी असलं पाहिजे याला खूप महत्त्व आहे. आणि म्हणूनच आपण आपल्या भावनिकतेचा लगाम हा ईतरांच्या ताब्यात न देता सद्सदविवेक आणि ज्ञानानुसार आपल्या संनियंत्रणात ठेवला पाहिजे. आणि तो ठेवण्याची कला ज्यांना अवगत झाली त्यांना जीवनाचा सुयोग्य मार्ग सापडला. ज्या मार्गावर कुठल्याही धोक्या शिवाय ते योग्य प्रवास करू शकतील....!!





# चतु:सूत्रीतून गणिताचा पाया मजबूत

आधुनिक केसरी

**अ) गणिताची मूलभूत संकल्पना : संख्यांचे प्रकार**

३) पूर्णसंख्या : नैसर्गिक संख्यात सुरुवातीस शुन्याचा समावेश केल्यानंतर मिळणाऱ्या (तयार होणाऱ्या) संख्यांना पूर्ण संख्या म्हणतात.

पूर्णसंख्या : 0, 1, 2, 3, 4, 5, 6 ...... इत्यादी.

४) पूर्णांकसंख्या : ऋणसंख्या, शून्य आणि धनसंख्या (नैसर्गिक संख्या) मिळून तयार होणाऱ्या संख्यांना पूर्णांक संख्या म्हणतात.




श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568

पूर्णांक संख्या : ...... -4, -3, -2, -1, 0, 1, 2, 3, ..... इत्यादी.

लक्षात ठेवा :

1) पूर्ण संख्यांची सुरुवात शुन्याने होते.
2) पूर्ण संख्यात शून्य आणि नैसर्गिक संख्या (धनसंख्या) असतात.
3) पूर्ण संख्या अनंत असतात.
4) पूर्ण संख्यांचा संच W={0, 1, 2, 3, 4, 5 ....} असा लिहितात.
5) पूर्णांक संख्यांना सुरुवात व शेवट नसतो.
6) पूर्णांक संख्यांत ऋणसंख्या, शून्य व धनसंख्या असतात.
7) पूर्णांक संख्या अनंत असतात.
8) ऋणसंख्या शून्यापेक्षा लहान आणि धनसंख्या शून्यापेक्षा मोठ्या असतात.
9) पूर्णांक संख्यांचा संच I = {.... -3, -2, -1, 0, 1, 2, 3, 4 ...} असा लिहितात.
10) शून्य हा पूर्णांक संख्यांचा मध्यबिंदू आहे.



३) सांगा पाहू...
हवेत उडणाऱ्या माशाचे नाव?
पाण्यात राहणाऱ्या पक्षाचे नाव?
एका पायाच्या प्राण्याचे नाव?
जागा बदलणाऱ्या झाडाचे नाव?
या सगळ्याच ऊत्तर शून्य माझ नाव.

(३)–काव्यगणित

11) शून्य धनही नाही आणि ऋणही नाही.

**ब) मूलभत संकल्पना प्रश्नसंच :**

प्रश्न : रिकाम्या जागा भरा

1) पूर्ण संख्यांची सुरुवात ....... ने होते !
2) पूर्णांक संख्या ....... असतात?
3) शून्य हा पूर्णांक संख्यांचा ...... आहे?
4) शून्य हा ...... नाही?
5) पूर्ण संख्यांचा संच ........ ने दर्शवितात ?

**क) उखाणा :**

1) गरज शब्दाचा समानार्थी शब्द आहे आवश्यकता, नैसर्गिक संख्यांच्या सुरुवातीस शून्याचा समावेश केल्यानंतर मिळणाऱ्या संख्यांना पूर्णसंख्या म्हणतात.
2) प्रवीण शब्दाचा समानार्थी शब्द आहे निष्णात, ऋण्संख्या, शून्य व धनसंख्या मिळून पूर्णांक संख्या तयार होतात.
3) सेनापती शब्दाचा समानार्थी शब्द आहे सेनानी, शून्य हा पूर्णांकसंख्यांचा मध्यबिंदु असून धनही नाही आणि नाही.

कविता : क्रमांक ३

**(क्रमशः)**

# जागतिक लोकशिक्षक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे



प्रा.डॉ. माधव बसवंते
संपर्क क्र. 9404900318

आधुनिक केसरी

**सामाजिक क्रांती, परिवर्तन व माणसांच्या प्रतिष्ठेसाठी समाजाला लोकशिक्षण देणारे जागतिक लोकशिक्षक म्हणजे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे हे आहेत. अण्णांचे समग्र साहित्य हे लोकजागृती व लोकशिक्षणाचे मानदंड आहे. अस्पृश्य, वंचित, उपेक्षित, पीडित व निराधार माणसांना माणुसकीचा साक्षात्कार करून देणारे अण्णा लोकशिक्षक आहेत. सामाजातील अन्यायग्रस्त मुक्या माणसांना अण्णांनी बोलायला शिकविले. अन्यायाशी प्रतिकार करून संघर्षाची व लढण्याची पे्ररणा देणारे अण्णा हे क्रांतिकारी लोकशिक्षक होते. समाजातील विषमता, दुःख व वेदनांचे सत्यशोधन करणारा हा लोकशिक्षक. अण्णा भाऊ साठे नावाच्या लोकशिक्षकाला आयुष्यभर अनेक अपमान सहन करावे लागले. छळ सोसावा लागला. अनेक दुःख व यातना भोगाव्या लागल्या. भूक व दारिद्र्याशी झुंज द्यावी लागली. संपूर्ण आकाशच अण्णांच्या अंगावर कोसळले होते. तरीही हा लोकशिक्षक डगमगला नाही. आपल्या श्रद्धा व निष्ठांपासून पळ काढला नाही. समाजातील अन्याय-अत्याचारांशी मुकाबला करीत हा लोकशिक्षक भारतीय समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय देण्यासाठी आपल्या मानवतावादी लेखणीची आग वादळातही विझू दिली नाही. अशा या लोकशिक्षकाने समाजाला विवेकाची नवी दृष्टी दिली. सामाजिक परिवर्तन व क्रांतिसाठी धाडसीवृत्तीचे हत्यार दिले. मानवी मूल्यांची दिशा दिली. पारंपरिक, काल्पनिक व मनोरंजनाचे वस्त्र परिधान केलेल्या हजारो वर्षाच्या भारतीय साहित्याला वास्तवाचे आत्मभान दिले. आपल्या समग्र साहित्याच्या माध्यामातून समाजातील घराघरात लोकजागृती, निर्भीडपणा, माणसांची प्रतिष्ठा व लोकशिक्षणाचा संदेश देणारे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे हे केवळ भारतीयच नव्हे, तर जागतिक लोकशिक्षक आहेत.**

1 ऑगस्ट, 1920 ते 18 जुलै, 1969 हा अण्णा भाऊ साठे यांच्या जीवन संघर्षाचा कालखंड आहे. आपल्या एकोणपन्नास वर्षाच्या जिवीत कालखंडात अण्णांना वयाच्या साधारणतः अकराव्या-बाराव्या वर्षापासूनच दुःख भोगावे लागले. दारिद्र्याचे चटके सहन करीत मुंबईला पायीच प्रवास करावा लागला. अण्णा आपल्या वैयक्तिक सुखाकडे दुर्लक्ष करून मार्क्स व लेनिनच्या क्रांतिकारी विचाराने प्रभावित झाले होते. ते समतावादी नव्या समाजाच्या निर्माणाचे स्वप्न पाहत होते. सामाजिक क्रांतीच्या व परिवर्तनाची भाषा बोलणार्या साहित्याचे अण्णांनी रात्रंदिवस वाचन केले. त्यामुळे त्यांनी साहित्याच्या परिवर्तनासाठी मानवकेंद्रीत लेखणीच्या धारदार शस्त्रांनी साहित्याच्या रणांगणात प्रवेश केला. साहित्याच्या रणांगणात अण्णांनी काल्पनिक व मनोरंजनवादी लेखकांचा व समीक्षकांचा पराभव केला. पण दुर्दैवाने 'अस्पृश्य' म्हणून जन्म घेतलेल्या अण्णांच्या या मानवकेंद्रीत व न्यायधिष्ठीत साहित्याकडे तत्कालीन समीक्षकांनी पाठ फिरविली होती, पण अण्णा समीक्षकांची पर्वा करीत नव्हते. अण्णांच्या अंगात मार्क्सवादी कणा असल्यामुळे ते समीक्षकांसमोर कधीही डगमगले नाहीत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील घटनांचे सूक्ष्म निरीक्षण करीत अण्णांची लेखणी ही वास्तवादी साहित्य निर्मितीचा मानदंड निर्माण करीत होती. अण्णा क्रांतिनिष्ठ झाले होते. मार्क्सवादाच्या विद्रोहाने पेटले होते. 'जे लढतील तेच जगतील' हे जीवनसूत्र घेऊन अण्णांनी कथा, कादंबरी, पोवाडे, लोकनाट्य, शाहिरी यासारख्या वाङ्मयनिर्मितीतून त्यांनी समाजाला निरंतर लोकशिक्षण दिले.

'न्याय' हा अण्णांच्या साहित्याचा मुख्य केंद्रबिंदू असून त्यांनी मॅक्झिम गॉर्कीचा वारसाही जपला आहे. गरिब व श्रमिकांना किमान पोटभर अन्न मिळावे, यासाठी या लोकशिक्षकाने आपल्या वाङ्मयातून शोषित व्यवस्थेच्या विरोधात अण्णा जणू लोकयुद्धच पुकारले होते. अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यातून समतावादी नव्या समाजाचे स्वप्न रेखाटले आहे. अण्णाच्या ध्यास व त्यांचे समग्र साहित्य हे गंगेतील पाण्यापेक्षाही पवित्र व निर्मळ आहे. 'वैजयंता' कादंबरीच्या मनोगतामध्ये अण्णा म्हणतात, 'माझा माझ्या देशावर, जनतेवर नि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. हा देश सुखी, समृद्ध नि सभ्य व्हावा, इथं समानता नांदावी. या महाराष्ट्रभूमीचे नंदनवन व्हावे, अशी मला रोज स्वप्ने पडत असतात. ती मंगल स्वप्ने पाहात पाहात मी लिहित असतो.' या त्यांच्या विधानावरून हा लोकशिक्षक नव्या मानवतावादी समाजाच्या निर्माणासाठी निष्ठेने साहित्यनिर्मिती केल्याचे स्पष्ट होते. अण्णांच्या स्वप्नातील या नव्या समाजात जात, धर्म, पंथ, दैववाद व अंधश्रद्धा नाही. माणसा-माणसात श्रेष्ठ-कनिष्ठता व भेदभाव नाही, तर त्यात माणसांची प्रतिष्ठा, अस्मिता, स्वाभिमान, राष्ट्राभिमान, शुद्ध चारित्र्य व स्त्रियांचा सन्मान आहे.

### कथाविश्व

मॅक्झिम गोर्कीच्या प्रेरणेतून अण्णा हे साधारणतः इ.स. 1940 च्या नंतर कथालेखनाकडे वळले. अण्णांच्या नावावर एकूण वीस कथासंग्रहाची नोंद दिसून येत असली तरी, प्रत्यक्षात मात्र केवळ 16 कथासंग्रह उपलब्ध असल्याचे दिसून येते. अण्णांची पहिली कथा इ. स. 1949 मध्ये प्रकाशित झाली. त्यांच्या कथा अनेक भारतीय व विदेशी भाषांमध्ये भाषांतरित झाल्या आहेत. अण्णा ज्या समाजात जगले व अनुभव घेतला तोच जिवंत समाज त्यांनी आपल्या कथावाङ्मयात चित्रित केला. आपल्या कथेतील अनेक पात्रांच्या माध्यमातून अण्णांनी भारतीय समाजाला लोकशिक्षण दिले. अण्णांच्या अंतःकरणात समाजप्रबोधन, लोकजागृती, लोकशिक्षण व मानवी प्रतिष्ठांची तळमळ असल्यामुळे विषमतेने ग्रासलेल्या अमानवीय समाजव्यवस्थेला त्यांनी नैतिक आचारणाचा सदैव संदेश दिला.

अण्णांच्या कथावाङ्मयाचे विश्व हे एका लोकशिक्षकाच्या अंतःकरणातील समाजाची प्रामाणिक तळमळ आहे. अण्णा हे कोणत्याही जातीचे, धर्माचे वा संप्रदायाचे प्रचारक नाहीत, तर ते प्रभावीपणे माणसांचा शोध घेणारे खरे वैश्विक मानवतावादी लोकशिक्षक आहेत. अशा लोकशिक्षकाला माणसाइतका सुंदर व पवित्र दुसरा सृजनात्मा जगात कुठेही दिसला नाही. अण्णा आपल्या दिव्यदृष्टीने समाजातील माणसांना फक्त 'माणूस आणि माणूसच' दाखविला. हेच अण्णांच्या समग्र कथावाङ्मयाचे सामर्थ्य असल्याचे पदोपदी जाणवते.

अण्णांनी आपल्या 'स्मशानातील सोनं' मधून भाकरीसाठी संघर्ष करणारा 'भीमा' रेखाटला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळूनही आज अनेक माणसे ही अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य अशा अनेक मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे पाहून हा लोकशिक्षक शासन व्यवस्थेला न्यायाचा संदेश देतांना दिसतो. 'बरबाद्या कंजारी' मधून भटक्या समाजाचे दुःख, वेदना, दारिद्र्य व अज्ञानावर प्रकाश टाकला आहे. 'मरिआईचा गाडा' मधून अण्णांनी अंधःश्रद्धेच्या आहारी केलेल्या समाजाला वैज्ञानिक दृष्टी दिली आहे. समाज हा केवळ आर्थिकदृष्टीने व भौतिकदृष्टीने संपन्न होत नाही, तर त्यासाठी सामाजाकडे नैतिकदृष्टीच असावी लागते, हा संदेशही अण्णांनी दिला आहे. देशातील जात व धर्माचे समूळ नष्ट करण्यासाठी अण्णांनी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन करणारे कृतिशील नायक-नायिका वाचकांसमोर उभे केले आहेत. तळागाळातील लोकांच्या उत्कर्षासाठी लढणारे आणि स्त्रियांच्या अब्रूची रक्षण करणारे अण्णांचे नायक हे एका लोकशिक्षकाचे निष्ठावंत राष्ट्रसैनिक आहेत. अण्णांच्या कथाविश्वातील स्त्री ही लढावू व चारित्र्यवान आहे. अण्णांनी आपल्या साहित्यात कोणत्याही स्त्रीला कलंकीत न करता तिच्या शीलाचे रक्षण करीत स्वाभीमानी स्त्रीचा आदर्श निर्माण करणारे अण्णा हे केवळ भारतातीलच नव्हे, तर संपूर्ण जगातील एकमेव लोकलेखक व लोकशिक्षक आहेत. अण्णांनी आपल्या साहित्यातून स्त्रियांकडे पाहण्याची समाजाची मानसिकताच बदलून टाकली. समाजातील कुरूप व अरूप चेहर्यांना अण्णांनी सौंदर्य बहाल केले. सौंदर्य हे माणसांच्या कातडीच्या रंगावर अवलंबून नसते, तर ते त्या व्यक्तिच्या कर्तृत्त्वावर अवलंबून असते हा अण्णांनी समाजाला संदेश दिला आहे. एका लोकशिक्षकाच्या भूमिकेतून अण्णांनी आपल्या कथाविश्वातून समाजाला स्वाभिमान शिकविला. ताठ मानेने जगण्याचा संदेश दिला. बुद्धी भ्रष्ट होऊन अंधश्रद्धा व दैववादाच्या आहारी गेलेल्या समाजाला विज्ञानाचा चष्मा दिला. नैतिकतेचे आत्मभान दिले. अन्यायाविरुद्ध लढण्याची ऊर्जा व प्रेरणा दिली. पृथ्वीवर जगणार्या सर्व माणसांना मानवतेची दीक्षा दिली.

### कादंबरीविश्व

अण्णांनी साधारणतः इ.स. 1948 पासून आपल्या कादंबरी लेखनाला प्रारंभ केल्याचे दिसून येते. 'वारणेच्या खोर्यात' ही त्यांची पहिली कादंबरी इ.स. 1951 मध्ये प्रकाशित होऊन वाचकांच्या हाती आली. आज अण्णांच्या



एकूण 30 कादंबर्या उपलब्ध असून त्यांच्या सात कादंबर्यावर आधारित मराठी चित्रपटांची निर्मिती झालेली आहे.

देशभक्त व क्रांतिकारांना कोणकोणत्या संघर्षाला तोंड द्यावे लागते हे 'वारणेच्या खोर्यात' चित्रित करून अण्णांनी देशभक्तीचा संदेश दिला. अण्णा आपल्या पहिल्या कादंबरी लेखनाच्या भावना व्यक्त करतांना म्हणतात, 'माझ्या या 'वारणेच्या खोर्यात' कादंबरीचे बाळपणही लहान बाळाप्रमाणेच आहे. वारणा नदीच्या खोर्यात माझ्या आयुष्यातील बरेच दिवस मी घालवलेले आहेत. तो सुंदर खोरा मी अगदी जवळून पाहिला आहे. त्या खोर्यात, त्या नदीकाठी, मला जे जे दिसले, ते सारे एका सूत्रात ओवून त्याची एक कथारूपी मला गुंफून ती मराठी साहित्याच्या गळ्यात घालावी असे मला एकसारखे वाटत होते.' समाजातील विषमता नष्ट होऊन माणसा-माणसांतील प्रेम व सलोखा वाढावा या उदात्त हेतूंनी अण्णांनी कथालेखन केले आहे. 'वैजयंता' मध्ये माणसांची कदर करीत त्यांनी माणसांवर अढळ विश्वास व्यक्त केला आहे. सत्य हे हृदयानं मिळावावे लागते हे सांगून 'ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे.' हे ऐतिहासिक तत्त्वज्ञान आपल्या मनोगतातून त्यांनी स्पष्ट केले आहे. 'आवडी'मध्ये जात नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाहाचा संदेश देणारी ही कादंबरी समता व मानवतेची गाथाच म्हणावी लागते. भारतातील स्त्री ही कोणत्याही कनिष्ठ वा श्रेष्ठ जातीतील असो, ती प्रत्येक स्त्री ही गुलामच आहे. म्हणूनच अण्णांनी 'चिखलातील कमळ' मधून देवाधर्माच्या नावाखाली स्त्रीचे जीवन उद्ध्वस्त करणार्या खोट्या परंपरा उखडून टाकून समाजव्यवस्था बदलाचा संदेश दिला. ज्या धर्माने स्त्रीला दासी व गुलाम बनविले आहे, त्याच स्त्रीला अण्णांनी प्रतिष्ठा व हक्क देण्यासाठी समाजाला परिवर्तनाचा उपदेश केला आहे. 'चंदन'मधील दुबळ्या विधवा स्त्रीला आत्मविश्वास व आत्मबळ देऊन तिला सशक्त केले. 'चित्रा' मध्ये स्त्रियांना आपल्या शीलरक्षणासाठी गुन्हेगारांबरोबर निकराचा लढण्याचा संदेश दिला. नोकरी वा पैशाचे अमिष दाखवून स्त्रीला वेश्या व्यवसायाकडे कसे वळविले जाते, त्याचे प्रत्ययकारी चित्रण 'फुलपाखरू'मध्ये आले असून अडचणीत सापडलेल्या स्त्रियांना समाजाने आधार देण्याचा अण्णांचा संदेश आहे.

अण्णांची 'फकिरा' ही सर्वोत्कृष्ट कादंबरी आहे. या कादंबरीला अनेक अभ्यासक, विचारवंत व संशोधकांनी सर्वोच्च उपमा देऊन तिचा यथार्थ गौरव केला आहे. अशा या कादंबरी लेखनाची कैफियत सांगताना अण्णा म्हणतात, 'कितीतरी दीर्घकालानंतर आईनं सांगितलं, की मी पहिली घुटी इंग्रजी खजिन्यातील लुटीच्या पैशाचीच खाली होती. मग आक्कानं, अप्पानं, त्या गावानं, माळानं नि खोर्यानं मला जे सांगितले ते हृदयात साठवून मी गप्प बसलो होतो. त्यानं माझ्यावर उपकार केला होता. त्याच्या पैशांची मी घुटी गिळली होती. सुरती रुपयांच्या दोन ओंजळी माझ्यावर उधळून तो गेला होता. त्याला मी कसा विसरणार? सरकारी खजिना लुटून केलेले उपकार कसे फेडावेत, याचा मी विचार करीत होतो. अखेर ज्ञानेशाची, तुक्याची, तीन कोटी मराठी जनतेची जी मराठी भाषा. तिचं भांडार लुटून, 'फकिरा'वर उधळून त्या दोन ओंजळींची फेड करण्याचा प्रयत्न मी केला आहे.' म्हणूनच फकिरा ही मानवी मूल्यांचा सर्वोत्कृष्ट दीपस्तंभ ठरली आहे. धाडस, निर्भयता, स्वाभीमान, देशप्रेम, गावाची अस्मिता असलेला हा लढवय्या फकिरा हा समतावादी आहे. फकिरा हा खुनी व दरोडखोर नाही, तर तो दुष्काळात अन्नाशिवाय मरणार्या माणसांना जीवनदान देणारा व व्यवस्थेच्या विरोधात एल्गार पुकारणारा देशभक्त, क्रांतिकारक व महानायक आहे. परस्त्रियांच्या अब्रूंचे रक्षण करीत त्यांना मातेचा दर्जा देणारा व संकटसमयी माणसांच्या जातीचा, धर्माचा व नात्यांचा विचार न करता पहाडासारखा संकटग्रस्त माणसांचे रक्षण करणारा 'फकिरा' हा मुक्तिदाता आहे, अशा क्रांतिकारी देशभक्त फकिराचा आदर्श अण्णांनी समाजासमारे उभा केला आहे. 'डोळे मोडीत राधा चाले' मधून अण्णांनी अध्यात्म क्षेत्रातील ढोंगी, दांभिक, स्त्रीलंपट व फसवेगिरी करणार्या साधूंपासून स्त्रियांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे. जनतेनी कोणत्याही कलावंताची प्रतिष्ठा नाकारण्यापेक्षा त्यांच्या कलेची कदर केली पाहिजे. हा विचार 'रानबोका'मधून व्यक्त झाला आहे. 'अहंकार'मध्ये प्रेम व रंजनवादी चित्रण असले, तरी माणसांनी अहंकारी जीवनाचा त्याग करून आपल्या अंगात विवेक व नम्रता अंगिकारण्याचा अण्णांनी वाचकांना संदेश दिला आहे. देशाचे रक्षण करण्यासाठी सीमेवर झुंजणार्या सैनिकांच्या पत्नीचे जीवन ग्रामीण भागात सुरक्षित नसल्याची खंत अण्णांनी 'रत्ना'मध्ये व्यक्त केली आहे. सैनिकांच्या पत्नींची वा कुटुंबियांची सुरक्षा करण्यासाठी समाजाने जबाबदारी स्वीकारली पाहिजे हा अण्णांनी संदेश दिला आहे.

शोषित, वंचित, भटक्या व आदिवासी समाजावर होणार्या अन्यायाची झाडाझडती 'माकडीचा माळ'मधून चित्रित झाली असून यात अण्णांनी वाचकांना माणुसकीचे स्मरण करून दिले आहे. 'वैर'मधून केवळ रक्त व अश्रू मिळतात, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांपासून सुरक्षित राहण्यासाठी माणसांनी सक्षम असायला हवे, हा आत्मरक्षणाचा विचार या कादंबरीतून व्यक्त झाला आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणार्या 'मास्तरा'च्या संसाराची कशी होळी होते, ते अण्णांनी 'मास्तर' या कादंबरीतून व्यक्त केले आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करणार्या व संघर्ष करणार्या क्रांतिकारी देशभक्तांच्या कायम ऋणात राहून समाजाने त्यांना वंदन करण्याचे अण्णांनी समाजाला आत्मभान दिले. अण्णांच्या कादंबरीविश्वात स्त्रियांची प्रतिष्ठा व अस्मिता आहे. समतावादी नव्या समाजाच्या निर्मितीचे स्वप्न आहे. ढोंगी, फसवेगिरी, गुन्हेगार, देशद्रोही, समाजद्रोही व धर्मांध माणसांना माणुसकीचे स्मरण करून दिले आहे. अण्णांनी दैववादी व अंधश्रद्धाळू समाजाच्या हातात विज्ञानाची जणू गाथाच दिली आहे.

### शाहिरीविश्व

प्रामुख्याने पोवाडे व लावण्या अशा पद्यरचनांचा शाहिरी वाङ्मयात समावेश होतो. साधारणातः इ.स. 1942-43 मध्ये अण्णांचा शाहीर म्हणून प्रवेश वा परिचय झाला होता. अण्णांनी पोवाडे, लावण्या व गीत यासारख्या पद्यरचनांचे लेखन केले आहे. अस्पृश्य कामगार, कष्टकरी व शेतकरी हे अण्णांचे प्रमुख श्रोते होते. नानकीन नगरापुढे, स्टॅलिनग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा, बंगालची हाक, पंजाब दिल्लीचा दंगा, तेलंगणचा संग्राम, महाराष्ट्राची परंपरा, अमळनेरचे अमर हुतात्मे, मुंबईचा कामगार व काळ्या बाजाराचा पोवाडा यातून अण्णांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर आवाज उठविला आहे. अण्णांची शाहिरी ही लोकशिक्षक वा लोकशिक्षणाचे स्फुलिंग आहे. देशाभिमान, दीन-दुबळ्या, कष्टकरी व कामगारांच्या दुःखाची त्यात तेजस्वी अस्मिता आहे. त्यांच्या शाहिरीत मानवतेचा उद्घोष करीत विश्वबंधुत्वाचा संदेश आहे. अण्णांच्या शाहिरीत लोकशिक्षकाची प्रामाणिक तळमळ व सर्वस्पर्शी क्रांतीच्या ठिणग्या आहेत. 'महाराष्ट्राची परंपरा' मधून अण्णांनी महाराष्ट्र व मराठी माणसांची गौरवशाली परंपरा स्पष्ट केली. दुष्काळ व संकटात सापडलेल्या 'बंगाली' माणसांना मदत करण्यासाठी अण्णांनी महाराष्ट्राला हाक दिली. नानकिंग नगरापुढे, स्टॅलिनग्राडचा पोवाडा व बर्लिनचा पोवाड्यातून आंतरराष्ट्रीय चळवळींचे आत्मभान दिले. समाजात अन्न-धान्यांची कृत्रिम टंचाई करणार्या भ्रष्ट लोकांचा विद्रुप चेहरा 'काळा बाजारा'तून रेखाटला आहे, देशातील तो काळा बाजार आजही तसाच असल्याचे दिसून येते. आहे. दहशत, गुलामी, वेठबिगारी, शोषण, सावकार व भांडवलदारांच्या विरोधात बंड करून सर्वांनी एकत्रित लढण्याचे स्फुल्लींग 'तेलंगणचा संग्राम' मधून पेटविले. 'पंजाब-दिल्लीचा दंगा'मध्ये भारतातील सर्व जाती-धर्मातील माणसांना माणुसकीची व राष्ट्रीयत्वाच्या एकात्मतेची हाक दिली.

अण्णांनी 'मुंबईची लावणी' मधून मुंबईतील गरीबी व श्रीमंती अशा विषमतेचे वास्तव तटस्थपणे रेखाटले आहे. 'माझी मैना गावावर राहिली'मधून अण्णांनी कर्नाटक राज्यातील मराठी बांधवाना 'मैने'च्या रूपात उभे करून या लावणीची रचना केली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची ही लावणी असून कर्नाटकातील बेळगाव, कारवार, निपाणी व गोवा या मराठी भाषिक प्रांतांना महाराष्ट्रात विलीन होण्याची तळमळ व त्यांचे दुःख व्यक्त केले आहे. 'जग बदल घालुनि घाव'मध्ये समाजातील अस्पृश्यांचा भांडवलदार, धर्मांधांनी कसा छळ व अपमान करून कलंकित केले. शोषणाच्या गुलामीतून मुक्त होण्यासाठी नव्हे तर, माणूसपण नाकारणारी समाज व्यवस्था उद्ध्वस्त करून मानवतावादी नव्या जगाच्या निर्माणासाठी संघटीतपणे अन्यायी व्यवस्थेवर घाव घालण्याचे अण्णांनी आवाहन केले.

### लोकनाट्य व इतर लेखन

शाहिरी वाङ्मयाशिवाय अण्णांनी चौदा लोकनाट्य, एक नाटक व एका प्रवास वर्णनाचे लेखन केले आहे. अण्णांनी साधाणतः इ.स. 1945 मध्ये लोकनाट्यक्षेत्रात दाखल झाले. अण्णांनी तमाशाचे रूपांतर लोकनाट्यात करून लोकनाट्याला सामाजिक परिवर्तनाचे व प्रबोधनाचे प्रभावी हत्यार म्हणून वापर केला. अण्णांनी आपल्या लोकनाट्यातून सामाजिक प्रश्न प्रभावीपणे हाताळले. अण्णांनी आपल्या लोकनाट्यातून भाषिक, प्रादेशिक व राष्ट्रीय प्रश्नांची जाणीवही करून दिली. खोटी समाजसेवा, ढोंगी देशभक्ती, भ्रष्ट व लबाड पुढारी, सावकार व जमिनदारांकडून कामगारांचे होणारे शोषण व लूट यासारख्या तत्कालीन सामाजिक व राजकीय प्रश्नांवर अण्णांनी प्रहार करून व्यवस्थेची शस्त्रक्रियाच केली. अण्णांनी कागमार व श्रमिक वर्गाला ज्ञानसंपन्न होण्याचा उपदेश केला. 'बेकायदेशीर'मध्ये निवडणुकीत पैशाच्या माध्यामातून लोकशाहीचा कसा खून केला जातो, यावर अण्णांनी वास्तव भाष्य केले आहे.

अण्णांनी 'वैर' या आपल्या कादंबरीवर आधारित 'इनामदार' नाटकाचे लेखन केले. 'इनामदार' मध्ये काही प्रसंगनिष्ठ विनोद असला तरी अण्णांनी त्यात वर्ग, वर्ण व जातीअंतांच्या समाज निर्मितीचे स्वप्न साकारले आहे. तसेच 'माझा रशियाचा प्रवास' हे अण्णाचे एकमेव प्रवासवर्णन आहे. या प्रवासवर्णनातून अण्णांची स्मरणशक्ती, वर्णनशैली, जिज्ञासा, विनोदबुद्धी, भारत-रशियातील सामाजिक व राजकीय तुलनात्मक परिस्थितीचे प्रतिबिंब प्रकर्षाने जाणवते. या प्रवासवर्णनातून अण्णांनी भारतीय शासन, प्रशासन, न्याय व एकंदरीत समाज व्यवस्थेला प्रबोधनाचे अनेक धडे दिले आहेत. शिक्षण व ज्ञानावर प्रेम. स्वातंत्र्य, शांती, प्रेम व त्याग. निर्भयता व जुलूमशाहीला प्रखर विरोध. सभ्यता, नम्रता व उद्योगशीलता, भूक व दारिद्र्य मुक्तता केलेल्या देशाचे अशा विषयांवरील अण्णांचे प्रवासवर्णन भारतासाठी मार्गदर्शक आहे. त्यात समाजवादी समाज, संस्कृती व सभ्यतेचे वास्तवदर्शन आहे. शोषणमुक्त माणसांचा व समाजाचा अण्णांनी तटस्थतेने घेतेलेला वेध आहे. यातून अण्णांनी आपले स्वकर्तृत्व, प्रज्ञा व प्रतिभेने हिमालयापेक्षाही उंच भरारी घेतल्याचे दिसून येते.

### समारोप

अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र साहित्यात वैश्विक मानवतेचा उद्गार आहे. एका लोकशिक्षकाच्या भूमिकेतील अण्णांच्या समग्र साहित्यातील पानापानावर परिवर्तनाचा व प्रबोधनाचा उपदेश आहे. सत्य व असत्य प्रवृत्तीचा तीव्र संघर्ष आहे. समाजातील वंचित, अस्पृश्य, उपेक्षित, निराधार व दुर्बल स्त्रीयांचा आत्मस्वर आहे. अण्णांनी जाती-धर्मापेक्षा माणूसकीचा धर्म सर्वश्रेष्ठ असल्याचा संदेश दिला आहे. अण्णांच्या मानवतावादी लेखणीने नैतिकतेची सदैव पाठराखण करीत समाजाला म. बुद्ध, मार्क्स, लेनिन, संत कबीर, छत्रपती शिवराय, म.फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतावादी व मानवतावादी विचाराची दृष्टी दिली. अण्णांनी आयुष्यभर कोणत्याही जाती वा धर्माचा पुरस्कार न करता ते निधर्मी राहून मानवमुक्तीच्या साहित्याची निर्मिती केली. अण्णांच्या साहित्यातील नायक नायिका निर्भय, धाडसी, नीतिमान व सामाजिक क्रांतिच्या निर्माणासाठी हौतात्म्य पत्करण्यासाठी सिद्ध होतात. अण्णांचे नायक-नायिका हे कुरुप व अरूप असले तरी ते न्यायासाठी, सत्यासाठी व देशासाठी झुंजणारी आहेत. प्राण देणारी आहेत. म्हणून अण्णांचे समग्र साहित्य हे सामाजिक परिवर्तन, उद्बोधन व प्रबोधनाचे रणक्षेत्र व परिवर्तनाचे प्रवेशद्वार आहे. अण्णांच्या वास्तववादी साहित्याकडे मराठी समीक्षाकांनी पाठ फिरविली असली, तरी खर्या अर्थाने प्रतिभावंत अण्णांनीच मराठी समीक्षकांचा पूर्णतः पराभव केला. अण्णांच्या साहित्यातील लढा व संघर्ष हा मानवी मूल्यांवर आधारलेला आहे. अण्णांनी आपल्या मानवमुक्तीच्या या लढ्यात निसर्गालाही नायकत्व दिले, म्हणूनच त्यांचे नायक-नायिका सर्वव्यापी व वैश्विक आहेत. अण्णांनी आपल्या मानवतेच्या निष्ठेचा दारिद्र्याच्या व संघर्षाच्या परिस्थितीत कधीही भंग होऊ दिला नाही.

अण्णा भाऊ साठे हे कोणत्याही एका जातीच्या, धर्माच्या व एखाद्या विशिष्ट देशाच्या शाळेतील लोकशिक्षक नव्हते, तर ते जागतिक पातळीवरील मानवमुक्तीच्या शाळेतील जागतिक लोकशिक्षक होते. अण्णा हे क्रॉमेड होते आणि कॉम्रेडला कधीही मृत्यू नसतो. कॉम्रेड हे आपली कार्ये, लढाया, विचार व क्रांतीच्या रूपाने ते युग प्रवर्तक म्हणून चिरंतर व अमर राहतात. म्हणूनच अण्णा भाऊ साठे आणि त्यांचे समग्र साहित्य हे युगानुयुगे चिरंतर राहून मानवतावादी युगाच्या निर्माणासाठी संपूर्ण विश्वाला सदैव संदेश देत राहिल हे निर्विवाद सत्य सूर्यप्रकाशापेक्षाही स्पष्ट आहे. अण्णा हे लोकयुद्धाच्या रणांगणातील लेखक होते. क्रांतीची भाषा बोलणारे लोकशाहीर, राष्ट्रशाहीर व विश्वशाहीर होते. जात, धर्म व शोषणविरहीत मानवतावादी समाज निर्माणाचे अण्णांनी वैश्विक युद्ध पुकारले होते. हे युद्ध आपणास जिंकावयाचे आहे, म्हणूनच अण्णा आपल्या मानवनिष्ठ सैनिकांना निर्भयपणे व आत्मविश्वासाने लढण्याची ऊर्जा, बळ व प्रेरणा देतांना म्हणतात...

**आता वळू नका ।**
**रणि पळू नका ।**
**कुणी चळू नका ।**
**बिनी मारायची अजून राहिली ।**
**माझ्या जिवाची होतीया काहिली ॥**

# होऊन गेले थोर हुतात्मे चरित्र त्यांचे पहा जरा



श्रावण गिरी
संपर्क क्र. ९५२७५४०१६८

आधुनिक केसरी

**भारतीय स्वातंत्र्य लढयातील थोर सेनानी लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रमाचे सर्वत्र १ ऑगस्ट रोजी उत्साहात आयोजन केले जाते. होऊन गेले थोर हुतात्मे चरित्र त्यांचे पहा जरा या उक्तीनुसार महापुरुषांच्या आणि हुतात्म्यांच्या स्मृती जागवताना त्यांनी केलेल्या कार्यातून त्यांची भूमिका आणि बांधिलकी स्पष्ट होते. त्यातून पुढच्या पिढीला प्रेरणा घेता याव्यात, या उदात्त हेतूने १ ऑगस्ट हा दिवस शाळा महाविद्यालयात आणि सामाजिक क्षेत्रात निबंध, गायन, परिसंवाद, व्याख्यान कविसंमेलनआदी कार्यक्रमांचे भव्य आयोजन केले जाते. स्वातंत्र्य लढयातील असंतोषाचे जनक लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी आणि साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे जयंतीचे औचित्य साधून साजरा होणारा कार्यक्रम बालवयापासून मी पाहत आलो आहे. मी विद्यार्थी असताना शालेय वातावरण तसे छान होते तरीही शिक्षक आण्णाभाऊ साठे यांच्या विषयी बोलत नसत. हळूहळू साहित्य आणि सामाजिक जाणिवांच्या परिपक्वतेसह काही गोष्टी लक्षात येत गेल्या. त्यापैकी अण्णाभाऊ साठे यांची जयंती हा विषय होता.**

अनेक विद्यार्थ्यांची भाषणे लोकमान्य टिळक हा विषय घेऊन व्हायची. भाषणाला सुरुवात करताना टिळकांच्या पुण्यतिथी बरोबर अण्णाभाऊ साठे यांची पण जयंती आहे एवढेच आण्णाभाऊ साठे यांच्या विषयी बोलून पुढे फक्त लोकमान्य टिळक हा विषय चर्चिला जायचा. जास्तीत जास्त टिळकांवरतीच भाषणे व्हायची. पृथ्वी ही शेषाच्या फण्यावर नसून ती श्रमिकांच्या कष्टावर तरली हे आण्णाभाऊ साठे यांचे तर स्वराज्य हा माझा जन्म सिध्द हक्क आहे, तो मी मिळवणारच हे लोकमान्य टिळकांचे वाक्य फलकावर ठळक लिहले जायचे. मी शिक्षक आणि सांस्कृतिक विभागाचा प्रमुख झाल्यानंतर मला ही बाब लक्षात विशेष लक्षात येवू लागली. त्यामुळे मी अर्धी भाषणे अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर तर अर्धी लोकमान्य टिळकांविषयी देत असे. दोन्ही नेत्यांच्या स्वतंत्र बाजू मांडल्यामुळे विद्यार्थ्यांना स्पष्ट कळायचे.

मराठा या इंग्रजी आणि केसरी या मराठी वृत्तपत्रातून स्वातंत्र्यप्राप्ती आणि राष्ट्रीय अस्मिता जागृत करण्याचे काम टिळकांनी केले. शिवजयंती आणि गणेशोत्सवाच्या प्रभावी माध्यमातून देशनिष्ठा जागवत इंग्रजांविरुद्ध समाजमन पेटवले. टिळकांना पारतंत्र्याचा धगधगता अनुभव असल्यामुळे त्यांनी जहाल मतवाद स्विकारून अखेरच्या श्वासापर्यंत म्हणजे 1920 पर्यंत प्राणपणाने लढत दिली. त्यांच्या बालपणीचा एक अनुभव नेहमी सांगितला जातो. एकदा वर्गात शेंगा खाऊन टरफले टाकली होती. हे काम लोकमान्य टिळकांनीच केले असा त्यांच्यावर आरोप केला गेला परंतु हे खोटे असल्याने त्यांनी शिक्षा घेण्यास नकार दिला, हा त्यांचा स्वाभिमानी सत्यबाणा विद्यार्थ्यांनी लक्षात घ्यावा. स्वातंत्र्यलढ्यात काम करताना स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच ही प्रतिज्ञा, स्वदेशी मालांचा स्वीकार करून परदेशींची होळी, देशी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना भरती करण्याचा आग्रह, किडकिडी प्रकृती असताना त्याविषयी कोणीतरी बोलल्यानंतर प्रयत्नपूर्वक व्यायामातून बलदंड शरीर निर्माण करणे ही उदाहरणे लोकमान्य टिळक यांची सचोटी, जिद्द आणि देशप्रेम स्पष्ट करतात. मंडलेच्या तुरुंगात त्यांनी गीता रहस्य हा ग्रंथ लिहिला. इतिहासातील लाल बाल आणि पाल यातील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली या गावी झाला. विद्यार्थी दशेतच त्यांनी भारतीय माणसांची गरिबी, लाचारी, अन्यायी



जीवन पाहिले होते. समज वाढत जावून अस्वस्थ होत पुढे ते आगरकरांशी विचार विनिमय करीत राजकीय चळवळीत सक्रिय झाले. १८९६ साली शेतकऱ्यांना न्याय मिळावा म्हणून आंदोलन केले. १८९७ ला चाफेकर बंधू यांच्या बाजूने वृत्त पत्राद्वारे ठणकावून बाजू मांडली. १९०८ ला सूरत अधिवेशनात काँग्रेसचे जहाल-मवाळ गट झाले तेव्हा. त्यानंतर मुझफ्फूर बॉंबस्फोट प्रकरणी खुदिराम बोस यांना फाशी झाली तेव्हा केसरी या वृत्त पत्रामधून लिहलेला अग्रलेख आणि दडपशाही विरोधातील एकूण सर्व कार्य पाहता भारतीयांमध्ये स्वाभिमान पेरणाऱ्या टिळकांनी १ ऑगस्ट १९२० साली देह ठेवला. त्यांच्या मृत्यूनंतर स्वातंत्र्य लढयाची सूत्रे महात्मा गांधींच्या हाती आली. अशा थोर देशभक्त लोकमान्य टिळकांना त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम!

१ऑगस्ट१९२०रोजी मराठी साहित्यातील सम्राट अण्णाभाऊ साठे यांचा वाटेगाव ता.वाळवा जि.सांगली येथे जन्म झाला. त्यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांचा कार्यगौरव करताना मनाला अतिशय आनंद होत आहे. शाहीर अमर शेख यांच्या सोबत पोवाडे सादर करीत कलापथकात प्रदर्शन करीत प्रबोधन करीत आण्णाभाऊ साठे यांनी लेखन केले. प्राथमिक शिक्षण सुध्दा पूर्ण झाले नसताना ३७ कादंबऱ्या, १९ कादंबऱ्या, ११ पोवाडे, १५ वगनाट्ये, ७ सिनेमे आणि प्रवास वर्णन आदी ग्रंथनिर्मिती करणारे आण्णाभाऊ साठे यांच्या विषयी बोलताना प्रसिद्ध लेखक प्र.के. अत्रे म्हणतात, "त्यांनी जगण्यासाठी लढणाऱ्यांसाठी कथा लिहिल्या. कच खाणारी, हार मानणारी, वार झेलण्यासाठी ताठ छाती उभारलेली माणसं तेजस्वी भाषेत रंगवली" साम्यवादी विचारांशी त्यांची नाळ होती. शोषित समाजव्यवस्था बदलासाठी संविधानाचा सनदशीर मार्ग दाखवत कायदेशीर प्रयत्न करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी जग बदल घालुनी घाव सांगून गेले मला भीमराव म्हणत सामाजिक चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले. कामगार, शोषित, वंचितांना न्याय देण्यासाठी यह आझादी झूठी है देश की जनता भुकी है म्हणत स्वातंत्र्य प्राप्तीनंतर त्यांनी सरकार विरोधी मोर्चा काढला. आयुष्यभर चळवळी उभ्या केल्या. त्यांच्या कार्याची दखल घेत रशियात त्यांचा पुतळा उभारला गेला. असा हा भारतीय थोर साहित्यिक व्यवस्थेचे चटके बसल्यामुळे शाळेतून बाहेर पडतो. अफलातून साहित्य निर्मिती करतो आणि व्यवस्थेने नाकारलेले अतीसामान्य लोक नायकांच्या भूमिकेत साकारतो. वारणेच्या खोऱ्यातील सत्तू अथवा फकीरा, खाशाबा, मास्तर, संभाजी हे पुरुष नायक ज्या ताकदीने त्यांनी उभे कले तितकेच सामर्थ्य आवडी, शीला, सुलभा, वैजयंता इत्यादी स्त्री नायिकांच्या व्यक्तिरेखांमधून दिसून येईल.माझी मैना गावावर राहिली, मुंबईची लावणी आणि त्यांच्या विविध कथासंग्रहातून याचा प्रत्येक येतो. 1958 मध्ये मुंबई येथील महाराष्ट्र दलित साहित्य संमेलनाचे उद्घाटन करताना पृथ्वीही शेषाच्या मस्तकावर तरली नसून श्रमिकांच्या अर्थात दलितांच्या तळहातावर तरली हे सांगणाऱ्या अण्णाभाऊ साठेंनी परिवर्तनवादी समाज घडविण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. काफिला कवींचा या कार्यक्रमाचे 10 जून 2018 रोजी पालघर जिल्ह्यातील चिंचणी येथे उद्घाटन करताना कविवर्य वसंत आबाजी डहाके म्हणतात, "कोणतीही विचारसरणी असो वातावरणातील किंकाळ्या आणि मानवता विरोधी विचार हत्या स्त्रियांवरील अन्याय टिपण्याचे काम कवी लेखक आणि कलावंत करतो" हेच काम अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून केले. त्यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम!

शाळा, महाविद्यालय आणि सामाजिक संस्थांमधून चरित्र नायकाला नव्या पिढीसमोर मांडताना आदर्शातून नवनिर्माण होत समाज व्यक्ती द्वेष आणि मत्सराच्या बाहेर पडावा. तोडण्यापेक्षा जोडण्याचे काम करावे. विवेक दृष्टी वाढत गेल्यावर वास्तव कळतच असते. तूर्तास या कोवळ्या कळयामाजी लपले कवी नरेंद्र, शिवाजी विकसता प्रगटतील समाजी याचे भान ठेवून समाज बांधणीतील महात्मे, हुतात्मे आणि सुधारकांच्या कार्याची दखल घेत त्यांना गौरविण्यात आले तरच उद्याचा सक्षम भारत तयार होईल, हे स्पष्ट आहे.

# आत्मचिंतनाचा मार्गदर्शक



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**मानवी जीवन हे सुख- दुःखाची मालिका असते. विविध स्वभाव, गुणधर्माच्या व्यक्ती आपल्या आजूबाजूला असतात. जीवन जगण्याची ठरावीक पद्धत असते, काहींनाकाही ध्येय असते. मौज-मजा यापलीकडे जीवनाचे सार, खरे सुख-शांती, समाधान कशात आहे? हे शोधण्यात मानव गुंतून पडतो. प्रपंच करताना आत्मभाव कुठेतरी हरवत जातो. मनाच्या गाभाऱ्यात अनेक गोष्टी दडलेल्या असतात. जीवनाला योग्य दिशा देण्याचे काम करते अध्यात्म. जीवनाचे खरे सूत्र अशा आध्यात्मिक ग्रंथातून समजतात. फक्त वयाच्या ठराविक टप्प्यात असणाऱ्या व्यक्तींसाठी हे ज्ञान आहे असे नाही. ते संपूर्ण मानवजातीसाठी आहे, याची जाणीव करून देणे गरजेचे आहे.बाहेरील प्रलोभने यांना भुलून मन भरकटत चालले आहे. त्या भरकटलेल्या मनाला योग्य दिशा देण्यासाठी चांगल्या आणि दर्जेदार ग्रंथांची निर्मिती मराठी साहित्यात झाली आहे.**

विविध धर्म, संस्कृती यांमध्ये ही अशा विविध ग्रंथांची निर्मिती होत असते. आपण फक्त आपलेच साहित्य वाचतो. पण इतर भाषेतील दर्जेदार साहित्य सुद्धा विविध भाषांमध्ये अनुवादित होऊन येऊ लागले आहे. अनुवाद या प्रकारामुळे वेगवेगळ्या भाषेतील साहित्य जगभरात पोहोचले. अनुवादामुळे इतर साहित्य सुद्धा अभ्यासता येणे शक्य झाले.

लेखिका अंजली खिस्ती लिखित 'पक्ष्यांची सभा' हे अनुवादित पुस्तक म्हणजे जगण्याचं मर्म व्यक्त करणारे परिपूर्ण ग्रंथ आहे. बाराव्या शतकातील जगप्रसिद्ध पर्शियन लेखक फरीदुद्दीन अत्तार यांचा सुफी काव्यग्रंथ 'मन्तिक़ उत् - तैर' या ग्रंथाचे मराठी गद्यानुवाद अंजली खिस्ती यांनी सर्वप्रथम केला. या ग्रंथात सुफी पंथाची एकूण ओळख होते. हा ग्रंथ समजून घेण्यासाठी मुळात त्या पंथाची ओळख करून घेणे महत्वाचे आहे. लेखक फरीदुद्दीन अत्तार यांची एकूण जीवनशैली, त्यांचे गूढ ज्ञान, त्यांची ग्रंथसंपदा, त्यांचे विचार याची माहिती लेखिकेने पुस्तकाच्या सुरुवातीला करून दिली आहे.

वाचन करताना एके ठिकाणी ' मन्तिक़ उत् - तैर' हा शब्द खिस्ती यांच्या वाचनात आला आणि त्यांच्यातील उत्सुकता वाढत गेली. त्यांनी भरपूर वाचन केले, माहिती गोळा केली, संशोधन केले, सुफी पंथाचा अभ्यास केला आणि 'पक्ष्यांची सभा' असा अनुवाद केला. त्यांच्या मनोगतातून त्यांची या ग्रंथामागील मेहनत दिसून येते. या ग्रंथाचे लेखन करताना कुठेही धर्म-जात यांचा अडसर मनात न आणता चांगलं साहित्य मराठी भाषेत यावे, ही शुद्ध भावना मनात ठेवून खिस्ती यांनी हा लेखन प्रपंच केला.या पुस्तकातून कुठल्या प्रकारे इस्लामचे उदात्तीकरण केलेले नाही. मानव म्हणून जगताना आपण कोणत्या मार्गाने गेले पाहिजे, अंतःकरण शुद्धीचे एक प्रकारे औषधच या पुस्तकाद्वारे मिळेल. या पुस्तकाचा अनुवाद करताना मूळ ग्रंथातील भाव, आशय याला कुठेही धक्का न लावता त्यातील मौलिक भाव 'पक्ष्यांची सभा' या ग्रंथात उतरला आहे.


या ग्रंथात विविध पक्षी आहेत आणि त्यांना मार्गदर्शन करणारा हुपी पक्षी आहे. त्यांची सभा भरते. पक्ष्यांना वाटते की सर्वांना राजा असतो मग आपल्याला ही राजा हवा. सर्व पक्ष्यांना वाटते की हुपीने राजा व्हावे पण हुपी या सर्व पक्ष्यांना सिमुर्घ पक्षी हा राजा म्हणून कसा योग्य आहे आणि त्याला आपण का भेटायचे, याचे महत्त्व सांगतो आणि सुरू होतो प्रवास या ग्रंथाचा. गुरू - शिष्य संवाद ही रचना लक्षात घेऊन हुपी आणि इतर पक्षी यांचा संवाद घडत जातो. यातील विविध पक्षी हे मानवी वृत्तीचे प्रतीक म्हणून पुढे येतात. मानवी मन अहंकार, प्रेम, ईर्षा, द्वेष, राग, लोभ, मोह, वासना यांनी ग्रासलेले आहे. सगळ्याच मानवात हे गुण -अवगुण एकत्रित असतातच. या वाईट भावनांवर कशा प्रकारे नियंत्रण ठेवायचे, याची शिकवण मिळते. या ग्रंथातील सर्व पक्षी सिमुर्घच्या भेटीला जाण्यासाठी कसे असमर्थ आहेत, तो प्रवास त्यांना कसे शक्य नाही, याची कारणे देत राहतात आणि या हुपी या सर्वांना जाणीव करून देतात की, ही कारणे किती जुजबी आहेत. काहीतरी प्राप्त करण्यासाठी काहीतरी त्यागावे लागते, हा बोध यातील संवादातून होतो. पुस्तक वाचताना अनेक उर्दू शब्द वाचायला मिळतील. उर्दू भाषेचे ज्ञान असल्यामुळे लेखिकेने या ग्रंथात समर्पक पध्दतीने उर्दू शब्दांची रचना केली आहे आणि त्या शब्दांचा अर्थही सोबत दिलेला आहे.

सुफी पंथाच्या मूळ तत्वज्ञानाचा परिचय करून देण्यासाठी अनेक रूपककथा यात समाविष्ट केलेल्या आहेत. त्या पंथातील अनेक सुफी संतांच्या कथा यात आहेत. या रूपककथा अर्थ आणि बोधपूर्ण आहेत. जीवनाचे सार यातून उलगड जाते. सुफी पंथातील महत्त्वपूर्ण आणि मौल्यवान भावना म्हणजे प्रेमभाव. हा प्रेमभाव पूर्णपणे या ग्रंथात उतरला आहे.

मनुष्य हा आपआपल्या विश्वात रमलेला असतो. अहंभाव, मी - पणा यातून बाहेर पडून आम्ही म्हणून या जगाकडे, आजूबाजूच्या माणसांकडे पाहण्याची, दुःख, वेदना यांची जाणीव होऊन आत्मसंतुलन साधण्याची नवी संधी देणारे हे पुस्तक आहे. आपल्यातील कमतरतेकडे सकारात्मक दृष्टीने पाहून त्याचा वापर योग्य कार्यासाठी कसा करावा, याचे उत्तर या पुस्तकात आपल्याला मिळेल. आत्मबल वाढवण्याचे बूस्टर म्हणजे 'पक्ष्यांची सभा' हे पुस्तक!

या पुस्तकातील हुपी हा इतर पक्ष्यांना सिमुर्घपर्यं पोहोचण्यासाठी सात दऱ्या पार कराव्या लागतील असे सांगतो.त्या सात दऱ्या कोणत्या ? आणि ते पक्षी त्या सात दऱ्या पार करतात का ? या प्रवासात नेमके पुढे काय होते हे जाणून घेण्यासाठी हे पुस्तक नक्की वाचा. आयुष्याकडे पाहण्याची नवी दृष्टी प्राप्त होईल. आत्मचिंतन करायला हे पुस्तक प्रवृत्त करते. हे पुस्तक वाचताना कुठेही धर्माचा भाग पुढे न येता फक्त त्यातील तत्वज्ञान, अध्यात्मभाव आणि प्रेमभाव यांचा वावर या पुस्तकात पदोपदी जाणवत राहतो. प्रेमाला भाषेचे बंधन नसते त्यामुळे हा भाव हे पुस्तक वाचताना वाचकांना आपलेसे करते.

लेखिका अंजली खिस्ती यांनी 'मन्तिक़ उत् - तैर' या काव्ययग्रंथाचा 'पक्ष्यांची सभा' हा गद्यानुवाद मराठीत सर्वप्रथम आणल्यामुळे अशा मौलिक आणि सामाजिक, धार्मिक मूल्ये जपणारा ग्रंथ मराठी साहित्यात समाविष्ट झाला. हा ग्रंथ रसिक वाचकांच्या संग्रही असायलाच हवा !



तुकारामनीती
भाग 19

# प्यार खुदाई रे बाबा जिकिर खुदाई ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**तुकाराम नीती लिहायला लागलो आणि तुकोबांचा संग आणि व्यासंग आणखी वाढत जातो आहे हे विशेष ! मी कीर्तन-प्रवचन-लेखन-व्याख्यान याच्या माध्यमातून महाराष्ट्रभर फिरत असतांना ओळखीचे सद्गृहस्थ भेटले कि; तुकाराम निती विषयी बोलत आहेत याचे अप्रूप वाटते ! कालपरवा दोन-चार वारकरी मित्र भेटले आणि हाच विषय थोडा चर्चेत आला. श्री भगवान पांडुरंगाएवढेच वारकरी मंडळींचे आराध्य दैवत म्हणजे तुकोबा ! त्यांनी बऱ्याच सुचना केल्या, त्यातील काही भावनिक होत्या, त्या स्वीकारून हे वृत्त असेच चालू ठेवणार आहे. तुकोबा हे इथल्या माणसाच्या धमन्यातून वाहणारा अखंड विचारप्रवाह ! त्यांच्या अभंगांनी अक्षशः इथला तळ ढवळून काढला होता आणि आजसुद्धा ढवळला जात आहे हे वेगळे सांगणे न लगे ! आजही बरेच लोक संत तुकोबांना केवळ भावनेच्या परीपेक्षातून पाहात आहेत, त्यांच्या भावनांचा आपण प्रचंड आदर करायला हवा परंतु त्या भावनांच्या प्रवाहात तुकोबांचा मूळ विचार जर वाहून गेला तर मात्र 21 व्या शतकात सुद्धा तुकोबांचा समाज सुधारणा आणि माणूस मजबुतीचा विचार उपेक्षित राहू नये याची भीती वाटते ! भावना जरी महत्वाच्या असल्या तरी भावनेने पोट भरत नाही, हे ही तेवढेच महत्वाचे आहे.**

तुकोबांना संत, महाराज, कीर्तनकार, बाबा वगैरे उपाध्या हा लोकांनी केलेला खटाटोप असून त्यापलीकडे तुकोबांचा विचार आपल्याला त्यांच्या गाथ्यात वाचायला मिळतो त्याचे काय ? तेंव्हा, तुकोबांचा गाथा वाचतांना असे एक ना अनंत प्रश्न आ वासून उभे राहतात. खरंच तूकोबांनी सर्वच धर्माच्या लोकांना सोबत घेऊन फक्त आणि फक्त माणसाचे उत्थान झाले पाहिजे यासाठी अहोरात्र प्रबोधन केलेले आढळून येते, म्हणूनच तर त्यांच्यावर प्रस्थापितांनी हल्ले चढवले आणि शेवटी त्यांना देव बनवून, लोकांना भावनेत अडकवून आपला मूळ व्यवसाय सुरूच ठेवला !

'तुकाराम नीती'साठी संत तुकोबांचा गाथा वाचत पुढे अभंग निवडतांना त्यांचे बरेच हिंदी अभंग वाचनात येत असून यावरसुद्धा सखोल आणि धर्मातीत विचार होणे किती गरजेचे आहे ( ?) असे वाटले. तुकोबांनी जवळपास सत्तर अभंग तत्कालीन हिंदी भाषेत लिहिले असून ते मुंढा 3, डोइफोडा 1, मलंग 1, दरवेस 1 आणि वैद्यगोळी 1 असे सलग सात हिंदी अभंग गाथ्यात असून त्यातील भावार्थ आणि शब्दांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. त्याच अनुषंगाने

**संबाल यारा उपर तलें दोन्हो मारकी चोट ।**
**नजर करे सो ही राखे पश्वा जावे लुट ॥1॥**
**प्यार खुदाई रे बाबा जिकिर खुदाई ॥ध्रु.॥**
**उडे कुदे ढुंग नचावे आगल भुलन प्यार ।**
**लडबड खडबड कांहेकां खचलावत भार ॥2॥**
**कहे तुका चलो एका हम जिन्होंके सात ।**
**मिलावे तो उसे देना तो ही चढावे हात ॥3॥**

**(शा.अ.गाथा अ.क्र.438)**

हा मुंढा भागातील अभंग आहे. मुंढा म्हणजे काय ? याचे अनेक अर्थ मराठी शब्दकोषात असले तरी इथे डोके, मूढ, नौकर किंवा एक सामान्य माणूस या अर्थाने तुकोबाराय जडमूढ लोकांना उपदेश करताहेत. प्रस्तुत अभंगात संत तुकाराम सर्वांना 'संबाल' म्हणजेच सावध करून जन्म-मृत्यू या दोन मोठ्या जखमांची आठवण करून देतात. तसेच पाहता पाहता आपले आयुष्य काळ लुटून नेत असून "प्यार खुदाई रे बाबा जिकिर खुदाई" असा सावधानतेचा सल्ला देतात. प्रेमाने वागून कोणतीही काळजी करू नका असेच त्यांना सांगायचे आहे. इथे तुकोबांची हिंदी भाषासुद्धा सहजतेने लोकभाषा होतांना अधोरेखित होते. संसारी गोष्टींचा अतिरेक करून व्यर्थ लुडबुड आणि बडबड करणाऱ्यांनी आपल्या संसाराचे ओझे उचलतांना आपण ज्यांच्या सोबत आहोत त्यांचीच सातत्याने साथ द्यायला हवी असे इथे अभिप्रेत आहे !

तुकोबांच्या गाथ्यातील 'मुंढा' या प्रकरणात एकूण तीन हिंदी रचना असून या तिन्ही अभंगामध्ये एक साम्य म्हणजे "संबाल" हा उपदेश तूकोबांनी इथे केलेला दिसून येतो. या अभंगांमध्ये तूकोबांनी जाहीरपणे ईश्वरासाठी अल्ला हा शब्द उपयोगात आणला असून त्यांना केवळ एका विशिष्ट धर्माच्या लोकांना मार्गदर्शन करायचे नव्हते हे सहज लक्षात येते.

**आवल नाम आल्ला बडा लेते भुल न जाये ।**
**इलाम त्याकालजमुपरताही तुंब बजाये ॥1॥**
**आल्ला एक तुं नवी एक तुं ॥ ध्रु॥ (शा.अ.गाथा**



**अ.क्र. 440)**

गाथ्यातील हे अभंग वाचले आणि त्यांच्या अर्थाचे सखोल चिंतन केले असता बऱ्याच महत्वपूर्ण बाबी लोकाभिमुख होतांना दिसतात. संत तुकोबांचे अभंग हे एका विशिष्ट धर्मातील लोकांनाच उपदेश करणारे नसून 'ईश्वर आणि अल्लाह' हे त्यांच्या लेखी एकच आहेत; म्हणजेच त्याकाळात तूकोबांनी सर्वच धर्मातील लोकांना उपदेशीत केले असून संपूर्ण मानवजातीचे उत्थान हाच एकमेव त्यांचा उद्देश होता हे लक्षात येते.

तुकाराम नीती अंतर्गत निवडलेले तुकोबांचे अभंग म्हणजे आपल्या भोवतालच्या माणसांना सतत सावध करणारे उत्तम रसायन असून या अभंगांच्या माध्यमातून वर्तमानात लोकजागृती होणे हाच प्रांजळ उद्देश समोर आहे याचा पुन्हा पुन्हा उल्लेख करणे गरजेचे आहे. संबाल म्हणजे सावधानता हा त्यांच्या अभंगांचा मुख्य हेतू असून या माध्यमातून तुकोबांचे हिंदी अभंग लोकांमध्ये प्रसारित होत आहेत याचा मनस्वी आनंद होतो आहे. या बदलत्या खडतर काळात प्रस्तुत अभंगातून तुकाराम महाराज आपल्या सर्वांना प्रेम हेच सर्वात महत्वाचे साधन असून याच माध्यमातून आपल्याला संपूर्ण विश्व आपल्या कक्षेत घेता येते. म्हणूनच अनेक कवी आणि लेखकांनी प्रेमाला अनन्यसाधारण महत्व दिले असून त्याद्वारेच आपण इथे सर्वधर्म समभाव आणि वसुधैव कुटुंबकम ही संकल्पना अमलात आणू शकतो. तसेच माणसांनी अनावश्यक चिंता म्हणजे 'जिकीर' करणे सोडून द्यावे, कारण व्यर्थ चिंता केल्याने अनेक दुर्धर रोगांना माणूस आज बळी पडतांना दिसतो आहे. तेंव्हा, आजघडीला आपण सर्वांनी वर्तमानात आनंदी राहून दैनंदिन जीवन व्यतीत करावे. असे केल्यास इथला प्रत्येक माणूस सुखी-समाधानी होऊन त्याचा जीवनप्रवास सुखकर होईल यात तिळमात्र शंका नाही. तुकोबांना आणि तमाम संतांना इथल्या सर्वसामान्य माणसाचे उत्थान हा महत्वपूर्ण विषय असून त्या माध्यमातून जनप्रबोधन आणि सामान्य माणसांचे विवेकी जागरण होत राहील. तेंव्हा चला, तुकोबांच्या या हिंदी रचना व्यवस्थितपणे वाचून, आपल्या जीवनाला योग्य मार्ग दाखविण्याचे काम स्वतः करून आपण सर्वजण मिळून आनंदी राहुयात ! असे झाल्यास खऱ्या अर्थाने संत तुकोबांच्या अभंगांचे आणि तुकाराम नीती या सदराचे सार्थक झाल्याशिवाय राहणार नाही ! धन्यवाद ! जय तुकोबाराय !

**(टीपः लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**



लय भारी
**सुगरण**

सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

# कुळथाचे किंवा हुलग्याचे माडगं

आधुनिक केसरी

आठ दहा दिवसांपूर्वी मी कुळथाचं /हुलग्याचे कळण /कढण पोस्ट केले होते... त्यावर सगळ्यांनी खूप भरभरून प्रतिसाद दिला पण बऱ्याच जणांनी माडगं ह्याची रेसिपी टाका ! माडगं कसं करतात? प्लीज माडगं रेसिपी टाका !, मला माहित आहे पण तुमची पद्धत कशी आहे? असे अनेक प्रश्न बऱ्याच जणांनी विचारले?

मी पण लागले कामाला... युनळी, गुगल तात्यांचा खजिना यावर खुप शोधाशोध केली... खुप रेसिपी बघितल्या वाचल्या... किंचित बदल करून माडगं करून बघितले. सगळ्यांना खूप आवडले. आता रेसिपी शेअर करते... पौष्टिक, पटकन होणारं माडगं !! तेल तुप अगदी नाही त्यामुळे डायटफ्रिक लोकांसाठी मस्त रेसिपी... ही पारंपारिक महाराष्ट्रीयन रेसिपी आहे या रेसिपीमध्ये अनेक औषधी गुणधर्म देखील आहेत माडगं खोकल्या, सर्दी अंगदुखी, तापासाठी खूप उपयुक्त आहे पण कुळीथ किंवा हुलगा उष्ण त्यामुळे जरा जपूनच खावं असा पदार्थ... माडगं दोन पद्धतीने करतात. तांदूळ शेवया गुळ सुंठ यांचा वापर करून... किंवा लसूण अगदी कमी प्रमाणात तिखट घालून असं पण करतात. कुळीथास हुलगे असेही म्हणतात. याचे इंग्लिश नाव आहे हॉर्स ग्रॅम (HORSE GRAM) कुळीथ चवीला गोड तुरट असून उष्ण असतात व पचायला हलके असतात. माडगं मातीच्या भांड्यात करतात. त्यासाठी लागणारे साहित्य आणि कृती लिहून घ्या...

करून बघा आणि नक्की कळवा. मी तिखट घालून सूप सारखं केलं तुम्ही कोणत्या पद्धतीने करायचं ते बघा मी दोन्ही रेसिपी शेअर करते.

**"माडगं"**

**साहित्य :-** हुलगे कुळीथ पीठ माणशी एक चमचा, दोन चमचे धुतलेले तांदूळ, चवीनुसार आलं किसून, चवीनुसार मीठ, तीखट, एक छोटा चमचा जिरे, कोथिंबीर, लसूण, एक चमचा तीळ, पाणी इत्यादी.

**कृती :-** कुळीथ किंवा हुलगे खमंग भाजून त्याचं पीठ करून घ्या. गिरणीतून आणा किंवा घरी मिक्सरवर काढलं




तरी चालेल. आता किती जणांना माडगं करायचं त्यावर पीठ प्रत्येकी एक चमचा असं प्रमाण घ्या. दाटसर पाण्यात कालवा पेस्ट झाली पाहिजे. आता जाड बुडाच्या पातेल्यात जेवढे चमचे पीठ घेतलं तेवढे ग्लास भरून पाणी घ्या आणि उकळत ठेवा. आता त्यात लसूण ठेचून घाला आपल्या चवीनुसार मीठ, तिखट, जिरे, बारीक चिरलेली कोथिंबीर, तीळ घाला. पाणी गरम झालं की त्यात कालवलेली पिठाची पेस्ट, भिजवलेले तांदूळ घाला. पाणी जास्त उकळलं तर पिठाच्या गाठी होतील म्हणून पाणी थोडं गरम झालं की बनवलेली पेस्ट टाका. थोडा वेळ ढवळा आता त्यातले तांदूळ शिजेपर्यंत मंद आचेवर शिजू द्या. गरमागरम पौष्टिक माडगं तयार.!!

**दुसरी पद्धत :-** तयार भाजलेल्या पिठाची पेस्ट वरील प्रमाणेच भिजवून घ्या वर सांगितलेल्या प्रमाणानुसार पाणी उकळत ठेवा त्यात दोन चमचे शेवया, छोटा चमचा बडीशेप, पाव चमचा सुंठपूड, चवीनुसार गूळ, किंचित मीठ, कालवलेली पिठाची पेस्ट घाला. त्यातील शेवया शिजल्या की माडगं तयार!! तुमच्या आवडीनुसार त्यावर ड्रायफ्रूट बारीक करून भुरभूरू शकता. आपल्या आवडीनुसार कोणतीही पद्धत वापरून माडगं नक्की करून बघा आणि कळवा.

# रसिकांना भरभरून देणारे गायक : मोहम्मद रफी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**मोहम्मद रफी या गायकाचा जन्म अमृतसर (पंजाब) जवळील कोटला सुलतानसिंह या छोट्याशा गावी 24 डिसेंबर 1924 रोजी झाला. वडील नाभिक काम करत. त्यांच्या घराण्यात गायकीचा कुठलाच इतिहास नव्हता,पण मोहम्मद रफी यांना लहानपणापासूनच गाण्याची आवड होती. गावात येणाऱ्या फकिराची गाणीही ते गात. संगीत दिग्दर्शक श्यामसुंदर यांनी त्यांना पहिल्यांदा गाण्याची संधी दिली. याला कारण घडलंही तसंच होतं.**

एकदा प्रसिद्ध गायक अर्थात हे गायक नंतरच्या पिढीतल्या बहुतांश गायकांचे गुरू ठरले, ते के.एल. सैगल यांचा गायनाचा कार्यक्रम रफी यांच्या गावाजवळच्या गावात ठरला होता. गायनाचे वेड लागलेल्या रफी यांनी त्यांचा भाऊ हमीदसह तिथे पोहचले. पण वीज गेल्यानं सैगल गाऊ शकले नाहीत. पण हमीदने वीज येईपर्यंत मोहम्मदला गायनाची संधी द्यावी, अशी विनंती आयोजकांकडे केली. मोहम्मद रफी यांनी माईकशिवाय आपल्या खणखणीत आवाजात गाणी म्हटली. प्रेक्षक खूश झाले. इथे श्यामसुंदरही उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या गाण्याची प्रशंसा केली. आणि पुढे गायनाची संधीही दिली.



1944 साली पहिल्यांदा रफी यांनी 'गुलबलोच' या पंजाबी चित्रपटात गाणे गायले.याच वर्षी 'गाव की गोरी' या हिंदी चित्रपटासाठी गाण्याची संधी मिळाली. 'अनमोल घडी' (1946) या चित्रपटापासून रफी यांना खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळाली. यानंतर त्यांना मागे वळून पाहवंच लागलं नाही.

शम्मी कपूरचा धसमुसलेपणा, देव आनंदच खोडकरपणा, दिलीप कुमार यांचा रोमॅंटिक अंदाज, धर्मेंद्रचा रांगडेपणा, राजेंद्र कुमारचा लव्हरबॉय आणि भारतभूषण यांचा साधेपणा त्यांच्या आवाजात उतरायचा. त्यामुळे या सगळ्या नायकांना रफीचा आवाज आपलाच आवाज आहे, असे वाटायचे. गाण्यांची निवड करताना मोहम्मद रफी गाण्याचा नायक कोण आहे, हे आवर्जून विचारायचे.

'बाबूल की दुवाएं लेती जा' (नीलकमल) या 1968 मध्ये आलेल्या गाण्याने यशोशिखर गाठले. आजही हे गाणे लग्न समारंभात (प्रत्यक्षात किंवा सिनेमा-मालिकांमध्ये) वाजवले जाते. विशेष म्हणजे या गाण्याच्या रेकॉर्डिंग नंतर दोन दिवसांतच त्यांच्या मुलीचा 'निकाह' होता आणि त्यांची ही कन्या लाडकी होती. मुलीच्या लग्नात त्यांच्या भावनांचा बंध फुटला नसला तरी या गाण्यात मात्र तो प्रकर्षाने जाणवतो. यावेळी त्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. मोहम्मद रफी म्हणजे देवमाणूस होता, हे अनेकांनी अनुभवलं आहे. एके ठिकाणी त्यांच्याबाबत चित्रपट-लेखक इसाक मुजावर यांनी लिहिलं आहे- एकदा एक भिकारी रस्त्याकडे बसून गात होता. पण जाणाऱ्या-येणाऱयांचे त्याच्याकडे लक्षच जात नव्हते. खरे तर तो भिकारी खूप जीव तोडून गात होता. शेवटी मोहम्मद रफी त्याच्या बाजूला बसले आणि गाऊ लागले. मग काय! त्यावेळी तब्बल 400 रुपये गोळा झाले. लोकांनीही या माणसाला ओळखलं (पडद्यामागचा कलाकार असल्यानं) नाही. जाताना रफी यांनी आपली शालदेखील पांघरली.

मोहम्मद रफी यांनी जवळपास सर्वच संगीतकारांकडे गाणी गायली. मात्र नौशाद यांचा रफीवर अधिक लोभ होता. अर्थात सगळ्यांनाच मोहम्मद रफी यांच्याविषयी स्नेह होता. म्हणूनच रफी यांनी चतुरस्त्र गाणी गाऊ शकले. शम्मी कपूर यांच्यासाठी 'चाहे कोई मुझे जंगली कहे...' आणि भारत भूषण यांच्यासाठी 'मन तरपत हरी दर्शन को' गाणारे रफी वेगवेगळे आहेत का, असा प्रश्न पडतो. रफी यांनी मराठी चित्रपटातदेखील काही गाणी गायली आहेत. 'शोधिसी मानवा', 'अरे हे दुःखी जिवा बेकरार होऊ नको', 'हा छंद जिवाला लावी पिसे', ' प्रकाशातील तारे तुम्ही अंधारावर रुसा', 'हा रुसवा सोड सखे, अगं पोरी संभाल दर्याला तुफान आयलंय भारी', 'प्रभू तू दयाळू' ही त्यांची गणीदेखील लोकप्रिय आहेत. अशा या कनवाळू, लोकप्रिय गायकाचं निधन 31 जुलै1980 रोजी झाले. पण त्यांनी असंख्य अजरामर गाणी मागे ठेवून गेले.

# समानता, मानवता, पुरोगामी विचार मांडणारे संत चोखोबा



प्रा.रमेश वाघमारे
संपर्क क्र. ९४२३१३३२५९

आधुनिक केसरी

**'महाराष्ट्र' ही संताची भूमी आहे. वारकरी संप्रदायात तर संताची मांदीयाली आहे त्यातील संत चोखामेळा हे एक आहेत. संत चोखामेळा यांचा जन्म विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात देऊळगाव राजा तालुक्यातील मेहुणा किवा मेहुणपुरी या गावी झाला. चोखोबांचा जन्म पंढरपूरला झाल्याचे संत महिपती म्हणतात. चोखोबा मुल वऱ्हाडातील आहेत असेही म्हटले जाते. त्यांची पत्नी सोयरा, बहिण निर्मळा, मेहुणा बंका व मुलगा कर्ममेळा हे सर्व प्रपंचाचे कबाडकष्ट उपसत असतानाच नित्यनेमाने व भक्तिभावाने पांडुरंगाचे नामस्मरण व गुणसंकीर्तन करीत होते. संत चोखामेळांचे कुटुंब हे जातीने महार होते.**

चोखामेळा जन्माला आले तो समाज भक्तीसंप्रदायापासून अतिशय दूर होता. पशुगत जीवन या लोकांच्या वाट्याला आले होते. संत चोखोबा हे तत्कालीन सामाजिक विषमतेमुळे होरपळून निघाले. ते शुद्र-अतिशूद्र, समाज जीवन, भौतिक व्यवहार, उच्चनीचता व वर्णव्यवस्था यांच्य विळख्यात अडकले. संत चोखामेळा हे प्रापंचिक गृहस्थ होते ते उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करत, पण ते विठ्ठलाच्या नामात सतत दंग असत. गावगाड्यातील शिवाशिवि अस्पृश्यतेच्या वातावरणात त्यांचा श्वास कोंडला जात होता. दैन्य, दारिद्र्य, वैफल्य यांमुळे ते लौकिक जीवनात अस्वस्थ होते. परंतु प्रत्यक्ष परमेश्वराने त्यांना जवळ केले, त्यांना संतसंग लाभला. त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. त्यांना विठठलाचे सावळे, गोजिरे रूप महाद्वारातून पाहावे लागे, ही वेदना खंत त्यांच्या मनात होती. विठ्ठलाच्या दर्शनाने आपला शिणभाग नाहीसा होऊन त्यातून वेगळेच समाधान लाभेल या ओढीने चोखोबा चंद्रभागेच्या वाळवंटाकडे ओढले गेले. आपल्या रुक्ष जीवनाला हरीभक्तिचा विठठलाचा जिव्हाळा निर्माण झाल्याने त्यांना आपल्या प्रपंचाचे ओझे सुसह्य वाटू लागले. याच ओढीने चोखोबा पंढरपूरला राहू लागले.

तत्कालीन समाजाकडून मिळालेल्या हीन वागणुकी पश्चात



देखील चोखोबा स्वच्छ आणि निर्मळ होते. त्यांच्या अभंगांचे अवलोकन केल्यास लक्षात येत की त्यांची वाणी, शब्दरचना, विवेचन अत्यंत चोख आणि सुस्पष्ट आहे. त्यांनी वारकरी संप्रदायातील अध्यात्मनिष्ठ, अभेद भक्तीचे लोण आपल्या उपेक्ष बांधवांपर्यंत नेऊन पोहोचवले. आत्मविकासाची संधी तत्कालीन समाजरचनेतील अगदी तळागाळातील लोकांनाही मिळावी असे सर्वच संताना वाटत होते. त्याच वेळी संत चोखोबानी भक्तिमार्गाचा संदेश आपल्या अभंगांतून समाजबांधवांना दिला.

**'आमुची केली हीन जाती तुज कां न कळें श्रीपती जन्म गेला उष्टे खाता | लाज न ये तुमचे चित्ता 'ऊस डोंगा परि । रस नोहे डोंगा काय भुललासी वरलीया रंगा || चोखा डोंगा परि | भाव नोहे डोंगा || ' 'विठ्ठल विठ्ठल गजरी | अवघी दुमदुमली पंढरी ।'**

असे त्याचे अनेक अभंग मराठीजन मनात आज आहेत. तसेच वैचारिक विद्रोह संत चोखामेळांनी आपल्या अभंगामध्ये केला. मानवजीवनात जन्मापेक्षा कर्म श्रेष्ठ हा पुरोगामी विचार तेराव्या शतकामध्ये संत चोखोबांनी मांडला. त्यांचे अभंग म्हणजे संस्कार भक्तिप्रवण मनाचे हुंकार आहे. इतर संतांप्रमाणेच चोखोबा यांचे अभंग आत्मनिष्ठ आहेत. त्यांच्या प्रत्येक शब्दात ईश्वरदर्शनाची तळमळ स्पष्ट दिसून येते. ईश्वरदर्शनाच्या तळमळीसोबतच सामाजिक उपेक्षेतून निर्माण झालेल्या वेदना गच्च आहे. समाजाने केलेल्या आपल्या उपेक्षेमुळे आणि अपमान अवहेलनेमुळे होणारे दुःख, अभंगात व्यक्त होते शूद्र, अस्पृश्य म्हणून ज्यांची अवहेलना झाली अशा या काळातील असंख्य उपेक्षितांचे सामाजिक दुःख चोखोबांच्या अभंगात प्रातिनिधीकपणे येताना दिसते आहे.

शुद्रजातीत जन्मल्यामुळे समाजाने आपल्याला उपेक्षित ठेवावे, त्रास द्यावा हे चंद्रभागेच्या वाळवंटातील आध्यात्मिक लोकशाहीच्या वातावरणात वावरणाऱ्या संत चोखोबाना दःरव दायी वेदनाकारक वाटू लागले, अपमानास्पद वाटू लागले. ही माणसाच्या कर्माला महत्व न देता तो कोणत्या जातीत जन्मला आला यालाच फार महत्व देते. वरवच्या रंगाला भूलणाऱ्या प्रवृती वर शब्दांचे फटकारे असूड ओढते. समाजाकडून होणारा अन्याय थांबवण्यासाठी शब्द पुढे येण्याचा प्रयत्न करतात आणि आपल्या अभंगातून नवा चिर काळ टिकणारा विचार ठेवतात. आजही जातीभेद शिवाशिवपूर्ण गेली नाही. भाषण व पुस्तकातून गेली. शहर - खेड्यापाड्यातून ती अनेक वेळा डोकावते. तेराव्या शतकात मानवता समानता विचार शब्दांत मांडणारे संत चोखोबा आपल्या लक्षात राहतात.

# समजदार मैत्री



मनिषा चौधरी
नाशिक

आधुनिक केसरी

**वयाचा एक एक टप्पा पार करत एक एक जवाबदारी पेलत चाळिशी येऊन ठेपते तेव्हा, अनेकजणी आयुष्यात बऱ्यापैकी स्तिरावलेल्या असतात, तर काहींचा संघर्ष अजूनही सुरूच असतो. स्री ही कमावती असो की गृहिणी, शरीराच्या सुरू झालेल्या कुरबुरी सांभाळत वयाच्या या नव्या टप्प्यात प्रवेश करतात तेव्हा कुठेतरी हरवलेल्या वाटतात.**



चाळिशी पन्नाशी म्हणजे वयाची सेकंड इनिग सुरू झालेली असते, यात काहींना एकटेपणा आवडतो तर काहींना नव्या उमेदीने पुन्हा भरभरून दिलखुलास जगायचे असते. आपल्या आवडी जोपासणे, अपूर्ण. राहिलेल्या इच्छा पूर्ण करणे याकडे काहींचा कल असतो. सांड की आंख या हिंदी फिल्ममाधील नायिकेचा एक संवाद आठवतो, पत्रकार नायिकेला वय विचारल्यानंतर स्री ही कुठल्याही वयात आपले वय लपावाते असे म्हणून तिला हसतो, तेव्हा नायिकेचे उत्तर खूप सुंदर आणि अथपूर्न आहे, ती म्हणते, प्रश्न वय लपविण्याचा नाही तर आजवर मी जगलेल्या आयुष्यातील किती वर्ष स्वतःसाठी जगले हा आहे!”

खरंय ना! सगळ्या जवाबदारी पार पाडत स्वतःसाठी जगायचे राहून गेलेले ते या सेकंड ईनिग मधून पूर्ण करू पाहत असते आजची स्री. पर्यटन करणे, मैत्रिणी मध्ये मिसळणे, आपले छंद जोपासणे, अशा अनेक गोष्टी करण्याकडे कल असतो तिचा, विवध व सहज हतळण्याजोग्या समजमध्यामांच्या मदतीने शालेय मित्र मैत्रिणी शोधणे, ग्रुप जमवणे व 20-30 वर्षानंतर पुन्हा सगळ्यांनी एकत्र येऊन तेच बालपण पुन्हा अनुभवायचा प्रयत्न करणे, किती छान वाटते ना हे सगळे! कुणी आपल्याच जुन्या शाळेत भेटते तर कुणी बाहेर बागेत भेटतात. निमित्त काहीही असो परंतु आनंद देण्या घेण्याचा हा सोहळा, याची देही याची डोळा अनुभवून तृप्त झाल्यासारखे वाटते. हेतू हाच की स्वतः ला आनंदी करणे, एक स्पेस निर्माण करणे.

सुधा व तिच्या वर्ग मैत्रिणी ही अशाच तब्बल २० वर्षानंतर एकमेकींना भेटल्या, सर्वांचा उत्साह ओसंडून वाहत होता. किती बोलू आणि किती नको असे झाले होते प्रत्येकीला. पुढे मग WHAT'S APP FACE BOOK GROUP, CHATTING, CONFERENCE CALL, माध्यम अपुरी पडायला लागली अक्षरशः त्यांच्या उत्साहाला, जणू वासंतातील नवा बहर आला होता जुन्याच मैत्रीला. पण कालांतराने मैत्रीला आलेले हे उधाण ओसरू लागल्याचे सुधाला जाणवू लागले, कुठेतरी ओहोटी आल्यासारखी वाटली.

खूप वर्षानंतर भेटलेल्या मैत्री मध्ये छोट्या छोट्या कारणांनी गैरसमज पसरू लागले, पुढे थोडे वाद, मग अबोला. मग वाटले कसला आनंद मिळवला यात? या विचाराने सुधाला नैराश्य ग्रासु लागलें, तिने स्वतःला यातून बाहेर काढले व पुन्हा सर्व मैत्रिणी पासून दूर झाली, बोलणे संपले, ओढ संपली, का झाले असे?

या सेकंड इनिंगमधील शारीरिक बदलामुळे प्रत्येकीची थोडी चिडचिड वाढलेली असते, तेव्हा कोणत्याही लहान सहान गोष्टी फार मनावर न घेता फक्त आनंद देण्या आणि घेण्यासाठी मैत्री जपावी असे मला वाटते. थोडे हसावे, थोडे रडावे, पण दिलखुलास जगावे. तू – तू, मै – मै च्या जखडात का गुंतवावे आपण स्वतः ला? थोडे माफ करावे, थोडी माफी मागावी. बायकांची मैत्री हा निव्वळ टिंगल किंवा टीकेचं विषय असणाऱ्या पुरुषी मानसिकतेला का पुरवावे आपण हास्याचे खाद्य? एखाद्या स्री वर अन्याय झालाच तर आपण सगळ्या एक होऊन तिच्या बाजूने उभ्या राहतोच ना! मग इतर वेळी का आपण संकुचित वृत्ती ठेवावी?

यासाठी हवा सकारात्मक विचार, जो आपल्याला कुठल्याही प्रसंगी खंबीर राहायला शिकवेल. मैत्रिणींचे भेटणे हे केवळ भेटणे न ठरता ती एक सकारात्मक ऊर्जा पुरविणारी पर्वणी असावी. एकमेकींच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देणारी ठरावी भेट व मिळाव्या. हक्काच्या टाळ्या आणि कौतुकाची थाप. FRIENDSHIP IS OXIGEN OF LIFE असे म्हटले जाते, तेव्हा ऊर्जा रुपी ऑक्सीजनचा सिलेंडर गच्च भरून घरी परतावे, जी ऊर्जा तुम्हाला पुडच्या भेटी पर्यंत नक्कीच जगण्यातला उत्साह देत राहील. मैत्री ही फक्त मैत्री नसून ती समजदार मैत्री हवी या सेकंड ईनिंगमध्ये.

# राजकीय पुढाऱ्यांनो कोणतेही वक्तव्य करताना जिभेवर ताबा ठेवा



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**लोकप्रतिनिधींनी कोणतेही भाष्य करतांना प्रत्येकवेळी शंभरवेळा विचार करून भाष्य करावे. कारण एक चुकीचा शब्द लाखो लोकांचे मन दुखावु शकतात. तेच काम खासदार अधीररंजन चौधरी यांनी केले. यामुळे देशाच्या 135 कोटी जनतेच्या भावना दुखावल्याचे दिसून येते. जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात चांगल्या, सोज्वळ व निर्मळ प्रकारच्या लाखो शब्दांचा भंडार आहे तरीही सांसद चौधरी यांची राष्ट्रपती यांच्या बाबतीत बोलतांना कशी काय जीभ घसरली असावी याचे मला आश्चर्य वाटते. त्यांच्या वक्तव्यावरून असे वाटते की "उचल्ली जीभ लावली टाळ्याला". असे अनावधानाने बोलन लोकप्रतिनिधीला शोभा न देणारं आहे.**

भारताच्या इतिहासातील राष्ट्रपती पद हे सर्वोच्च पद आहे. भारताच्या तिन्ही सेनादलाचे नेतृत्व राष्ट्रपतींकडे असते. त्यामुळे या पदाची राजकीय दृष्ट्या अवहेलना होने म्हणजे मुर्खपणाच म्हणावा लागेल. कारण लोकसभा असो वा राज्यसभा यातील संपूर्ण सांसद (खासदार) हे 135 कोटी जनतेचे प्रतिनिधित्व करीत असतात. त्यामुळेच त्यांना लोकप्रतिनिधी सन्मान प्राप्त झालेला आहे. अधीररंजन चौधरी हे वरिष्ठ सांसद आहेत. अशा व्यक्तीने महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूजी यांचा "राष्ट्रपत्नी" असा अपमानास्पद शब्द वापरून राष्ट्रपतींचाच नाही तर संपूर्ण देशाचा अपमान झाल्याचे मी समजतो. भारतात अनेक उच्च पद आहेत यात प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, तिन्ही सेना प्रमुख इत्यादी अनेक या संपूर्ण पदांच्या तुलनेत राष्ट्रपती पद हे देशाच्या उंच शिखरावरील असुन एक "मानाचा तुर्रा" आहे. त्याचबरोबर राष्ट्रपती पदाला देशाचा प्रथम नागरिक म्हणून संबोधले जाते. म्हणजेच 135 कोटी जनतेसाठी सर्वेसर्वा या नात्याची भुमिका राष्ट्रपतींची असते.

भारतात बहुमोलाचे, सर्वोच्च व मानसन्मानाचे पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते अनेक क्षेत्रांतील नामांकित, कर्तबगार, शुरविरांना, शहिदांच्या नातेवाईकांना अशा अनेक मान्यवरांना प्रदान करण्यात येतात व त्याचा गौरव संपूर्ण भारतात मोठ्या ऐटीने करण्यात येतो. त्यामुळे आपण समजू शकतो की भारताचा राष्ट्रपती जेव्हा आपले पद ग्रहण करतो तेव्हा तो कोणत्याही जातीचा, धर्माचा, पंथाचा, राजकीय पक्षांचा व्यक्ती रहात नाही तर तो संपूर्ण देशाचा निर्मळ आणि स्वच्छ मनाचा देशाचा महान व्यक्ती असतो. म्हणुनच राष्ट्रपतींच्या समोर महामहीम असा शब्द वापरण्यात येतो. त्यामुळे महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूजी यांची तुलना "राष्ट्रपत्नी" असा करून सांसद अधीररंजन चौधरी यांनी राष्ट्रपतींचाच नाही तर देशाचा व संसदेचा मोठा अपमान केला आहे. चौधरी यांचे वक्तव्य अत्यंत निंदनीय व घृणास्पद आहे. आक्षेपाचे वाढते प्रकरण पहाता शुक्रवारला राष्ट्रपतींना एक पत्र लिहून माफी मागितली आहे. पत्रामध्ये लिहिले आहे की, माझ्याकडुन अनावधानाने तुमच्या विषयी चुकीचा शब्द उच्चारला गेला. याबद्दल मी तुमची माफी मागत आहे. त्या माफीचा तुम्ही स्वीकार करावा, अशी विनंती अधीररंजन चौधरी यांनी राष्ट्रपतींना पत्राद्वारे केली आहे. अधीररंजन चौधरी यांनी राष्ट्रपतींना माफी मागितली हे ठीकच झाले. परंतु जनतेला सुध्दा जाहीर माफी मागायला हवी. यानंतर कोणत्याही राजकीय पक्षाचा पुढारी असो अशा उच्च पदस्थ व्यक्ती बद्दल अपशब्द कोणी बोलला तर त्यावर कठोर कारवाईचे प्रावधान असावे असे मला वाटते.



# खेळा पत्ते, खेळा जुगार गुरुजींना अटक केले : तरीही नोकरी राहते अबाधित मिळतो पगार

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**बीड : (भाग : २)** जुगार खेळणाऱ्या त्या शिक्षकांना पोलिसांनी अटक करताच त्याच्या बातम्या स्थानिक पातळीवरच्या दैनिकांना आल्यामुळे साहजिकच शिक्षण विभागासह संपूर्ण जि.प.ची बदनामी झाल्याने शासन निर्णयानुसार प्रतिमा मलिन करणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याला निलंबित केले जाते. कारण त्याने आपले कर्तव्य पार पाडत असताना शिस्तीचे पालन केलेले नसते. जुगारी व व्यसनी शिक्षकांना कायद्याच्या तरतुदीनुसार सीईओ अजित पवार यांनी निलंबित केले. त्या विरोधात हे तिन्ही शिक्षक अपर आयुक्तांकडे अपिलात गेले. परंतु शिस्तीचे व नियमाचे पालन करणाऱ्या अप्पर आयुक्तांनी यांचे अपील फेटाळून लावत सीईओ यांनी केलेली कारवाईच योग्य आहे असे आदेशात नमूद करत तोच निर्णय कायम ठेवला. त्यामुळे या महाशय त्रिमूर्तींचे चांगले धाबे दणाणले. परंतु जि.प. मधील काही झारीतल्या शुक्राचार्यांनी सदरील शिक्षकांना तुमच्या मागे लागलेले शुक्लकाष्ठ कसे दूर करायचे हे आम्हां चौकडीला चांगलेच ठाऊक आहे. परंतु यासाठी ब-यापैकी घाऊक दाम (पैसा) मोजावे लागणार......! तुमची तयारी असेल तर तुम्हांला केवळ 30 दिवसाच्या आत पुन्हा नौकरीत रुजू करण्याची जिम्मेदारी आम्हां चांडाळ-चौकडीची असा शब्द देताच बिथररलेले हे महाशय क्षणार्धात हो म्हणाले आणि मग पुढील खेळ सुरू झाला.......!!

**आहो आर्सुळ आप्पा अशा जुगारी-व्यसनी शिक्षकांसाठी एवढा आटापिटा करण्याऐवजी चांगल्या शिक्षकांसाठी कष्ट घेतले असते तर आशीर्वाद तरी मिळाले असते....!**



दुर्दैव हेच की कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्याने संबंधित शिक्षकांना शिक्षा दिली असतानाही जि.प.मधील कक्षाधिकारी पी.बी.आर्सुळ आप्पा यांनी या शिक्षकांना पुर्ववत करण्यासाठी अथ्थक परिश्रम घेतल्याची माहिती सूत्रांकडून कळते. या शिक्षकांना आरसुळआप्पा यांनीच मंत्रालयात अपील करण्याचे सुचविल्याचेही सूत्रांकडून कळाले. मग या आप्पांनी त्यांची नेहमीची अशी आपली यंत्रणा कामाला लावून प्रत्यक्ष मंत्रालयात उपस्थित न राहता किंवा व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे या सर्वांची सुनावणी बीड ईथूनच घेतली. आप्पांनी ही व्ही.सी. कार्यालयात बसून घेतली की, ती ही घरी वा अन्य ठिकाणी बसून घेतली हे ही एक गुपित गौडबंगाल अद्यापही गुलदस्त्यातच आहे.......!!

जुगारी शिक्षकांसाठी मंत्रालय पातळीवरील अप्पर सचिव विजय चांदेकर सह राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी एवढ्या पायघड्या घालून ऐका किळसवाण्या प्रकरणाला अगदी साफसुतरे करत पुर्ववत करण्याची ही बीड जिल्ह्याच्या ईतिहासातील पहिलीच घटना दिसून येते. कोणत्याही कर्मचाऱ्याला निलंबित केल्यानंतर नंतर त्याला त्याच्या मूळ जागी नेमणूक देता येत नाही व त्याच्या निलंबित काळातील कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणूनही धरला जात नाही. मग या जुगारी शिक्षकांचा कालावधी कोणत्या शासन निर्णयानुसार ग्राह्य धरला गेला आणि वरतून त्याच शाळेवर जाणीवपूर्वक नेमणूक दिली जाते हे जनतेला कळणे गरजेचे आहे. यावरून हे सर्वच प्रकरण अत्यंत संशयास्पद वाटते आहे. ज्या पोलीस यंत्रणेने याचा तपास केला. मग तो काय चुकीचा होता का.....?? पोलीस यंत्रणेतील एकालाही विषय मांडण्यासाठी वा सुनावणीसाठी का बोलावले गेले नाही.....??? सदरील सुनावणीच्या वेळी जि.प. च्या कक्षाधिकाऱ्यांनी किंवा सुनावणीसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांनी आपली बाजू भक्कमपणे का मांडली नाही......???? मांडली तर काय मांडली हे सर्वांसमोर येणे गरजेचे आहे. त्यामुळे आम्ही सदरील सुनावणी ईईतिवृत्ताचा पाठपुरावा तर करणारच आहोत. जि.प.ने नाही सांगितले तरी मंत्रालय पातळीवरून माहिती घेऊन लवकरच प्रकरणाचा पडदा फाश करण्यात येणार आहे हे मात्र नक्कीच......!

अप्पर सचिव विजय चांदेकरांनी राज्यमंत्री अब्दुल सत्तारांसह स्वतःची या प्रकरणात चांदी केल्याचा संशय बळावतो...!






विजय चांदेकरांनी मात्र या प्रकरणात आपली चांदी केली असल्याचा दिलेल्या निर्णयावरून दाट संशय येत असल्याने या प्रकरणाकडे पुन्हा नव्याने लक्ष घालण्याची वेळ आली आहे. कारण बीड जि.प.चे सध्याचे सीईओ अजित पवार आणि पोलीस खात्यातील दबंग अधिकारी (सिंघम) पंकज कुमावत या दोघांचे एकंदरीत आजपर्यंतचे काम पाहता कुणी गाढ झोपेतून उठूनही या दोघांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करू शकत नाही. त्यांच्या विषयी ना संशय घेऊ शकतो, ना आरोप करू शकतो. हे अप्पर आयुक्तांनाही चांगलेच माहीत असल्याने आणि प्रकरणाची गंभीरता पाहून त्यांनीही शासन नियमावलीस अधीन राहून सीईओ पवार साहेबांनी घेतलेला निर्णय कायम ठेवला-केला होता. परंतु काही निरडावलेल्या बांडगुळांना कायम. . . . . खाऊन. . . . . . खालची माती खाण्याची सवय असल्याने त्यांनी सारेकाही जुळवून आणत बांध्यापासून चांद्यापर्यंत देवाण-घेवाण करत विजय खेचून आणला आणि मग या विजयात अप्पर सचिव विजय चांदेकर पासून राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्या आणि यांच्या या पाठीराखे प्रकरणात सहभागी असणाऱ्या कक्षाधिकारी आरसुळ आप्पा व त्यांच्यासह केवळ सीईओ अजित पवार सोडता आख्ख्या जि.प.चे गैरमार्गी विशेष सल्लागार जयलाल हिरालाल राजपूत यांची कशी-कशी, काय-काय भूमिका आहे ती

**क्रमशः भाग-3 मंगळवारी वाचा..........!!!!!.**

# डाभा येथील उपआरोग्य केंद्र सुरु

## डॉ.विलास राजपुत व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतली आधुनिक केसरीच्या बातमीची दखल

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** काही दिवसांपासुन डाभा उप आरोग्य केंद्र बंद अवस्थेमधे पडलेले होते. आधुनिक केसरी ने बातमी प्रसारीत करताच प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. विलास राजपुत यांनी डाभा येथील उपआरोग्य केंद्र सुरु करुन लसीकरण करत रुग्णांचा उपचार सुरु केलेला आहे. यामुळे गावकऱ्यांच्या समस्या दुर होऊन आधुनिक केसरीचे आभार गावकऱ्यांनी व्यक्त केले.

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा प्राथमिक आरोग्य केंद्र असून सावळदबारा आरोग्य हे 18 गावांचे आरोग्य केंद्र आहे. त्यात डाभा गावचे उपआरोग्य केंद्र आहे. येथील ग्रामस्थांची अनेक दिवसांपासुन समस्या वाढलेली होती मात्र आधुनिक केसरीने या संदर्भामध्ये बातमी प्रसारीत करताच वरिष्ठ अधीकारी आणि सावळदबारा आरोग्य केंद्राचे डॉ. विलास राजपुत यांनी त्वरीत दखल घेत डाभा येथील उप आरोग्य बरेच दिवसांपासुन बंद अवस्थेमधे पडलेले होते ते आता मात्र पुन्हा सुरु केलेले असुन परिसरातील साफसफाईच्या कामाला लागुन आता डाभा येथील आजारी ग्रामस्थांचा उपचार सुरु केलेला आहे. गावकऱ्यांना उपचार मिळत आहे त्यामुळे गावकऱ्यांमध्ये मोठा आनंद दिसून आला आणि त्यांची समस्या अडचणी दुर होऊन न्याय मिळाला असल्याचे गावकऱ्यांनी सांगुन आधुनिक केसरीचे आभार व्यक्त करुन धन्यवाद दिले. या दरम्यान आधुनिक केसरी प्रतिनिधी बहादुर चव्हाण यांनी डाभा येथील उप आरोग्य केंद्राला भेट दिली असता तिथे डॉ. विलास राजपुत यांनी सांगितले की, या उप केंद्राच्या माध्यमातुन डाभा ग्रामस्थांचा वेळेवरती उपचार केला जाईल, अशी ग्वाही गावकऱ्यांना डॉ. राजपुत यांनी दिली. कर्मचारी संदर्भामध्ये विचारले असता डॉक्टरांनी असे सांगितले की, बऱ्याच कर्मच्याऱ्यांच्या जागा रिक्त




आहे. त्या जर वरच्या स्तरावरुन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भरुन काढल्या आणि कर्मचारी पाठवले गेले तर त्यांचीही धावपळ कमी होईल आणि 18 गावांना ही मोठी मदत होऊन सर्वांना वेळेवर उपचार देता येईल, असे आधुनिक केसरी प्रतिनिधीशी बोलताना त्यांनी सांगीतले.

सावळदबारा प्राथमिक आरोग्य केंद्रामधे अनेक कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त आहे. याची दखल घेऊन वरिष्ठ अधिकारी यांनी त्या रिक्त जागा भरुन काढल्या तर या सावळदबारा प्राथमिक आरोग्य केंद्रातील 18 गावांना सर्व गावकऱ्यांना वेळेवरती उपचार देता येईल. सध्याला डाभा गावच्या ग्रामस्थांची उप आरोग्य केंद्राची जी अडचण, समस्या होती ती सध्या दुर झालेली दिसुन आली. डाभा येथील गावकरी रुग्ण यांचा उपचार सुरु असल्याचे दिसुन आले. डॉ. विलास राजपुत यांनी सांगितले. यानंतर हे उप आरोग्य केंद्र बंद न ठेवता सुरुच राहणार आणि ग्रामस्थ यांचा वेळेवरती उपचार करणार हे ऐकुन डाभा येथील गावकरी खुश झाले आणि त्यांची समस्या दुर झाल्यामुळे गावकऱ्यांनी आधुनिक केसरीचे आभार मानत धन्यवाद दिले. गावकऱ्यांनी डॉ. विलास राजपुत, डॉ. विजय काटोले, शेख यांचे सुध्दा आभार मानले.

# जिल्हा परिषद निवडणूक : नवगाव गटामध्ये उमेदवारीसाठी 'राष्ट्रवादी'च्या इच्छुकांमध्ये रस्सीखेच !

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सदस्य पदाचे आरक्षण नुकतेच जाहीर झाल्याने सर्वच राजकीय पक्षात मागणी वाढु लागली त्यामुळे गावा गावात आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या चर्चेला उधाण आले आहे.

त्यात आपेगाव एवजी नवगाव गट झाल्याने तसेच आरक्षण ही सर्वसाधारण सुटल्याने उमेदवारी मिळविण्यासाठी राष्ट्रवादी पक्षात इच्छुक उमेदवारांमध्ये रस्सीखेच सुरू झाली आहे.

त्यामध्ये सोयीच्या ठरणाऱ्या जिल्हा परिषद होणाऱ्या सदस्याची राष्ट्रवादी पक्षात गर्दी वाढली असून हालचाली वाढल्या आहेत.

नवगाव येथील डॉ.गुलदाद पठाण यानी फिल्डिंग लावली असुन ते एकमेव पुर्वीपासून राष्ट्रवादी पक्षाचेच आसल्याचे ते आपली उमेदवारी फिक्स असल्याचे समजतात तर काही दिवसांपूर्वी माजी आमदार संजय वाघचौरे यांच्या उपस्थितीत थेट पक्ष अध्यक्ष शरद पवार याच्या समक्ष राष्ट्रवादीत प्रवेश केलेले



किशोर दसपुते हे हि नवगाव गटातून आपल्या उमेदवारीसाठी ईच्छूक आहेत तर काही दिवसापूर्वी दत्तात्रय गोर्ड यांच्यासोबत जावुन ज्ञानेश्वर कापसे यांनीही शिवसेनेला जय महाराष्ट्र करत राष्ट्रवादीचा झेंडा घेत उमेदवारी आपलीच फिक्स म्हणत भेटी गाठीला सुरवात केली.

त्याच्या पत्नी आपेगाव गटातून शिवसेने कडुन जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्या होत्या त्यामुळे संभाव्य उमेदवारीवर कापसे दावा करत आहेत. सध्या शिवसेना, शिंदे गटाचे इच्छुक उमेदवार दिसत नाही परंतु राष्ट्रवादीच्याच उमेदवारांची भाऊगर्दी नवगाव गटात वाढत असल्याचे चित्र दिसते.

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार





● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# गलवाडा व निंभोरा येथे कुपेषित बालकांना भाजीपाला किटचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील गलवाडा, निंभोरा व म्हशीकोठा येथील कुपेषित बालकांना कृषि विभागामार्फत भाजीपाला किटचे वाटप करण्यात आले. यावेळी तालुका कृषि अधिकारी एस.बी. पवार, मंडळ कृषि अधिकारी, जे.के. जाधव व मंडळ कृषि अधिकारी, बनोटी एस.जी वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली आत्मा योजनेअंतर्गत तालुक्यातील विविध अंगणवाडी कार्यक्षेत्रात किटचे वाटप करण्यात येत आहे.

सदरील योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पोषण मुल्याअभावी होणारे कुपोषण कमी करणे, पोषणयुक्त - संतुलित व सुरक्षित अन्नाचा पुरवठा करणे या प्रकारची उद्दिष्टे साध्य केली जात आहेत. सदरील योजनेअंतर्गत तालुक्यातील 833 कुपोषित बालके असलेल्या कुटुंबांची निवड गावातील अंगणवाडी सेविका यांचे मार्फत करण्यात येत असून प्रथम टप्प्यात सोयगाव तालुक्यास 333 भाजीपाला किटचे वाटप करण्यात येत आहे. त्यानुसार तालुक्यात दि.30 रोजी मौजे



निंभोरा, गलवाडा (ब) व म्हशिकोठा येथील कुपोषित बलकांच्या कुटुंबीयांना भाजीपाला किट अंगणवाडी सेविका ललिता गुलाब पाटील, कल्पना अशोक पाटील, कल्पना संतोष बिरारी, आशा अरुण पवार व आशालता बाबुराव कुंभार तसेच आत्मा योजनेचे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक ए.एस. महाजन यांचे हस्ते वाटप करण्यात आले.

# दिवसाढवळ्या डोंगर पोखरून होत आहे गौण खनिजाची लूट

## पेट्रोलपंप मालकाकडून महसूल प्रशासनाची दिशाभूल; लाखो रुपयांची फसवणूक; प्रशासन मात्र गप्प

आधुनिक केसरी न्यूज

**गोरख पाटील**

**कन्नड :** येथे नवीन पेट्रोल पंप मंजुर झाले असून त्यांच्या निकषाप्रमाणे कामे जोरात सुरू आहे. हेच पेट्रोल पंपाचे मालक महसुल प्रशासनाची दिशाभुल करून लाखो रुपयाची फसवणुक करताना चर्चेला उधाण येत आहे. पंपासाठी मोठया प्रमाणात भरती लागते हे सर्वानाच ठाऊक आहे मात्र दिवसाढवळ्या डोंगर पोखरून नदी नाले, धरणे, पाझर तलाव, गायराण, पीडित जमिन इत्यादी ठिकानुन गौण खनिजाची पंन्नास शंभर ब्रास परवानगी घेऊन शेकडो ब्रास गौण खनिजाची चोरी करताना दिसुन येत आहे. परवानगी एका जागेची मात्र उत्खनन दुसऱ्याच ठिकाणी यात राजकीय लोक पण आपली पोळी भाजुन घेत आहे. शेतीसाठी गाळपेराची परवानगी घेऊन महामार्गालगत भरती करत आहेत.

कन्नड शहरालगत पिशोर रोड, अंधानेर फाटा, अंबाडी प्रकल्प जवळ, तेलवाडी जवळ, साखर कारखान्याच्या पाठीमागे अश्या ठिकाणी नवीन सुरू होणारा पेट्रोल पंपाच्या भरतीसाठी सर्सास उत्खनन सुरू आहे मात्र यात महसुल विभागाचा लाखो रूपयाचा महसुल बुडविताना दिसुन येत आहे. सदरील पंप चालकाकडे जर उत्खनन परवानगी आहे मग ते दाखवत का नाही? काहींकडे फक्त बँकेत भरलेल्या चलनच आहे ते ही फक्त पंन्नास ते शंभर ब्रासची असुन मात्र सुमारे पाचशे ते आठशे ब्रास उत्खनन केलेले मुरूमाची भरती करताना दिसुन येत आहे. उत्खननासाठी परवानगी एका जागेची मात्र उत्खनन करतात दुसऱ्या ठिकाणी असाही प्रकार समोर येत आहे.

बँकेत चनल भरल्यानंतर महसुल विभागाची रितसर परवानगी घेऊन ती परवानगी कामाच्या ठिकाणी ठेवावी लागती. संबधीत बहुतेक कमी ब्रासचे चलन काढुन शेकडो ब्रासचे उत्खनन करून भरती करून लाखो रूपयाचा महसुल बुडवत आहे, असे चर्चेला उधान आले आहे. यामुळे गौण खणिजाची दिवसाढवळ्या लुट सुरू आहे व 50 ते 100 ब्रासच्या बँक चलनावर महसुल विभागाची परवानगी न घेता शेकडो ब्रास गौण खनिजावर डल्ला मारण्याच काम सुरू आहे. यामुळे महसुल विभागाची फसवणुक होत आहे का? मसुल



यासंदर्भात मी आता चौकशी केली. संबंधित त्यांनी रॉयल्टी काढलेली आहे परंतु त्यांना डोंगर पोखरता येणार नाही तसे झाले तर त्यांना कारवाईला सामोरे जावा लागेल.

**संजय वारकड**
**तहसिलदार कन्नड**

विभागातील काही अधिकारी कर्मचारी सामील तर नाही ना ? यात नेमक गौड बंगाल तरी काय आहे ? असे अनेक प्रश्न पडले आहे. अश्या गौण खनिजाची लुट करण्याऱ्यावर महसुल प्रशासन व गौण खनिज विभाग औरंगाबाद लक्ष देणार का असा प्रश्न या वेळी पडला आहे.

गौण खनिज विभागाने साखर कारखान्याच्या पाठीमागुन अंबाडी प्रकल्पापर्यंत कित्येकाने अवैध गौण खनिजाची चोरी करून महसुल बुडविला आहे. अश्या जागेवर जाऊन प्रत्यक्षात स्थळ पंचनामा व मोजमाप केले तर सत्य बाहेर येईल व दुधका दुध पाणीका पाणी होईल, सतत असे सुरू राहीले तर तालुक्यातील सौदर्य नामशेष झाल्याशिवाय राहणार नाही जर अश्या गौण खनिज लुटणाऱ्यांवर महसुल विभागाचा कानाडोळा तर होत नाही ना? गौण खनिज लुटणाऱ्यांना असेच खतपाणी मिळत राहीले तर तालुक्याचे निसर्ग सौदर्य नेस्तनाबुत झाल्याशिवाय राहणार नाही. यावर कन्नड महसुल प्रशासन व गौणखनिज विभाग औरंगाबाद काय कारवाई करतात याकडे संपुर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.



अंबाडी प्रकल्पातुन गाळपेरा काढताना



आता तर कहर झाला चक्क गौण खनिज साठी डोंगर पोखरताना



परवानगी एका ठिकाणाची व उत्खनन करत आहे दुसऱ्या ठिकाणी

# भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि मराठी साहित्य या विषयावर प्रतिष्ठान महाविद्यालयात साहित्य अकादमीचे चर्चासत्र

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** भारतीय स्वातंत्र्य इंग्रजानी आपली सत्ता राबवतानाच महत्त्वाच्या सुधारणा केल्या, असे प्रतिपादन उद्घाटक प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी केले. स्वातंत्र्यचळवळीचे साहित्यात पडलेले प्रतिबिंब मांडले. यासाठी त्यांनी कुसुमाग्रज, माडखोलकर, साने गुरूजी यांच्या साहित्यातली अनेक उदाहरणे दिली.

या उद्घाटनपर कार्यक्रमाचे अध्यक्ष साहित्यिक रंगनाथ पठारे यांनी स्वातंत्र्य आंदोलनाचे प्रतिबिंब कोठे आणि कसे पडले, त्यामागे लेखकाचा दृष्टीकोन कसा शोधता येतो हे सांगितले. कै. भाऊराव पाटील शिसोदे यांच्या स्मृती दिनाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याला उजाळा देत या चर्चासत्राची सुरुवात झाली. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष रवींद्र पा. शिसोदे, सचिव राजेंद्र पा. शिसोदे, प्रसिद्ध साहित्यिक राजन गवस, डॉ. सतीश बडवे, सुमती लांडे, एकनाथ पगार, महाविद्यालयाचे प्राचार्य सोनकांबळे, उपप्राचार्य प्रकाश तुरुकमाने, समन्वयक हंसराज जाधव, सर्जेराव जिगे, मधुकर बैकरे, निबंधवाचक, अभ्यासक, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

उद्घाटन सत्रानंतर झालेल्या दोन सत्रांमध्ये कवी रवी कोरडे, राजा होळकुंदे, डॉ. समीता जाधव, विनोद शिरसाट, दिलीप चव्हाण, सुशील धसकटे यांनी निबंधवाचन केले. या सत्रांचे अध्यक्ष जयदेव डोळे तसेच गणेश चंदनशिवे हे होते.



# युवराज बोरसे यांची खामगाव येथील पीडित कुटुंबाला आर्थिक मदत

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** तालुक्यातील खामगाव येथील आबासाहेब भाऊसाहेब कवडे हे इलेट्रिक शॉक लागून मृत झाले होते. त्यांच्या पछात फक्त आई आहे. त्यांच्या पर्यंत आतापर्यंत कोणत्याही लोकप्रतिनीधी नी कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत केली नाही पण ज्यावेळी ही बाब सामाजिक कार्यकर्ते युवराज बोरसे यांच्या लक्षात आली त्यावेळी त्यांची परिस्थिती गरिबीची असताना ही या कुटुंबास मदतीचा हात पुढे करत फुल नाही फुलाची पाकळी देत पाच हजाराची आर्थिक मदत केली.

यावेळी संजय मिसाळ, गणेश नलावडे, आप्पासाहेब पुंडलिक गायके, रमेश प्रकाश गायके, संदीप आप्पासाहेब गायके, संदीप सोपान गायके, गणेश प्रकाश गायके, बाळू कचरू कवडे, गोरख नारायण गायके, श्रीराम विश्वनाथ गायके, विजय बाळू गायके, तसेच युवा जिद्दी मराठा प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
DG दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

# बेटी बचाओ बेटी पढाओ चॅरिटेबल ट्रस्टने केला 300 गुणवंत मुलींचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**भाईंदर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बेटी बचाओ बेटी पढाओ या संकल्पनेने प्रेरित होऊन समाजसेवक डॉ.अजय दुबे यांनी 6 वर्षांपूर्वी बेटी बचाओ बेटी पढाओ चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून दहावी आणि बारावीच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. सुरू केले. गेल्या 2 वर्षात कोरोना संसर्गामुळे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होऊ शकले नाहीत. मात्र यावर्षी ट्रस्टने भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले होते. 24 जुलै रोजी मीरा रोडच्या वातानुकूलित शहनाई सभागृहात आयोजित एका भव्य कार्यक्रमात मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील सुमारे 300 गुणवंत विद्यार्थिनींना ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.


कार्यक्रमाला सन्मानित पाहुणे म्हणून मीरा भाईंदरच्या आमदार गीता जैन, माजी आमदार नरेंद्र मेहता, भाजप जिल्हाध्यक्ष एड रवी व्यास, महाराष्ट्र प्रदेश भाजप प्रवक्त्या श्वेता शालिनी, डॉ. मुंबई बस्टलचे संपादक दिलशाद एस. खान, समाजसेवक रामपाल, समाजसेवक डॉ.राधेश्याम तिवारी, नगरसेवक विक्रम प्रताप सिंह, नगरसेवक मनोज रामनारायण दुबे, नगरसेवक सुरेश खंडेलवाल नगरसेवक विजय राय, नगरसेविका नीला सांसा, नगरसेविका दरोगा पांडे, चंद्रकांत मोदी, दिल्लीतील ज्येष्ठ पत्रकार सुमित सिंह, शिवपुत्र पानसरे आदी उपस्थित होते. पत्रकार राजेश उपाध्याय, पत्रकार अमित तिवारी, पत्रकार सोनल सिंग, ॲड. राजकुमार मिश्रा, ब्रिजेश तिवारी, डॉ. सारिका रॉय, अधिवक्ता श्वेता तिवारी, मुनाफ पटेल, सुशील यादव यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून मुलींना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे प्रमुख सहकारी सुनीता खोत, चंदा उपाध्याय, कल्की सचदेव, राजकुमारी मौर्य, हेमा हुरिया, अलका सुथार, गीता जैस्वाल, अधिवक्ता नीती शुक्ला, डॉ.वर्षा सिंग, उबेद फ्रूटवाला, संजय मिश्रा, राजकुमार वत्स, मनीष दुबे, राजकुमार दुबे आदी मान्यवर आहेत. धर्मेश जोशी, अर्पिता दुबे, विवेक दुबे, ध्वनी जोशी, साक्षी उपाध्याय, रिद्धी कृष्णा इ. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.सौंदर्या गर्ग व कमलेश गगलानी यांनी केले. शेवटी संस्थेच्या विश्वस्त प्रीती अजय दुबे यांनी सर्वांचे आभार मानले.




पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट
गणिताच्या मूलभूत संकल्पना (१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त) MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/- पाने ५३४
गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/- पाने ५३४
उखाण्यातून गणित मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/- पाने ३६४
श्रीमती छायाताई खेडकर 8888780568
श्री. हरिभाऊ गिते सर 9422742712
गणेश बुक स्टॉल, भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड मो. 8149196415
दत्तराज पार्क, बायपासरोड, सावतानगर, गेवराई मो. 8888780568/9422742712
माऊली अपार्टमेंट, मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ, धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# प्रतिभावंत साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' ही गाजलेली कादंबरी आज आपण का वाचावी ?

आधुनिक केसरी






कादंबरीच्या क्षेत्रात महाराष्ट्र शासनानं उत्कृष्ठ वाङमय पुरस्कारानं गौरवलेली 'फकिरा' ही एकच कलाकृती अण्णाभाऊंचं मोठेपण अधोरेखीत करायला पुरेशी आहे. ही कादंबरी अण्णाभाऊंनी बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली आहे आणि या कादंबरीचं भलं मोठं थोरलेपण आणि तत्कालीन परिस्थितीतील वाङमयीन वातावरणाला छेद देणारं रसायण म्हणून आणि अर्थातच काळाच्या भाळावर आपल्या अभिजात प्रतिभेची मोहर उमटवणारी अण्णाभाऊंची वाङमयीन दृष्ट्या श्रेष्ठ कादंबरी असल्याची नोंद वि.स. खांडेकरांच्या प्रस्तावनेनं केली आहे. अगदीच आरंभीच्या काळात बाबुराव बागूल आणि माधवराव गादेकर या विचारवंतांनी अण्णाभाऊंच्या समग्र साहित्यावर आपल्या संशोधनातून प्रकाश टाकला आहे. बाबुराव बागुल म्हणतात तसी ही कादंबरी "एकेकाळी सह्याद्रीची गिरीशिखरे तुडवीत महाराष्ट्रातील शेठ-सावकार आणि ब्रिटीश सरकार यांना खोबऱ्याच्या वाटीप्रमाणे घोड्याच्या टाचेखाली तुडविणाऱ्या फकीराची शौर्यगाथा आहे". गावच्या आब्रुसाठी झुरणाऱ्या गावच्या मोठ्या माणसांच्या स्वप्नांखातर शत्रुशी कडवट झुंज देवून धारातिर्थी पडणाऱ्या जिगरबाज तरुणांची ही नितांत सुंदर कादंबरी आहे. ही कादंबरी गावकुसाबाहेर सांबरात राहणाऱ्या मांगवाड्यातील आणि त्याच्या लेकाची अर्थातच फकिराची रोमहर्षक शौर्यगाथा जशी आहे तशीच ती गावातल्या शंकर पाटील आणि विष्णुपंत कुलकर्णी सारख्या गावाचं भलं व्हावं म्हणून तत्कालीन ब्रिटीशांशीही वैर घेणाऱ्या भल्या माणसांचीही संस्मरणीय गाथा आहे.

आपल्याच गावच्या आडदांड मराठा समाजाच्या माणसाने किरकोळ कारणावरुन गरीब बाईमाणसाची केलेली बेईज्जत आणि क्रूर मारहान पाहून, त्याला समजावून सांगूनही ऐकत नाही हे दिसल्यावर कुऱ्हाडीनं त्याची खांडोळी करणारा मराठा समाजाचाच विवेकी तरूण सत्तु भोसले याच 'फकिरा' कादंबरीतल्या एका प्रकरणात फकिराचा जिव्हाळ्याचा दोस्त म्हणून ओझरता आलेला आहे. तत्ककालीन मराठा समाजाच्या अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध जसा सत्तू भोसले लढतो आणि परीसरातील तमाम सावकार, गावगुंड आणि हुंड्यापायी जाळभाज करुन बायका न नांदवणाऱ्या सासरच्या माणसांचा कर्दनकाळ होवून मराठी साहित्यात अजरामर झालेल्या सत्तू भोसलेंवर नंतर अण्णाभाऊंनी 'वारणेचा वाघ' ही स्वतंत्र कादंबरी लिहीली आणि याच कादंबरीवर मराठी सिनेमाही काढला. हा मूल्यासाठी आणि माणुसकीसाठी तळहातावर प्राण घेऊन लढणारा जिगरबाज सत्तु भोसलेचीही याच कादंबरीची देन आहे.

या कादंबरीनं दबल्या पिचल्या गावकुसाबाहेरील मांग माणसाला त्याच्या शौर्याचा इतिहास दिला. याच मराठी कादंबरीनं शंकर पाटीलांसारख्या मराठा समाजातल्या माणसाचा मूल्यसंघर्ष काय असतो हे दाखवून दिलं.

सत्तू भोसलेसारखे मराठा समाजाचे स्वाभिमानी तरु हा मूल्यसंघर्ष कसा करतात याचं भव्यदिव्य विराटदर्शन याच कादंबरीनं दिलं. निळू फुलेंनी साकारलेलं बेरकी, थापाड्या आणि वासनेच्या अंगानं जाणारं कुटानेखोर पाटलांचं पात्र कुठं आणि अण्णाभाऊंच्या फकिरातली ही सोण्यासारखी मराठा समाजाची माणसं कुठं. याच कादंबरीत गावगाडा चालवणारे, गावाचं नेतृत्व करणारे लोक मग ते कुण्याही जातीसे असोत, कसे असावेत यासाठी शंकर पाटील आणि विष्णूपंत कुलकर्णींसारख्या माणसांचा नीतीमूल्यासाठी कोणत्याही संकटाला निधड्या छातीनं पुढं जाणारा संघर्ष पाहिला पाहिजे.

गावात देवीची जत्रा भरवण्यामागचं अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि अर्थातच समाजशास्त्र समजून घ्यायचं झालं तर कुण्याही नेतृत्व करु पाहणाऱ्या आणि किमान वाचता येणाऱ्या मनुष्यानं फकिरा कादंबरी एकदा तरी नजरेखालून घालायलाच पाहिजे.भूख किती भयंकर असते आणि भुखेपायी कसले कसले रणसंग्राम होवू शकतात याचा जरा जरी इतिहास चाळावा वाटला तरी ही कादंबरीच आपण एकदा वाचावी असंच मी म्हणेन. गोर गरीब माणसं आपुलकीनं, जिव्हाळ्यानं आणि अगदीच प्राणपणानं जपले तर जिवाला जीव देऊ शकतात, याचं जितं जागतं चित्रण ही कादंबरी करते. शंभर सव्वाशे पानाचं हे मोडून पडलेल्या माणसाला आपला स्वाभिमानी इतिहास सांगणारं पुस्तक आपल्या घरात नसावं आणि आपण ते वाचलेलं नसावं म्हणजे आपण आपल्या पुर्वजांचा पराक्रमी चेहराच अजून पाहिला नाही असंच म्हणावं लागेल.

(शब्दांकन- बाळासाहेब जोगदंड, औरंगाबाद)

# बाबासाहेबांच्या भेटीच्या आठवणींचे स्मरण

## लांडोर बंगला येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृती पुतळ्याला लोकजनशक्ती पार्टीच्या वतीने विनम्र अभिवादन





आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील लळींग येथील अत्यंत महत्वाचे स्थळ असलेले लांडोर बंगला येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन ३१ जुलै १९३७ साली भेट दिली होती. त्यानी तीन दिवस धुळे शहरातील लळींग किल्ल्याजवळील लांडोर बंगला येथे मुक्काम केला होता त्यामुळे त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या स्मृती वन लांडोर बंगला किल्ले लळींग येथे अभिवादन करण्यासाठी ३१ जुलै रोजी मोठ्या प्रमाणात जनसागर उसळतो. त्या पार्श्वभूमीवर या ऐतिहासिक स्मृतीला उजळा देण्यासाठी आज उत्तर महाराष्ट्र विभाग लोकजन शक्ती पार्टी धुळे जिल्ह्याच्या वतीने लांडोर बंगला येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषाने परिसर पदाधिकाऱ्यांनी यावेळी दणाणून सोडला. १९३७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ३१ जुलैला पहाटे ५ वाजता धुळे रेल्वेस्थानकात चाळीसगाव रेल्वेने आगमन झाले होते बाबासाहेब येणार असल्याची बातमी ऐकून दलित समाज बांधव मोठ्या संख्येने त्यांचे स्वागत करण्यासाठी एकवटले होते. बाबासाहेबांचे आगमन होताच 'डॉ. आंबेडकर झिंदाबाद' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला होता. लांडोर बंगल्याच्या ऐतिहासिक स्मृतींना उजाळा देण्यासाठी आजही ३१ जुलै रोजी समाज बांधव या ठिकाणी एकवटतात आणि बाबासाहेबांना आदरांजली अर्पण करतात. दर वर्षागणिक भीमस्मृती यात्रेला मिळणारा प्रतिसाद वाढत आहे. राज्यातूनच नव्हे तर नजीकच्या गुजरात, मध्य प्रदेश या राज्यांमधूनही अनुयायी मोठ्या संख्येने येथे येतात.

त्यामुळे या पार्श्वभूमीवर आज या ऐतिहासिक स्थळ असलेल्या लांडोर बंगला या ठिकाणी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृति पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून उत्तर महाराष्ट्र विभाग लोकजन शक्ती पार्टी धुळे जिल्ह्याच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी बुद्ध वंदना मनत बाबासाहेबांना आदरांजली वाहण्यात आली आहे.

याप्रसंगी लोक जनशक्ती पार्टीचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे, धुळे जिल्हा महिला अध्यक्षा शोभाताई चव्हाण, महासचिव कुंदन खरात, दत्तू बापू साळवे, मधुकर चव्हाण, प्रमोद सोनवणे, पत्रकार रवींद्र नगराळे, पत्रकार दीपक वाघ, सागर निकम आदी यावेळी उपस्थित होते.

# एमआयएम पूर्ण ताकदीने पैठण नगरपरिषद निवडणूक लढविणार : जिल्हाध्यक्ष समीर बिल्डर

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** पैठण नगरपरिषद निवडणूक पूर्व तयारी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी एमआयएम पक्षाचे औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष समीर बिल्डर यांनी एमआयएम पूर्ण ताकदीने निवडणूक लढणार असल्याचे सूतोवाच करीत कार्यकर्त्यांनी निवडणुकीसाठी जोमाने काम करावे असे आवाहन केले. एमआयएम पक्षाची बैठक शहरातील बागवान फंक्शन हॉल येथे आयोजित करण्यात आली होती.

यावेळी जिल्हाध्यक्ष समीर बिल्डर यांनी एमआयएम पक्ष पूर्ण ताकदीने निवडणूक लढणार असल्याचे प्रतिपादन केले तसेच जनतेतून नगराध्यक्ष निवड होणार असल्याने एमआयएम नगराध्यक्ष पदासाठी मुस्लिम उमेदवार देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. एमआयएम च्या सर्व सेल व कमेटीच्या कार्यकर्यांनी न प निवडणूकीसाठी सज्ज राहावे, प्रभाग निहाय बैठकीचे आयोजन करावे, घर-घर एमआयएम पक्षाचा प्रचार करावा, असे आवाहन केले.

दरम्यान जिल्हाध्यक्ष समीर बिल्डर यांचे भाजी मार्केट ते नेहरू चौक पर्यंत व्यापारी, कार्यकर्त्यांनी पुष्पहार घालून स्वागत केले. यावेळी त्यानी मुस्लिम समाजाच्या अनेक मान्यवरांशी गाठीभेटी घेतल्या. राष्ट्रीय अध्यक्ष असद्दोदिन न.प. निवडणुकीच्या अनुषंगाने लवकरच ओवैसी, खा.इम्तियाज जलील, आमदार इस्माईल मुफ्ती, माजी आमदार वारीस पठाण यांचे रोड शो व प्रचार सभा आयोजित करण्यात येतील.

यावेळी वैभव दळवी, कलीमभाई (मूनलाइट होटल वाले औरंगाबाद), काजी कलीमुल्ला, शहराध्यक्ष तौसिफ कादरी, कय्यूम खतीब, मुफ़ीद पठाण, रिजवान नांदेडकर, फसी खतीब, निसार बागवान, मंजूरभाई (चितेगाव), सय्यद अमजद, साजिद कुरेशी बिड़किन, शेख अनीस, फहीम ढोराज, शेख अतीक, शहरातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्तेसह इच्छूक उमेदवार उपस्थित होते.



काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# "हर घर तिरंगा" अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे : सुरेश काळे

आधुनिक केसरी न्यूज

**देव्हारी :** हर घर तिरंगा या अभियाना अंतर्गत देव्हारी गावातील सर्व नागरिकांनी सहभागी होऊन आपल्या घरावर आपल्या भारत देशाचा राष्ट्रध्वज असलेला तिरंगा ध्वज फडकावा असे आवाहन- देव्हारी ग्रामपंचायत ग्रामसेवक सुरेश काळे यांनी केले आहे.

आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाली असल्यामुळे गत वर्षभरापासून शासनाच्या वतीने विविध उपक्रम व योजना राबविण्यात येत आहेत.

भारत के आझादी का अमृत महोत्सव उपक्रमा अंतर्गत दि. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान देव्हारी गावाचे ग्रामसेवक सुरेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व देव्हारी गावाचे सरपंच शमिरखा तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली देव्हारी गावात "हर घर तिरंगा" अभियान राबविण्यात येणार असून या अभियानात देव्हारी गावातील सर्व नागरिकांनी सहभागी होऊन आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकावा व राष्ट्रीय भावना राष्ट्रप्रेम जोपासावे असे आवाहन ग्रामसेवक सुरेश काळे यांनी केले आहे.

स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतानाच ७५ वर्षांच्या गौरवशाली परंपरेला मांडत प्रत्येकाच्या मनात देशाभिमान जागृत करणे हा स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव या अभियानांतर्गत त्यासाठी 'हर घर तिरंगा' उपक्रम देशभर राबविण्यात येत आहे. यासाठी राष्ट्रध्वजाची विक्रमी विक्री होण्याची अपेक्षा आहे.

यासाठी देव्हारी ग्रामपंचायत अंतर्गत जनजागृती करण्यासाठी देव्हारी बचत गटांच्या महिला, देव्हारी ग्रामपंचायत चे कर्मचारी गावात प्रभात फेरी काढणार आहेत, अशी माहिती सुरेश काळे यांनी दिली तर तसेच देव्हारी गावात हर घर तिरंगा अभियान दि. १३ ऑगस्ट ते १५ दरम्यान राबविण्यात येणार असून नागरिकांनी तिरंगा ध्वजाची खरेदी देव्हारी ग्रामपंचायत विविध महिला बचत गटाच्या स्टॅल करून खरेदी करावे आव्हान सुरेश काळे यांनी केले आहे.